म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९९२

# प्रकाशातील व्यक्ति

लेखक

प्रभाकर पाध्ये, एम्. ए.




REFBK-0006143

एप्रिल १९४१ ] [ किंमत १॥ रुपया

या पुस्तकाचें बाइंडिंगचे काम
जे. विनायक ॲण्ड को., १८५ सदाशिव, पुणें
याचेकडे झालें आहे.

कॉन्टिनेन्टल प्रकाशन ९

# प्रकाशांतील व्यक्ति

लेखक

**प्रभाकर पाध्ये**



REFBK-0006143

प्रस्तावना : प्रो. विठ्ठल हरि कुलकर्णी

एप्रिल १९४१ ] [ किंमत १॥ रुपया

संचालक :

ज. मा. महाजन
अ. आ. कुलकर्णी

प्रकाशक :

ज. मा. महाजन, बी. ए.

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
१९६ सदाशिव, टिळक रोड, पुणें २

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, अनुवादाचे
उतारे घेण्याचे वगैरे सर्व हक्क
सौ. वसुंधरा पाध्ये
यांच्याकडे आहेत.

मुद्रक
स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्‌एल्.बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत' छापखाना
४१ बुधवार, पुणें २

# प्रकाशांतील व्यक्ति

— प्रभाकर पाध्ये

'प्रकाशांतील व्यक्ति 'मधील व्यक्तींचीं रेखाचित्रें व वरील चित्र महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध चित्रकार श्री. डी. डी. दलाल यांनीं काढलेलें आहे.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना ... ... ... | १ |
| गांधी ... ... ... | १ |
| लिऑं ट्रॉट्स्की ... ... ... | १३ |
| डॉ. आंबेडकर ... ... ... | २६ |
| झेड्. ए. बुखारी ... ... ... | ३६ |
| लो. माधवराव अणे ... ... ... | ४४ |
| न. चिं. केळकर ... ... ... | ५२ |
| जी. के. चेस्टर्टन ... ... ... | ६३ |
| प्रो. वा. म. जोशी ... ... ... | ७४ |
| प्रो. ना. सी. फडके ... ... ... | ८५ |
| कॉ. एम्. एन्. रॉय ... ... ... | ९४ |
| विभावरी शिरूरकर ... ... ... | १०७ |
| ज. र. आजगांवकर ... ... ... | ११८ |

# आमचें प्रकाशन → प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| १ | नादनिनाद (कवठेकर) | १॥ |
| २ | स्वाति (सरदेसाई) | १॥ |
| ३ | नवा प्रातःकाल (खांडेकर) | १ |
| ४ | कलावंतांच्या सहवासांत (धनंजय) | २। |
| ५ | चांदण्यांतील सांवल्या (कवठेकर) | २ |
| ६ | नीलेचा दिलरुबा (सौ. नाशिककर) | १॥। |
| ७ | भंगलेली मूर्ति (चिरडे) | १॥ |
| ८ | मोगरीचा गजरा (वैद्य) | १। |
| ९ | प्रकाशांतील व्यक्ति (प्रभाकर पाध्ये) | १॥ |

## आगामी

घरकूल
(अनंत काणेकर)

सूड !
(वा. वि. जोशी)

हिरवे कंदील
(अनंत काणेकर)

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें

# प्रस्तावना

माझे स्नेही श्री. प्रभाकर पाध्ये यांची 'प्रकाशांतील व्यक्ति' ही लेखमाला पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेली पाहून मला निरतिशय समाधान व आनंद होत आहे. प्रस्तुत पुस्तकांतील बहुतेक सर्व लेख प्रथम साप्ताहिकांतून प्रसिद्ध झाले. आज हे लेख पुस्तकांत एकत्र संकलित करण्यांत आले नसते तर या 'प्रकाशांतील व्यक्ति' प्रकाशांत येतात न येतात तोंच पुन्हां विस्मृतीच्या अंधारांत गडप होऊन साप्ताहिकाच्या अंकाप्रमाणेंच कोठेंतरी धूळ खात पडून राहिल्या असत्या! परंतु पुस्तकरूपानें पुन्हां प्रकट झाल्यामुळें या व्यक्ति स्वयंप्रकाशित असूनहि मेघपटल विरून गेल्यानंतर आकाशगंगेतील नक्षत्रमंडळाप्रमाणें आतां नव्या तेजानें तळपूं लागल्या आहेत. मला समाधान वाटलें तें यामुळेंच. पण हें समाधान वाटण्याला आणखीहि एक कारण आहे.

साप्ताहिकांतून लिखाण करणाऱ्या लेखकांना दोन प्रकारच्या आपत्तींना तोंड द्यावें लागतें. त्यांतील एक आपत्ति वर निर्दिष्ट केलीच आहे. ती म्हणजे अल्पजीवित्वाची. साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेला लेख कितीहि चांगला असला तरी त्याची स्थिति जीवन्मृत

बालकाप्रमाणें असते. त्याच्या आयुष्याची दोरी फारच बळकट असल्याशिवाय त्याला सूतिकागृहांतून बाहेर पडून खुल्या जगांत वावरण्याचें भाग्य लाभत नाहीं. दुसरी आपत्ति अशी कीं साप्ताहिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या गुणसमुच्चयासंबंधीं वाचकवर्ग नेहमींच साशंक असतो. सर्वसाधारण वाचकवर्गाचें गणित असें असतें कीं, दैनिकांत प्रसिद्ध झालेला लेख त्यांतील ताज्या बातमीप्रमाणेंच जेमतेम एक दिवसच जगण्याच्या लायकीचा असतो. अर्थात् या गणिताप्रमाणें साप्ताहिकांतील लेखाला सात दिवसांपेक्षां अधिक दिवस जगण्याचा अधिकार नाहीं. साप्ताहिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांतील गुणांचें मोजमाप करण्याच्या या पद्धतीमुळें त्यांतील लेखकवर्गाला फारच मोठा अन्याय होत आहे असें मला वाटतें. विशेषतः मासिकांत प्रसिद्ध झालेले कित्येक लेख एखाद्या रटाळ दैनिकांतहि छापण्याच्या लायकीचे नसतात हें लक्षांत घेतलें असतां या अन्यायाची यथार्थतेनें जाणीव होईल. मासिकें आणि साप्ताहिकें यांतील लिखाणाची तुलना करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु एक गोष्ट मात्र या ठिकाणीं नमूद केल्याशिवाय राहवत नाहीं; ती ही कीं, साप्ताहिकांतून प्रसिद्ध होत असलेलें कांहीं लिखाण तरी मासिकांतील कित्येक लेखांपेक्षां मला अधिक जिवंत, जोरदार आणि जिव्हाळ्याचें वाटतें. याचें कारण अगदीं उघड आहे. आपलें लिखाण मासिकांत प्रसिद्ध करणारे कित्येक लेखक आपल्या लेखांचे विषय आणि त्यांतील विचार दिक्कालातीत आहेत अशा भावनेनें लेखन करीत असतात ! आपले लेख भविष्यकाळांत टिकून राहिले पाहिजेत, तेव्हां त्यांत शक्यतोंवर वर्तमानकालीन प्रश्नांचा ऊहापोह करतां कामा नये, अशी या लेखकांची समजूत झालेली असते. अर्थात् याचा परिणाम त्यांचे लेख केव्हांहि न वाचले जाण्यांतच होतो, हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. मासिकांतून गोष्टी व लेख लिहिणाऱ्या कित्येक लेखकांत ऐतिहासिक

दृष्टीचा अभाव, व जगांत प्रचलित असलेल्या राजकीय किंवा सामाजिक घडामोडींविषयींचें संपूर्ण अज्ञान दिसून येतें तें यामुळेंच.

पण लेखक या नात्यानें श्री. प्रभाकर पाध्ये यांची गोष्ट अगदीं वेगळी आहे. एका यशस्वी मासिकाचे आणि सुप्रसिद्ध साप्ताहिकाचे ते संपादक असल्यामुळें प्रचलित वाङ्मय आणि राजकारण याचा त्यांना सारख्याच तत्परतेनें अभ्यास करावा लागतो. ही दुहेरी जबाबदारी यशस्वी रीतीनें पार पाडण्याकरितां त्यांनीं लेखक या नात्यानें एक प्रकारचें सव्यसाचित्व साध्य करून घेतलें आहे. प्रस्तुत 'प्रकाशांतील व्यक्तीं'त गांधी, रॉय, ट्रॉट्स्की, अणे इत्यादि राजकारणी पुरुषांप्रमाणेंच फडके, वा. म. जोशी, विभावरी शिरूरकर, आजगांवकर वगैरे साहित्यिकांचाहि अंतर्भाव झालेला आढळतो तो यामुळेंच. परंतु हें सव्यसाचित्व पाध्यांना, ते दोन नियतकालिकांचें संपादन करतात, यामुळेंच केवळ प्राप्त झालेलें नाहीं. संपादक होण्यापूर्वीं त्यांनीं शोधक आणि चिकित्सक बुद्धीनें ज्या वेगवेगळ्या विषयांचें वाचन आणि अध्ययन केलें त्याचा तो स्वाभाविक परिणाम आहे. श्री. पाध्यांच्या लिखाणांत मला जें वैशिष्ट्य दिसून येतें तें केवळ संपादक झाल्यानें साध्य करून घेतां येण्यासारखें नाहीं. तसें असतें तर आजच्या सर्वच संपादकांच्या लिखाणांत तें आढळून आलें असतें. पण तसें तें आढळून येत नाहीं.

मार्क्सवाद आणि त्यांतून उद्भवणारें वर्गकलहाचें तत्त्व, ऐतिहासिक भौतिकतावाद, अंतर्विरोध विकासवाद इत्यादि प्रश्नांचा श्री. पाध्ये यांनीं जितका चिकित्सक आणि स्वतंत्र बुद्धीनें अभ्यास केला आहे तितका निदान मराठी लेखकवर्गांत फारच थोड्या लेखकांनीं केल्याचें दिसून येतें. आजच्या स्टॅलिनवादी कम्यूनिस्टांशीं श्री. पाध्ये यांनीं एकट्यानें आज इतकीं वर्षे जी यशस्वी रीतीनें झुंज दिली

आहे ती माझ्या या विधानांची सत्यता पटवून देण्यास पुरेशी आहे. उद्यां स्टॅलिन्‌वादी पक्ष हिंदुस्थानांत अधिकारारूढ झाला तर तो लेखकवर्गांत प्रथम श्री. पाध्यांना फांसावर लटकावील याविषयीं मला बिलकुल शंका नाहीं.

मार्क्सवाद आणि राशियन राज्यक्रांति यांविषयीं श्री. पाध्यांच्या व्यासंगाचा प्रस्तुत पुस्तकांत पुरावा पाहावयाचा असल्यास त्यांचा लिऑं ट्रॉट्स्कीवरील लेख वाचावा. ट्रॉट्स्कीचा अमेरिकेंतील पक्षपाती मॅक्स ईस्टमन याच्या ग्रंथांचा श्री. पाध्यांच्या मनावर बराच परिणाम झालेला दिसून येतो. निदान मराठी वाङ्मयांत तरी न्यायबुद्धीनें प्रेरित होऊन ट्रॉट्स्कीची एकनिष्ठपणें तरफदारी करणारा श्री. पाध्यांखेरीज दुसरा लेखक माझ्या पाहण्यांत नाहीं.

मार्क्सवादाचा पद्धतशीर अभ्यास केल्यामुळें पाध्यांच्या लिखाणांत एक प्रकारची ऐतिहासिक दृष्टि असलेली आढळून येते. किंबहुना कोणत्याहि विषयाची ऐतिहासिक दृष्टीनें छाननी करून तदनुषंगिक विचारपरंपरेची संगति लावणें हें श्री. पाध्यांच्या लिखाणाचें एक अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे असें मला वाटतें. बुखारींवरील एखादा प्रासंगिक लेख वगळल्यास ऐतिहासिक दृष्टीनें संगति लावण्याची त्यांची ही हातोटी प्रस्तुत पुस्तकांतील सर्व लेखांत आढळून येईल. श्री. पाध्यांनीं ही कला आत्मसात् केल्यामुळें वाङ्मयाचा फारसा अभ्यास न करितांहि त्यांचे सर्व साहित्यिकांवरील लेख वैशिष्ट्यपूर्ण झाले आहेत. याचें उत्तम उदाहरण म्हणजे त्यांचा जी. के. चेस्टर्टन याजवरील लेख. जी. के. चेस्टर्टन हा खिस्तवासी झाला, तेव्हां 'प्रतिभा' या पाक्षिकाच्या संपादनाचें बरेंचसें काम ते श्री. मोटे यांचे विश्वस्त या नात्यानें करीत असत. तेव्हां चेस्टर्टनवर मृत्युलेख लिहिण्याची जबाबदारी त्यांजवर स्वाभाविकपणेंच पडली. पण चेस्टर्टनचें वाङ्मय त्यांनीं बिलकूल अभ्यासिलेलें नव्हतें. तेव्हां रत्नाकरांत चेस्टर्टनवर मीं लिहिलेले लेख त्यांना वाचावयास दिले. आणि आश्चर्याची गोष्ट

अशी कीं, मीं लिहिलेले हे लेख वाचून त्यांनीं चेस्टर्टनवर माझ्या लेखांपेक्षांहि अधिक सुंदर लेख लिहिला. एवढेंच नव्हे, तर चेस्टर्टनवरील माझ्या लेखांत जी उणीव राहिली आहे ती त्यांनीं आपल्या लेखांत भरून काढली. माझ्या 'व्यक्तिचित्रें' या पुस्तकाचें परीक्षण करतांना माझे स्नेही श्री. रा. भि. जोशी यांनीं चेस्टर्टन-वरील लेखांतील वैगुण्यावर अचूक बोट ठेविलें आहे. आपल्या परीक्षणांत ते म्हणतात, " पण चेस्टर्टननें पत्करलेल्या विचारसरणीची भूमिकाच कशी एक प्रकारें अवास्तव, निराधार आणि विफल होती हे त्यांनीं ( म्हणजे मीं ) स्पष्ट केलें नाहीं." श्री. पाध्ये यांनीं लिहि-लेल्या चेस्टर्टनवरील लेखांतील माझ्या मतें खरें वैशिष्ट्य हें कीं, त्यांनीं श्री. रा. भि. जोशी यांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नाचें ऐतिहासिक दृष्टीनें छाननी करून उत्तर दिलें आहे. हें उत्तर श्री. पाध्ये यांच्या चेस्टर्टनवरील लेखांतील शेवटच्या परिच्छेदांत वाचावयास मिळेल.

प्रो. फडके यांजवरील लेखांत प्रोफेसरसाहेबांचें वैशिष्ट्य मोठ्या आपुलकीनें विशद करून दाखविण्यांतच श्री. पाध्यांच्या लेखनकलेंतील खरें वैशिष्ट्य प्रकट झालें आहे. प्रो. फडके यांची आधुनिकता हें त्यांचें वैशिष्ट्य सांगून तदनुरोधानें त्यांच्या वाङ्मयाची श्री. पाध्यांनीं केलेली मीमांसा निःसंशय मार्मिक असून प्रो. फडके यांच्या वैचारिक संक्रमणाची श्री. पाध्यांनीं लावलेली संगति आधुनिक टीकाकारांनीं अवश्य वाचून पाहण्यासारखी आहे. त्यांत त्यांना टीकाशास्त्रांतील एका नवीन दृष्टिकोनाचा लाभ झाल्याशिवाय राहणार नाहीं.

श्री. पाध्ये यांचा स्वभाव विलक्षण साधा आणि संवेदनाशील आहे. एखाद्या व्यक्तीविषयीं त्यांचें मत अनुकूल बनलें कीं मग कांहीं काळपर्यंत ते तिची भरमसाट स्तुति करीत राहतील. ही स्तुति ते स्वयंस्फूर्तीनें आणि मनापासून करतील. परंतु असें असूनहि मी त्यांना विभूतिपूजक म्हणावयास तयार नाहीं. कारण विभूतिपूज-नांत अंतर्भूत असलेली बौद्धिक गुलामगिरी ते क्षणभरहि मान्य

करणार नाहींत. ज्याची ते आज मुक्तकंठानें स्तुति करतील त्याचा चांगुलपणा हा अस्सल नसून नक्कली आहे असा त्यांच्या बुद्धीस साक्षात्कार झाला, कीं ते तितक्याच आवेशानें त्यावर टीका करण्यासहि कचरणार नाहींत. प्रस्तुत पुस्तकांतील 'न. चिं. केळकर' यांजवरीलच श्री. पाध्यांचा लेख पहाना. तात्यासाहेब केळकर हे 'अनेकांगी अभिजात साहित्यसेवक व चतुरस्त्र संपादक' आहेत ही गोष्ट श्री. पाध्यांना सर्वस्वीं मान्य आहे, व त्याबद्दल ते केळकरांची मनमोकळेपणानें प्रशंसाहि करतील. परंतु तात्यासाहेबांनीं आत्मचरित्रांत 'लोकशिक्षणां'तील 'टिळकभक्ता'च्या टीकालेखाला दिलेलें उत्तर श्री. पाध्यांच्या तीव्र, तिखट आणि तर्ककर्कश बुद्धिमत्तेला उपमर्दकारक वाटलें. त्यासरशीं खुद्द 'टिळकभक्ता'नें जितक्या त्वेषानें केळकरांना प्रत्युत्तर दिलें नसतें तितकें श्री. पाध्यांनीं त्यांना आपल्या लेखांत दिलें आहे. सदरहू लेखांतील कडवटपणा अगर हिरवटपणा एखाद्याच्या सात्त्विक स्वभावास रुचला नाहीं तरी त्यांतील श्री. पाध्यांची विचारसरणि तर्कशुद्ध व बिनतोड आहे हें कोणालाहि कबूल करावें लागेल. केळकरांवरील हा लेख श्री. पाध्ये लिहिण्यास प्रवृत्त झाले याचें कारण असें कीं, आपल्या आत्मचरित्रावर कोणींहि आक्षेप घ्यावे, त्याला मी उत्तर देईन, अशी आव्हानवजा जाहीर घोषणा केळकरांनीं कोठेंतरी केली होती व ती 'केसरी'तहि प्रसिद्ध झाली होती. वस्तुतः हें आव्हान 'टिळकभक्ता'नें स्वीकारावयास पाहिजे होतें; परंतु त्यानें तें न स्वीकारल्यामुळें श्री. पाध्यांनीं तें स्वतः-च्या जबाबदारीवर स्वीकारून केळकरांवरील प्रस्तुत लेख लिहिला.

लोकनायक अणे यांच्या षष्ट्यब्दपूर्तिसमारंभाच्या निमित्तानें त्यांजवर श्री. पाध्यांनीं लिहिलेला लेख हा एका दृष्टीनें त्यांच्या केळकरांवरील लेखाचा उत्तरार्ध म्हणून समजण्यास हरकत नाहीं. या दृष्टीनें केळकरांवरील लेखाच्या आधीं लो. अणे यांजवरील लेख छापला नसता तर तें अधिक सुसंगत झालें असतें, असें मला वाटतें.

टिळकांच्या पश्चात् टिळकांच्या शिष्यवृन्दांत दोन तट पडून टिळकांचें राजकारण खरोखरी पुढें कोण चालवीत आहे, या विषयावर वाद सुरू होऊन तो अजूनहि संपलेला नाहीं. परंतु टिळकांची युयुत्सु वृत्ति, त्यांची लोकसंग्रहाची बुद्धि आणि लोकांच्या असंतोषाचा अग्नि सतत पेटत ठेवण्याकरितां हरतऱ्हेच्या साधनांचा त्यांनीं केलेला अवलंब हीं टिळकांच्या राजकीय चळवळीचीं मुख्य लक्षणें सांगून श्री. पाध्ये यांनीं या कसोटीला लो. अणे हेच केळकरांपेक्षां अधिक उतरत असल्यामुळें तेच खरे टिळकशिष्य असल्याचा निर्णय दिला आहे. म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळींत सामील होणें हें टिळकांच्या राजकीय धोरणाला आणि परंपरेला विसंगत नसून उलट सुसंगतच कसें आहे याची श्री. पाध्यांनीं लावलेली उपपत्ति उद्बोधक आहे.

श्री. पाध्ये विभूतिपूजक नाहींत, याचा अर्थ त्यांना कोणाचा स्तुतिपर लेख लिहितां येत नाहीं असा मात्र कोणीं करूं नये. लिऑं ट्रॉट्स्की, डॉ. आंबेडकर, कॉ. रॉय, प्रो. फडके, प्रो. वा. म. जोशी इत्यादिकांवरील श्री. पाध्ये यांचे लेख निर्भेळ स्तुतीनेंच भरलेले आहेत, असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रो. जोशी यांजवरील लेखांत पाध्यांचें सुषुप्तावस्थेंतील अंतर्मन जागृत होऊन त्यांना डिवचूं लागल्यामुळेंच किंवा काय आपण विभूतिपूजक नाहीं असें ते ओरडून सांगत असल्याचा भास होतो. बुखारींवरील श्री. पाध्यांचा लेख मुख्यत्वेंकरून माडखोलकरांच्या आग्रहास्तव लिहिला गेला आहे; व त्यामुळें त्या लेखावर माडखोलकरांच्या लेखनपद्धतीची छाया पडलेली दिसते. रिहर्सलचा कार्यक्रम उरकून रेडियो ऑफिसांतून आम्ही त्रिवर्ग घरीं परत येत असतां व घरीं आल्यावरहि माडखोलकरांनीं बुखारींवरील लेखांत कोणकोणत्या गोष्टी आल्या पाहिजेत याची इतक्या वेळां उजळणी केली कीं,

श्री. पाध्यांना त्या सर्व लिहून काढायला काय श्रम पडले असतील तेवढेच. तरी पण श्री. पाध्यांनीं बुखारींचें काढलेलें शब्दचित्र मोठें ठसकेबाज आणि चटकदार झालें आहे यांत मात्र शंका नाहीं.

म. गांधी यांजवरील लेखाच्या सुरुवातीच्या भागांत गांधी महात्मा आहेत कीं मुत्सद्दी आहेत याविषयीं आपल्या मनाचा अद्याप निर्णय झाला नसल्याची श्री. पाध्ये घोषणा करितात; परंतु त्यांच्या लेखांतील बहुतेक भाग गांधी हे महात्मा नसून धूर्त मुत्सद्दीच आहेत हें सिद्ध करण्याकरितांच लिहिला आहे असें आढळून येतें. परंतु गांधीवादाचा स्वीकार अतिशय चिकित्सक आणि विकासशील बुद्धीनें केल्यास तो जगाच्या भवितव्याला फार उपकारक ठरेल वगैरे जें कांहीं श्री. पाध्यांनीं लेखाच्या शेवटीं शेवटीं लिहिलें आहे त्याचा मला नीटसा बोध झालेला नाहीं. सदरहू पुस्तकाचें परीक्षण करतांना श्री. पाध्यांच्या या भागाचें स्पष्टीकरण करावें अशी माझी त्यांना विनंति आहे.

‘ विभावरी शिरूरकर ’ हें नांव धारण करून मराठी वाङ्मयांत एका वेळीं जिनें हलकल्लोळ उडवून दिला तिजवरील लेख हें प्रस्तुत पुस्तकांतील एक चटका लावणारें आमिष आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. सदरहू लेखांत श्री. पाध्ये यांनीं ‘विभावरी’च्या तोंडा-वरील बुरखा इतक्या सानुकंप भावनेनें, आणि हळुवार रीतीनें दूर केला आहे कीं, मार्मिक वाचकास बुरख्याआड लपलेल्या तरुणीचें प्रत्यक्ष दर्शनच व्हावें. ‘ विभावरी शिरूरकर ’ यांच्या विश्वासांतील माणसानें या बुरख्यांतील धागेदोरे श्री. पाध्यांच्या स्वाधीन करावे अशा आत्मविश्वासानें प्रेरित होऊन पाध्ये यांनीं गुप्त पोलिसाचें चातुर्य प्रगट केलें आहे. विभावरी शिरूरकरच्या ‘कळ्यांच्या निःश्वासां’वर बाळुताई खरे यांचा अभिप्राय छापिला होता. श्री. पाध्यांच्या प्रस्तुत लेखावरील त्यांचा अभिप्राय ऐकण्याची मला उत्कंठा आहे.

श्री. पाध्यांच्या लेखांतून मी किती तरी सुंदर वाक्यपंक्ति काढून देईन. पण इतकें असूनहि मला त्यांची भाषाशैली आवडत नाहीं. त्यांच्या भाषेंत एक प्रकारचा खडबडीतपणा भासमान होतो. वस्तुतः त्यांच्या लिहिण्यांत आवेश, निःसंदिग्धता, तर्कशुद्धता इत्यादि गुण आढळतात; एवढेंच नव्हे, तर उपमा, दृष्टान्तहि त्यांत नाहींत असें नाहीं. परंतु हे सर्व गुण असूनहि भाषेमध्यें एक प्रकारची सफाई म्हणतात ती त्यांच्या भाषेमध्यें मला दिसून येत नाहीं. परंतु श्री. पाध्यांच्या लेखांचें मूल्यमापन त्यांच्या भाषाशैलीवरून करणें चुकीचें ठरेल. श्री. पाध्यांच्या एकंदर लिखाणाचें मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याहि प्रश्नाकडे पाहण्याची त्यांची ऐतिहासिक दृष्टि आणि तद‌नुरोधानें कोणत्याहि व्यक्तीच्या आचारविचारांची संगति लावून दाखविण्याची त्यांची हातोटी. त्यांच्या लिखाणांतील हे दोन गुण मला इतके असामान्य आणि आकर्षक वाटतात कीं, त्यामुळें त्यांच्या लेखांतील इतर सर्व दोष दृष्टीआड करावयाला मी तयार आहें.

प्रस्तुत पुस्तकांत श्री. पाध्यांनीं काढलेल्या व्यक्तिचित्रांचा मीं थोडक्यांत परिचय करून दिला आहे व माझ्या दृष्टीला त्यांत जें वैशिष्ट्य दिसलें त्याचेंहि दिग्दर्शन केलें आहे. हें वैशिष्ट्य अधिक विशद करून दाखवावयाचें म्हणजे श्री. दिवेकर यांचें ‘स्वभावचित्रें’, श्री. माडखोलकर यांचें ‘माझे आवडते लेखक’, श्री. ‘धनंजय’ यांचें ‘कलावंतांच्या सहवासांत’ इत्यादि पुस्तकांचा तौलनिकदृष्ट्या विचार करावा लागेल. पण तें काम टीकाकारांचें आहे, प्रस्तावनालेखकाचें नाहीं.

१ एप्रिल १९४१.

वि. ह. कुलकर्णी

श्री. प्रभाकर पाध्ये

यांचीं पुस्तकें

**प्रकाशांतील व्यक्ति**

**आजकालचा महाराष्ट्र**

[ सहकार्यानें ]

आगामी

**विचार–विकास**

[ साहित्यशास्त्रावरील लेख ]

? ? ? [ लघुकथासंग्रह ]

**आधुनिक युगाचे सहप्रवासी**

श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या, 'कॉन्टिनेन्टल प्रकाशना'तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या आणखी एका पुस्तकाचें नांव ? ?



# गांधी

इतिहासशास्त्रासंबंधीं लिहितांना कार्ल मार्क्सनें एक बहुमोल विचार व्यक्त केला आहे. ज्या कल्पनांनीं प्रेरित होऊन माणसें साधारण-पणें इतिहास लिहितात आणि घडविण्याचा प्रयत्न करतात त्या कल्पनांपेक्षां वेगळ्या स्वरूपाच्या प्रेरकशक्ति ऐतिहासिक घडामोडींच्या मुळाशीं असतात. [ त्या कल्पनांचें वर्णन मार्क्सनें Ideology या शब्दानें केलें होतें; आज मार्क्सवादी हा शब्द निराळ्या अर्थानें वापरतात. ] उदाहरणार्थ, फ्रेंच राज्यक्रांतीच्या पताकेवर स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व हीं उदात्त तत्त्वें फडकलीं; परंतु या क्रांतीच्या मुळाशीं फ्रान्समधील भांडवलदार वर्गाचे हितसंबंधच मुख्यतः होते. मार्क्स-लेनिनच्या तेजस्वी तत्त्वांची घोषणा स्टॅलिन आज करतो; परंतु त्याच्या प्रयोगामुळें रशियांत आज एक नवा राज्यकर्ता वर्ग निर्माण झाला असून त्यानें आपली प्रतिगामी हुकूमशाही, समाज-वादाच्या नांवाखालीं, स्थापन केल्याचें उद्वेगजनक दृश्यच चिकि-त्सकांच्या नजरेस पडतें. असाच कांहींसा प्रकार गांधींच्या बाबतींत

झाला आहे कीं काय ? गांधींनीं, आपल्या जीवनकहाणीचें वर्णन 'सत्याचे प्रयोग' असें केलें; पण या प्रयोगांतून सत्य-अहिंसेचाच निर्मळ आविष्कार होतो का ?

या प्रश्नाचें निर्विवाद उत्तर मला सांपडलेलें नाहीं. कारण गांधी महात्मा आहेत कीं मुत्सद्दी आहेत, याविषयीं माझ्या मनाचा अद्याप निर्णय झालेला नाहीं. हा निर्णय होईपर्यंत गांधींच्या जीवनाचें रहस्य समजल्याचें समाधान लाभण्याचा संभव नाहीं. गांधींना लोक 'महात्मा' म्हणतात. 'शब्दां'चा उपयोग करतांना लोक त्यांच्या शास्त्रीय अर्थाबद्दल बेफिकीर असतात, एवढेंच यावरून दिसतें. गांधींच्या आयुष्यांतील बरेच प्रसंग माहात्म्य आणि मुत्सद्देगिरी या दोनहि कसोटींस उतरतील, एवढें कबूल करायला हरकत नाहीं. परंतु 'माहात्म्या'च्या नियमांस अपवाद असूं शकत नाहीं. ईश्वरादि आध्यात्मिक प्रश्नांप्रमाणें माहात्म्याचेहि नियम निरपवादच असतात.

ता. २५ जुलै १९३८च्या रात्रीं नागपूरचे डॉक्टर खरे आपल्या 'राजकीय आत्महत्ये'चा मसुदा खिशांत टाकून सेवाग्रामहून परतले तेव्हां त्यांनीं गांधींमाहात्म्याचें एक बहुमोल बिरुद हिरावून आणलें, असें मला अजूनहि वाटतें. खरे-प्रकरणाच्या वेळीं 'चित्रा' साप्ताहिकांत मीं जे जहरी लेख लिहिले त्यांतील प्रासंगिक कडवटपणाबद्दल मला आतां अभिमान वाटत नसला तरी ते लिहिल्याबद्दल पश्चात्ताप मात्र वाटत नाहीं. डॉ. खऱ्यांसारख्या सत्यनिष्ठ आणि सेवोदात्त सद्गृहस्थाशीं गांधींचें त्या वेळीं जें वर्तन झालें त्याचा 'माहात्म्या'शीं मेळ कसा घालावा हें मला अद्यापहि समजत नाहीं. 'डॉ. खरेने मुझे पदभ्रष्ट किया' असे अनुतापाचे उद्गार त्या वेळीं खुद्द गांधींनीं काढले होते हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. गांधींच्या मनाचा तोल त्या वेळीं इतका गेला होता कीं त्यांनीं, ज्या दिवशीं तो मसुदा प्रसिद्ध करण्यास खऱ्यांना जाहीर आव्हान दिलें त्याच

दिवशीं खऱ्यांना खासगी पत्र लिहून, 'कसेंहि करून तो मसुदा परत पाठवून द्या' अशी विनंती केली होती.

नरिमन किंवा खरे यांच्याकडून गांधींनीं कबुलीजबाब मागितले, यांत त्यांच्या सत्य-अहिंसेशीं विसंगत असें कांहींच नाहीं, असें समर्थन गांधीवादी करतात. आपल्या चुकीची कबुली देणें हा आत्मशुद्धीचा एक प्रकार आहे, अशी त्यांच्या युक्तिवादाची पद्धति आहे. मनुष्य-प्राणी स्खलनशीलच आहे; 'चुकीचे पुतळे असे जे आपण ते एखाद्या कामांत एकसुद्धां चूक जर न करूं तर आपल्यांत गर्व [मग तो वाटेल तेवढा सूक्ष्म असो ] उत्पन्न होण्याचा संभव असतो' असें स्वतः गांधीच 'प्रसाददीक्षे'त म्हणतात; आणि त्यांच्या मतें, चूक कबूल करणें हेंच तिचें उत्कृष्ट परिमार्जन होय. परंतु हे कबुलीजबाब स्वखुषीनें दिले गेले तरच त्यांमुळें 'आत्मशुद्धि' होण्याचा संभव आहे, नाहींतर स्टॅलिननें झिनोव्हिफ्प्रभृतींकडून घेतलेल्या कबुली-जबाबांच्या मानानें त्यांचें स्वरूप कितीहि सौम्य असलें तरी ते त्याच कोटींत जमा होतात, हें उघड होय. ज्या वातावरणांत गांधींनीं खऱ्यांकडून तो कबुलीजबाब मागितला तें वातावरण सोज्वळ आणि विशुद्ध नव्हतें, हें गांधी देखील कबूल करतील.

खरे-प्रकरणासारखे कांहीं अपवाद सोडले तर गांधींचें जीवन माहात्म्य आणि मुत्सद्देगिरी या दोनहि कसोटींवर टिकूं शकेल अशी माझी समजूत आहे. गांधी हे एक वस्ताद मुत्सद्दी आहेत, हें त्यांच्या चिकित्सक चाहत्यांस आणि टीकाखोर शत्रूस, सर्वांनाच मान्य होईल. परंतु महात्मा !---गांधींच्या सार्वजनिक जीवनाचा प्रमुख विशेष जें नाट्य तें त्यांच्या माहात्म्यास कसें काय शोभून दिसतें असा प्रश्न विचारतां येतो. हिंदुस्थानच्या राजकीय रंगभूमीवरील गांधी हे एक अभिजात 'नट' आहेत याबद्दल वादच नाहीं; परंतु महात्मा हा सामान्यांहून निराळा असतो आणि सर्वसाधारण जगाला त्याची वर्तणूक अभिनयाप्रमाणें भासण्याचा संभव असतो, हें लक्षांत धरलें

पाहिजे. महात्म्याची साहजिक वागणूक सामान्यांना नाट्याप्रमाणें वाटली तर तो महात्म्याचा दोष खात्रीनें नाहीं.

तें कांहींहि असलें तरी गांधींचें सबंध जीवन 'नाट्य'प्रसंगांनीं भरलेलें आहे व त्या प्रसंगांमुळें त्यांच्या कार्यास भडक उठावहि मिळालेला आहे. त्यांचा दांडीचा जगप्रसिद्ध 'मार्च' पाहा; बकिंगहॅम पॅलेसमध्यें त्यांनीं, प्रभावी साम्राज्याच्या विलोभनीय वैभवाचीं चिन्हें मिरवणाऱ्या बादशहाची दरिद्रीनारायणाच्या तुटपुंज्या पोशाखांत भेट घेतली तिकडे नजर टाका. या अशा प्रसंगांची विस्मृति कधीं तरी पडणें शक्य आहे काय ?

गांधींची लुंगी, त्यांचा पंचा, त्यांचा सोटा, फार काय त्यांची शेळी देखील—ही त्यांच्या अभिनयाची बोलकी सामुग्री आहे. चित्रपटसृष्टींत चार्ली चॅपलीनच्या बेडौल बुटांना, सुरकुतलेल्या कोटाला, घोंगळभोट पाटलोणीला, बेढब टोपीला आणि किरकोळ काठीला जें महत्त्व आहे तेंच हिंदुस्थानच्या सार्वजनिक सृष्टींत गांधींच्या या अभिनयसामुग्रीला आहे. इंग्लंडमध्यें, गांधींनीं 'चार्ली चॅपलीन तें काय ?' असा बावळट प्रश्न ( कदाचित् बुद्धया ) विचारला होता, तेव्हां ही तुलना त्यांच्या पुढें मांडून त्यांना उत्तर मिळालें असतें तर त्यांनीं, आत्मचरित्राच्या नव्या आवृत्तींत, गोखले, टॉलस्टॉय, रस्किन, थोरो या गुरुमालिकेंत चार्ली चॅपलीनलाहि स्थान दिलें असतें, असें मला वाटतें. गांधींचें हें नाट्य मुत्सद्देगिरीचें द्योतक असो कीं माहात्म्याचें असो, बिकट प्रसंगांतून स्वतःचा बचाव करून घेण्यासाठीं त्याचा उपयोग गांधींना अनेकदां झाला आहे. अंतःकरणांतील भाव उत्कट झाल्यामुळें म्हणा कीं डोक्यांतील बुद्धीला धार आल्यामुळें म्हणा अशा प्रसंगीं गांधींचा अभिनय उत्कर्षाला चढतो, एवढें खरें. गांधी–अर्विनतहावर कॉंग्रेसच्या पसंतीचा शिक्कामोर्तब करून घेण्यासाठीं ते कराचीला आले होते, तेव्हांची हकीगत. ऐन सुमारास सर-

कारनें भगतसिंगला फांशीं द्यावयाचें ठरवून त्यांचें कार्य बिकट करून सोडलें. या फांशीनें सर्व जहालमतवादी बिथरले. क्रांतिकारकांचा एक ताफा गांधींच्या झोपडींत शिरला–व 'ही फांशीं थांबवा; सर्व क्रांतिकारकांची मुक्तता करवा; नाहींतर समेट फेंटाळून लावा' अशी निकराची मागणी त्यानें केली. क्रांतिकारकांच्या त्या, सात्विक संतापानें रक्तवर्ण झालेल्या, मुद्रांवर नजर स्थिरावण्याची गांधींची ताकद नव्हती. त्यांच्याशीं वादविवाद करण्याचीहि सोय नव्हती. गांधींचें 'नाट्यास्त्र' बाहेर पडलें. त्यांनीं त्या समुदायापुढें आपली मान धरली आणि सांगितलें, 'माझ्यावर विश्वास नसला तर माझा शिरच्छेद करा.' भावनाप्रधान आणि भावनाविवश क्रांतिकारकांचा तो समुदाय या अंगविक्षेपानें चकित झाला, आणि गांधींच्या प्रामाणिकपणाचीं स्तुतिगीतें गात झोपडींतून बाहेर पडला !

गांधींची उपरोक्त अभिनयसामुग्री महात्म्याच्या अभिजात साधेपणाची निदर्शक असो किंवा मतलबी मुत्सद्देगिरीनें स्वीकारलेली असो, बहुजनसमाजावर छाप ठेवण्यास तिचा खूपच उपयोग झाला आहे. गांधी केवळ बहुजनसमाजाचा म्हणजे बहुसंख्य हिंदी जनतेचा पोशाखच करतात असें नव्हे, तर बहुजनसमाजाचीच भाषा ते बोलतात. गांधींनीं आपल्या बुद्धिमत्तेचा दिमाख मिरविला नाहीं किंवा विद्वत्तेचें अवडंबर माजविलें नाहीं, हेंच त्यांच्या लोकप्रियतेचें एक रहस्य आहे. बहुजनसमाजाला तेजस्वी व तुफान बुद्धिमत्तेच्या माणसाबद्दल एक प्रकारचा अविश्वास वाटतो, कारण त्याचे बुद्धिदीपक विचार बहुजनसमाजाच्या माफक बुद्धिमत्तेच्या कक्षेंत शिरत नाहींत. इतकेंच काय, पण आपल्यापाशीं जो गुण नाहीं तो गुण त्याच्यापाशीं प्रकर्षानें आढळत असल्यानें बहुजनसमाज न्यूनगंडानें प्रेरित होतो, व त्याचा थोडाबहुत दुस्वासच करतो.

रशियांत ट्रॉट्स्कीवर स्टॅलिन मात करूं शकला, याचें हें एक कारण आहे. आपल्याकडे रॉयसारख्या बुद्धिमान् नेत्याला बहुजन-

समाजांत अनुयायांची वाण पडते, याचेंहि एक कारण हेंच असावें. बहुजनसमाजाचा गोंधळ उडवील किंवा मत्सर जागृत करील असें बुद्धिमत्तेचें प्रदर्शन गांधी कधींहि करीत नाहींत. याचा अर्थ कोणी कोणी असा करतात कीं, गांधी निर्बुद्ध आहेत. नेहरू-राजगोपालाचार्य-अबुल कलम अझादसारखे अत्यंत बुद्धिमान् इसम गांधींचें नेतृत्व आनंदानें मानतात ही एकच गोष्ट या आरोपाचें निराकरण करावयास पुरेशी आहे. गांधी बुद्धिवान् आहेत, पण त्यांची बुद्धि एकांगी आहे; आणि अध्यात्मवादाचें आवरण तिनें घेतलें असल्यामुळें तिची तेजस्विता सहसा प्रत्ययास येत नाहीं, एवढेंच. अध्यात्मवादामुळें डोक्यापेक्षां हृदयाला ते अधिक महत्त्व देतात म्हणूनच कीं काय ते विद्वत्तेलाहि बेताबातानें वागवितात. गोखल्यांच्या भारतसेवकसमाजाचे सदस्य होण्याच्या इराद्यानें जेव्हां गांधी पुण्याला गेले तेव्हां तेथील विलोभनीय ग्रंथालयांत फेरफटका करण्याच्या फंदांत न पडतां प्रथम त्यांनीं झाडू व घमेलें उचललें व पायखान्याची शुद्धि आरंभली ! आत्मशुद्धीचा हा प्रकार व्यवहारी गोखल्यांना जरा कसासाच वाटला, व त्यांनीं या आपल्या नूतन शिष्यास ताळ्यावर आणण्यासाठीं समाजाच्या लायब्ररींत नेलें आणि हिंदी राजकारणाचा उंबरठा ओलांडण्यापूर्वी तेथील नानाविध ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा उपदेश केला. या उपदेशाची संभावना गांधींनीं ज्या उद्गारांनीं केली त्या उद्गारांमुळें गांधींच्या विचारसरणीची दुराराध्यता गोखल्यांच्या चांगलीच ध्यानांत आली असावी. गांधी, त्या कपटांतून स्वागतपूर्ण दृष्टिक्षेप करणाऱ्या पुस्तकांकडे एक बेफिकीर कटाक्ष टाकून म्हणाले, ‘ हीं इतकीं पुस्तकें येथें कशाला हवींत ? कांहीं थोडीं निवडक पांचपन्नास पुस्तकें असलीं म्हणजे पुरत नाहीं का ? ’ गांधी विद्वान् नाहींत; पृथ्वीवरील बहुतेक साऱ्या प्रश्नांवर अधिकाराच्या अभिनिवेशानें मत व्यक्त करण्याची त्यांना हौस असली तरी त्यांपैकीं कांहीं थोड्या प्रश्नांचाहि

त्यांनीं खोल व सूक्ष्म दृष्टीनें अभ्यास केलेला नाहीं; आणि विद्वान् व्यक्तींना आकर्षित करण्याचें अवघड कार्यहि त्यांना तितकेंसें साधलें आहे असें म्हणतां येणार नाहीं. ‘ आश्रम विद्वान् समाजाला आकर्षूं शकला नाहीं हें खरेंच आहे. कारण मी स्वतःला विद्वान् समजत नाहीं. शिवाय जे मूठभर विद्वान् आश्रमाकडे खेंचले गेले आहेत ते विद्वत्ता वाढविण्यासाठीं नव्हे, तर दुसरेंच कांहीं घ्यायला—वाढविण्याला—गोळा झाले आहेत, ’ असें ते स्वतःच ‘ प्रसाददीक्षे ’त म्हणतात. गांधी विद्वत्तेची कदर करीत नाहींत, उलटपक्षीं ते बुद्धीपलीकडील अध्यात्मवादाची पताका फडकवितात, म्हणूनच ते अक्कलमंद, अध्यात्ममोहित, श्रद्धाळू, भोळसट, परलोक-प्रवण व बौद्धिक दृष्ट्या भेकड अशा बहुजनसमाजाचे कोहिनूर बनले—असा युक्तिवाद एखाद्यानें केला तर तो खोडून काढणें सोपें आहे असें मला वाटत नाहीं. तें कांहींहि असलें तरी यामुळेंच ते बहुजनसमाजाची भाषा बोलतात हें कबूल केलें पाहिजे. गांधी विद्वान् पंडित नसतील, पण बहुजनसमाजाच्या अंतःकरणाला जाऊन भिडेल अशी भाषा लिहिण्याबोलण्याचें कसब त्यांजपाशीं आहे व हेंच त्यांच्या लेखनशैलीच्या साधेपणाचें रहस्य आहे.

गांधींची सत्य-अहिंसेची शिकवणूक माहात्म्य आणि मुत्सद्देगिरी या दोनहि कसोटींस उतरेल हें विशेष विस्तारानें सांगण्याचें कारण नाहीं. गांधीवादाचें सत्त्व एका शब्दांत सांगतां येईल : अहिंसा. अहिंसावाद साधुत्वाला धरून आहे हें उघड होय. हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितींत स्वराज्य-संपादनाचें उत्कृष्ट साधन ती ठरते ही त्या विचारसरणीची मुत्सद्देगिरी झाली. पण माहात्म्य आणि मुत्सद्देगिरी या दोनहि निकषांवर हा वाद टिकला म्हणून तो शास्त्र-शुद्ध ठरेल असें मात्र नाहीं. गांधींचें तत्त्वज्ञान शास्त्रीय ज्ञानाची मुळींच पत्राज राखीत नाहीं. विषयोपभोग व ब्रह्मचर्य यांवरील गांधींचे विचार हें या विधानाचें उत्तम उदाहरण आहे, व आपले

विचार शास्त्रीय ज्ञानाशीं विसंगत आहेत याची त्यांना जाणीव देखील आहे. ' जननेंद्रिय विषयोपभोगासाठीं नाहींच ही गोष्ट जर स्पष्ट झाली तर सगळीच दृष्टि बदलून जाते ' [प्र० दी० पृ. १२८] असें चमत्कारिक मत ते प्रतिपादन करतात, पण लगेच सांगतात कीं, ' नवें शिक्षण या मताला विरोध करतें. नवें शिक्षण मर्यादित विषयसेवन हा सद्गुण समजतें, व त्याची जरूर आहे असें सुचवितें.' [प्र० दी० पृ. १२८] ब्रह्मचर्यासंबंधींहि तेंच. अस्खलित ब्रह्मचर्याची महत्त्वाकांक्षा ते बाळगतात. ' वीर्यवान् असूनहि नपुंसक ' होण्यांत त्यांना धन्यता वाटते. हा आदर्श ते स्त्रीपुरुषांपुढें धरूं इच्छितात; पण त्यांना ठाऊक आहे कीं, 'आधुनिक विचार ब्रह्मचर्याला अधर्म समजतो. म्हणून कृत्रिम उपायांनीं संततिनियमन करून विषय-सेवनाचा धर्म तो पाळूं इच्छितो. ' पण आधुनिक विचारांची कदर गांधी करीत नाहींत.

'निर्विकार स्त्रीचा मासिकधर्म बंद होईल.' 'पूर्ण व्रतस्थ ब्रह्म-चाऱ्याला स्खलन होणार नाहीं' वगैरे त्यांचीं मतें मानसशास्त्राच्या व शरीरशास्त्राच्या दृष्टीनें निवळ थोतांडें आहेत, पण गांधींना याची पर्वा वाटत नाहीं. ते सरळ सांगतात कीं, ' मानसशास्त्र जाणणाऱ्यांवर माझा विश्वास नाहीं. ' [ प्र० दी० पृ. ६८ ] मात्र क्रोधाच्या बाबतींत अपवाद मानायला ते तयार असावेत असें दिसतें. गांधींचा रागीटपणा प्रसिद्धच आहे. त्याबद्दल ते म्हणतात, ' माझ्यामध्यें जो राग भरला आहे तो पुष्कळच मी गिळून टाकीत असतों. गिळतां गिळतां जो राहिला असेल तेवढाच दिसला असेल. तेवढासुद्धां जर दिसूं दिला नाहीं तर मी दंभी बनेन; किंवा सुकून जाऊन हाडांचा सांपळा बनेन.' [प्र० दी० पृ. ११०]. म्हणजे क्रोधाचें दमन केल्यानें शरीरावर त्याचा वाईट परिणाम होतो, हें गांधींना कबूल आहे. मग ' कामा 'ला तेवढाच हा नियम कां लागू नाहीं ? क्रोधापेक्षां काम हा विकार किती

तरी अधिक प्रबल असतो हें नवमानसशास्त्रज्ञांनाच नव्हे, तर पूर्वकालीन ऋषिवर्यांनाहि मान्य होतें. पण गांधी तिकडे दुर्लक्ष करतात. या अविचारी आततायीपणामुळें नीला नागिणी–प्रकरणांसारखीं प्रकरणें वारंवार उद्‌भवतातच, पण त्यांचे परिणाम आश्रमांतील व्रतस्थ स्त्रीपुरुषांच्या निःसत्त्व व सुतकी चेहऱ्यांवरहि तुम्हाला राजरोस दिसतील.*

गांधींचें ब्रह्मचर्याचें तत्त्वज्ञानहि, माझ्या मतें, त्यांच्या पूर्वायुष्यांतील अतिसेवनाची प्रतिक्रिया आहे. निरोगी, अविकृत मनाचें तें द्योतक नसावें. अतिसेवनानें निःसत्त्व बनलेल्या शरीराचें व मनाचें तें अंतकाळचें समाधान असावें. ज्या इंद्रियांनीं पूर्वायुष्यांत आपल्यावर इतका निर्विवाद जय मिळविला त्या इंद्रियांवर कुरघोडी करण्याच्या इच्छेंतून त्याचा जन्म झाला असावा. ही मीमांसा बरोबर असेल तर त्यांच्या या अत्याग्रहाला, निःसत्त्व शरीराची उन्नयनाची धडपड असेंच म्हणावें लागेल.

मानसशास्त्राप्रमाणें वैद्यकशास्त्र व आहारशास्त्र यांवरहि गांधींचे प्रयोग सदैव चालू असतात. आधुनिक वैद्यकशास्त्राबद्दल ते स्पष्ट उद्गार काढतात कीं, 'Medical science is the concentrated efforts of black magic. Quakery is infinitely preferable to what passes as high medical skill... Hospitals are institutions for the propagation of sin.' तरीपण १९२४ सालीं स्वतःवर बेतलें तेव्हां अशाच एका पापाची खाण असलेल्या हॉस्पिटलमध्यें जाण्यास आणि तेथें स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेण्यास ते तयार झाले. यावर कांहीं चोखंदळांनीं त्यांना

* या संबंधांत, चित्राच्या १९३८ च्या दिवाळी–अंकांत प्रसिद्ध झालेला माडखोलकरांचा 'मी शेंगांवला काय पाहिलें ?' हा लेख वाचनीय वाटेल.

वरेंच छेडल्यावर त्यांनीं स्वच्छ कबूल केलें कीं, 'मला जगायचें होतें. I wanted to live !' हें माहात्म्य कीं मुत्सद्देगिरी ?

गांधींचें समाजशास्त्रीय लिखाण देखील अशास्त्रीय आणि अनैतिहासिक स्वरूपाचें झालें आहे. हें सर्व लिखाण रामराज्याचा पुनरवतार घडविण्यासाठीं केलेलें आहे. त्यांच्या या रामराज्याला ऐतिहासिक पुरावा फारसा नाहीं, याची जाणीव त्यांना आहे. 'रामराज्य अवश्य काल्पनिक आहे, पण त्याला धरून असें कांहीं ना कांहीं पूर्वीं होतें,' [प्र० दी० पृ. ११४] एवढाच विश्वास त्यांना वाटतो. पण आपल्या ध्येयस्वप्नाच्या अनैतिहासिकतेबद्दल त्यांना विषाद मात्र मुळींच वाटत नाहीं. कारण त्यांच्या दृष्टीनें, 'इतिहासापेक्षां कल्पना श्रेष्ठ !' [प्र० दी० पृ. ७१] या कल्पनावादामुळेंच गांधी संस्थानांना रामराज्याचे अवशेष मानतात, आणि भांडवलवाले राष्ट्राचे विश्वस्त बनतील अशी त्यांना आशा वाटते.

गांधीवादी विचारसरणी आधुनिक शास्त्रांशीं इतकी विसंगत आहे कीं, तिचा निरपवाद स्वीकार हिंदुस्थाननें केला, तर "हिंदुस्थानचें लवकरच खादीच्या धूलिकामय गुदामांत रूपांतर होईल, जिकडे तिकडे कुरूपतेचे भयंकर नमुने मुलांबाळांस भेडसावूं लागतील, फ्रॉइडच्या प्रयोगशाळेंत रवाना करण्यास योग्य अशा विकृत व्यक्ती हमरस्त्यावर पागलखाना उभारतील, शेळीला अहिंसात्मक भाव चढेल, व एकंदरींत या दुर्दैवी देशाचा एक नमुनेदार 'झू' होईल" असें केव्हां केव्हां वाटूं लागतें. गांधीवादांतील अशास्त्रीयतेमुळें व गूढ अध्यात्मिकतेमुळें त्याचा पूर्णतः स्वीकार कोणत्याहि आधुनिक विचारसरणीच्या मनुष्यास करणेंच शक्य नाहीं. इतकेंच काय, पण गांधींच्या तत्त्वांचा निरपवाद स्वीकार केला तर तो त्या तत्त्वांनाच मारक झाल्याखेरीज राहणार नाहीं. उदाहरणार्थ, आत्यंतिक अहिंसा ही आत्यंतिक हिंसेइतकीच हिंसक होऊं शकते, व हें बॅ. सावरकरांनीं एकदां फार सुंदर तऱ्हेनें विशद करून सांगितलें

होतें. कांहीं दिवसांपूर्वी गांधींनीं ब्रिटिश जनतेला जो अहिंसेचा उपदेश केला होता त्याचा अवलंब ब्रिटिशांनीं कायावाचामनेंकरून केला असता तर त्याचाहि परिणाम आत्यंतिक हिंसेइतकाच हिंसक झाला असता हें उघड आहे. अहिंसावादाचा स्वीकार साधुत्वाच्या निरपवादपणानें केला तर तिचा अंतिम परिणाम हिंसेसारखाच होईल. परंतु अहिंसेचा स्वीकार चिकित्सक वृत्तीनें, म्हणजे अहिंसा ही जगांतील सर्व दुष्ट प्रवृत्तींत सुष्ट वृत्तीचा शोध करण्याची मोहिम असें न मानतां निसर्गावर विजय संपादन करण्यासाठीं योग्य कालीं वापरलेलें निःशस्त्र प्रतिकाराचें एक अस्त्र या बुद्धीनें केला तर गांधीवाद ही मानवजातीला एक अतिशय उपकारक विचारप्रणालि ठरेल.

याचें कारण स्पष्ट आहे. गांधीवादांत कांहीं कांहीं उदात्त अशीं तत्त्वें अंतर्भूत आहेत. या सर्व तत्त्वांचें वर्णन मी एका शब्दानें 'माणुसकी' असें करीन. माणुसकीचा मान राखण्याची इच्छा गांधीवादांत आहे. मानवतेची थोरवी गांधीवादाला समजूं शकते. दरेक व्यक्तीला मानव म्हणून कांहीं किंमत आहे, दरेक मानवाच्या व्यक्तित्वाच्या विकासानें एकंदर मानवजातीची संस्कृति वाढते, असा गांधीवादाचा विश्वास आहे. मनुष्यप्राण्याचा स्वार्थ, लोभ, त्याचा मत्सर, अहंकार, मूर्खपणा, भेकडपणा, दंभ, भोंदूपणा इत्यादि दुष्ट वृत्तींना गांधीवादांत अवकाश नाहीं. मानव प्राण्यांत जो उदात्ततेचा अंश आहे व ज्याचा आविष्कार कला, शास्त्र, वाङ्मय, तत्त्वज्ञान, न्यायबुद्धि, सौंदर्यपूजा इत्यादि गोष्टींत होतो त्या उदात्त अंशाची जोपासना करण्याबद्दल गांधीवादाचा कटाक्ष आहे. गांधीवादाच्या या विशेषांमुळेंच तो लोकसत्तेला पोषक होतो, कारण मानवी स्वभावांतील उदात्ततेवरच लोकसत्तावादाची उभारणी आहे. परंतु या गांधीवादाचा स्वीकार अतिशय चिकित्सक आणि विकासशील बुद्धीनेंच केला पाहिजे. जड पाशवी निसर्गाचें मानवांत जेव्हां परिवर्तन होतें तेव्हां तो उदात्त स्वरूप धारण

करतो, त्याला सदसद्विवेकबुद्धि, सत्यप्रिय न्यायबुद्धि प्राप्त होते. एकीकडे या उदात्ततेला आवाहन करावयाचें व दुसरीकडे 'निसर्गाकडे वळा' असा मानवजातीला पशुत्वाकडे नेणारा उपदेश करावयाचा ही विसंगति टाळून गांधीवादाचा स्वीकार झाला तर तो जगाच्या भवितव्याला अतिशय उपकारक ठरेल. या एकाच गोष्टीमुळें मला गांधीवादाबद्दल आदर वाटतो. कारण आजच्या नात्सी व सोव्हिएट हुकूमशाहींचे गोडवे गाण्याच्या काळांतहि माणुसकीची घोषणा करावयास मला शरम वाटत नाहीं; इतकेंच काय, माणुसकीबद्दल अनादर बाळगून तुम्हीं समाजरचनेचे कितीहि भव्य आणि उदात्त प्रयोग केलेत तरी ते अखेरीस जुन्या जुलमाचीच बदललेली आवृत्ति ठरल्याखेरीज राहणार नाहींत, हे मिस्टर युजेन लिऑन्स यांचे उद्गार मला अतिशय पटतात.

ता. २ ऑक्टोबर १९४०



# लिऑं ट्रॉट्स्की

रशियन राज्यक्रांतीचा प्रणेता म्हणून लेनिनचें श्रेष्ठत्व निखालस निरपवाद मानलें तरी इतिहासांत ट्रॉट्स्कीचेंच नांव अधिक क्षेत्रांत आणि अधिक विविधतेनें चमकत राहील एवढें कबूल केलेंच पाहिजे. याचें कारण अगदीं साधें आणि स्पष्ट आहे. ट्रॉट्स्कीची प्रतिभा, लेनिनच्या मानानें, अधिक तेजस्वी होती. तिची भरारी जशी अधिक उंच आणि अधिक नेत्रदीपक होती तसें तिचें उड्डाण देखील अधिक प्रांतांवरून होई. सोव्हिएट रशियाचे पहिले शिक्षणमंत्री कॉ. ल्यूनाचार्स्की यांनीं तर स्वच्छच म्हटलें होतें कीं, लेनिनच्या मानानें ट्रॉट्स्कीची प्रतिभा अधिक तेजस्वी, अधिक निरभ्र आणि अधिक चैतन्यपूर्ण आहे: He is more brilliant, he is more clear, he is more mobile.

ट्रॉट्स्कीचें श्रेष्ठत्व असें झगझगीत असूनहि थोरपणांत तो लेनिनच्या अगदीं जवळपास बसतो हें कबूल करण्यास सर्वसाधारण मनु-

ण्यास थोडेबहुत कष्टच पडतात. याचें कारण शोधण्यासाठीं फार खोलांत शिरावयास नको. ट्रॉट्स्की हा खरोखर कवडी किंमतीचा, परंतु परिस्थितीच्या लाटेवर उचलला जाऊन योगायोगानें रशियन क्रांतीचा एक—अनेकांपैकीं एक—नेता बनलेला उठावगीर होता, असा अविरत प्रचार स्टॅलिनवाद्यांकडून होत असतो, व या प्रचाराचे प्रहार सर्वसाधारण मनुष्याच्या मेंदूवर केव्हांतरी झालेले असतात. तरीपण लेनिनचें निरपवाद श्रेष्ठत्व लोकांच्या मनावर खोलवर रुतून बसण्याचें खरें कारण असें आहे कीं, रशियन राज्यक्रांति किंवा कम्युनिस्ट क्रांति हेंच लेनिन व ट्रॉट्स्की यांचें जीवनकार्य होतें, व म्हणून साहजिकच आपण त्यांच्या एकंदर कार्याकडे या एकाच दृष्टीनें पाहतों व तेवढ्यापुरतें पाहून श्रेष्ठत्वाच्या बाबतींत लेनिनच्या बाजूनें झटकन् कौल देऊन मोकळे होतों.

रशियन राज्यक्रांतीचा प्रणेता म्हणून लेनिन ट्रॉट्स्कीहून श्रेष्ठ होता, ही गोष्ट वाद घालून ठरविण्याचें खरोखर काय कारण आहे? ती गोष्ट जवळ जवळ स्वयंसिद्ध मानली जाते. पण याहि बाबतींत एकदोन गोष्टींचें अवधान राखिलें पाहिजे. लेनिन काय अगर ट्रॉट्स्की काय, रशियांत मार्क्सवादाचा पाया घालण्याचें, रशियाच्या 'स्थितप्रज्ञ' प्रकृतीला या क्रांतिकारक तत्त्वज्ञानाची तोंडओळख करून देण्याचें श्रेय त्यांच्यापैकीं एकाकडेहि जात नाहीं. तें उज्ज्वल कार्य जॉर्ज प्लेखानॉव्ह यानेंच केलें. रशियन मार्क्सवादाचा मूळ पुरुष प्लेखानॉव्हच होता व त्याच्याशीं पुढें जीवनमरणाचा मतभेद झाल्यानंतरहि लेनिननें त्याचें श्रेष्ठत्व सदैव मान्य केलें. आणि प्लेखानॉव्हच्या या कार्याचा आणि त्याच्या ग्रंथाचा तो नेहमींच अत्यादरानें उल्लेख करी.

दुसरी विशेष महत्त्वाची गोष्ट अशी कीं, रशियन क्रांतीच्या विकासाचें खरें स्वरूप ट्रॉट्स्कीच्याच ध्यानांत सर्वांच्या अगोदर—लेनिनच्याहि अगोदर—आलें होतें. रशियन क्रांतीचा विकास

ट्रॉट्स्कीच्या शोधक बुद्धीनें आणि ध्येयदर्शित्वानें, इतर कोणत्याहि मार्क्सवाद्याच्या अगोदर, १९०५ सालीं, जसा पाहिला तसाच तो १९१७ सालीं झाला. १९०५ सालच्या क्रांतीच्या धुमाळींत ट्रॉट्स्कीनें तिचें नेतृत्व स्वीकारून आपलें क्रांतिकारक नेतृत्व इतिहासाच्या प्रयोगशाळेंत प्रत्ययास आणून तर दिलेंच, पण आपला ' अखंड क्रांती 'चा जगप्रसिद्ध सिद्धान्त कल्पून आपली मार्क्सवादी बुद्धिमत्ता किती प्रखर आणि साहसी आहे याचीहि कल्पना आणून दिली. ट्रॉट्स्कीच्या या सिद्धांतानें मवाळ मेन्शेव्हिक तर भेदरलेच, पण स्वत: लेनिन देखील स्तिमित झाला. इंग्लंड–अमेरिकेमध्यें आहे तशा स्वरूपाची भांडवली लोकशाही स्थापन करणें हेंच रशियन क्रांतीचें कार्य आहे, असें मेन्शेव्हिकांचें मत होतें; तर त्याच्या उलट ' कामकरी–शेतकरी वर्गाची अनियंत्रित लोकसत्ता ' असें क्रांत्युत्तर सत्तेचें स्वरूप लेनिनच्या ध्येयवादी नजरेस पडत होतें. परंतु ट्रॉट्स्कीनें स्वच्छ सांगितलें कीं, ' एकदां क्रांति सुरू झाली म्हणजे तिचें स्वरूप असें मर्यादित राहणें शक्य नाहीं. क्रांतीनें जागृत झालेला कामगार वर्ग आपल्या विशिष्ट मागण्या पुढें करील, त्या मागण्यांना शेतकरी वर्गाचे प्रतिनिधि विरोध करतील व म्हणून कामगारांना अखेरीस आपली अनियंत्रित हुकमत प्रस्थापित करावी लागेल. [ यांतूनच ट्रॉट्स्कीचा अखंड जागतिक क्रांतीचा सिद्धांत निर्माण होतो, पण त्याची चर्चा येथें नको. ] १९०५ सालीं लेनिनला ट्रॉट्स्कीचे सिद्धांत पटले नाहींत, पण पुढें लेनिनच्या धोरणांत अनेक बदल झाले व शेवटीं १९१७ सालीं त्याचा दृष्टिकोन ट्रॉट्स्कीच्या दृष्टिकोनाशीं बराच जुळता झाला. एकच महत्त्वाचा फरक उरला होता. क्रांतीनें प्रस्थापित केलेल्या ' लोकसत्तावादी ' सरकारांत कामगारांच्या प्रतिनिधींचें अल्पमत राहिलें तरी चालेल कीं नाहीं, या प्रश्नावर मतभेद शिल्लक राहिला. लेनिननें ह्या प्रश्नाचें होकारार्थी उत्तर दिलें, पण पुढें नोव्हेंबरांत 'संयुक्त सरकारां'त बोल्शेव्हिकांनाच

निर्विवाद बहुमत मिळालें पाहिजे असा लेनिननें आग्रह धरला; म्हणजे पर्यायानें ट्रॉट्स्कीचेंच मत मान्य केलें. म्हणून मॅक्स नोमॅड म्हणतात, It was, therefore, Trotsky's point of view which, in fact, prevailed in 1917. रशियन क्रांतीच्या ऐतिहासिक प्रयोगशाळेंत क्रांतीच्या अनेक सिद्धांतांवर प्रयोग झाले व त्यांत ट्रॉट्स्कीचाच सिद्धांत तावून सुलाखून निघाला.

या नोव्हेंबर क्रांतीमध्यें प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें लेनिनपेक्षां ट्रॉटस्कीच अधिक प्रभावी ठरला, हें ट्रॉट्स्कीच्या एकंदर व्यक्तित्वास धरूनच झालें. ट्रॉट्स्कीचा स्वभावच तसा होता. कोठेंहि क्रांतीची ठिणगी उडाली कीं त्याचें सारें चैतन्य नुसतें फुलत असे. त्याचें सारें तेज, सारा उत्साह, सारा आशावाद अशा वेळीं उत्कर्षाला पोंचे व तो एकदम क्रांतीच्या नेतृत्वपदावर तळपूं लागे. पूर्वी १९०५ सालच्या क्रांतींत हेंच झालें होतें. रशियन समाजवादी पक्षाच्या मेन्शेव्हिक अगर बोल्शेव्हिक, कोणत्याहि शाखेचा तो सभासद नसून देखील क्रांति सुरू झाली तेव्हां अल्पावधींतच तो तिचा नेता बनला. त्या वेळीं कोणी तरी लेनिनला जरा मत्सरयुक्त स्वरांत म्हटलें, ' आज सर्वांत सामर्थ्यशाली व्यक्ति ट्रॉटस्कीच बनली आहे. ' त्यावर लेनिन लगेच गंभीर मुद्रेनें म्हणाला, ' मग त्यांत काय झालं ! ट्रॉटस्कीनें हें यश स्वतःच्या अविश्रांत परिश्रमानें व ठसठशीत कर्तृत्वानें मिळविलें आहे.' [Well, Trotsky has won this by his tireless and striking work. ] नोव्हेंबर-क्रांतींत ट्रॉट्स्कीनें कांहीं विशेष असामान्य कामगिरी केलेली नाहीं असें सिद्ध करण्याची जीवापाड धडपड स्टॅलिनवादी आज करीत असतात, आणि त्यासाठीं सत्याचे हवे तसे मुडदे ते विकृत उत्साहानें पाडीत असतात; परंतु १९१८ सालीं स्टॅलिननेंच ट्रॉट्स्कीच्या नेतृत्वाचा गौरव पुढील शब्दांत केला होता. प्रावदा पत्राच्या २४१ नं. च्या अंकांत लिहितांना स्टॅलिन म्हणतो, " १९१७ च्या क्रांतींतील सर्व

प्रत्यक्ष संघटना पेट्रोग्राड सोव्हिएटचा अध्यक्ष कॉ. ट्रॉट्स्की याच्याच साक्षात् नेतृत्वाखालीं झाली. सोव्हिएटच्या बाजूस तेथील शिबंदी तेव्हां आली याबद्दलचें सारें श्रेय, तसेंच क्रांतिकारक लष्करी कमिटीचें कार्य हें मुख्यत: व प्रथमत: ट्रॉटस्कीच्याच पदरांत टाकलें पाहिजे. " नोव्हेंबर क्रांतीचा नेता लेनिनऐवजीं ट्रॉट्स्की बनला हा अर्थात् लेनिनचा दोष नाहीं. लेनिन त्या वेळीं फिनलंडमध्यें अज्ञातवासांत होता. प्रत्यक्ष क्रांतीच्या ठिकाणीं हजर होऊन तिचें नेतृत्व स्वीकारणें त्याला शक्य नव्हतें. आणि ट्रॉट्स्कीसारखा असामान्य धडाडीचा आणि विद्युद्गतीचा प्रतिभाशाली पुरुष तेथें दुसरा कोणी नव्हता. ट्रॉट्स्कीला मिळालें तें स्थान नैसर्गिकच होतें. लेनिनच्या पार्श्वभूमीवर ट्रॉट्स्कीचीच प्रतिमा त्या वेळीं विजलीप्रमाणें चमकली, हा परिस्थिति आणि प्रतिभा यांचा ऐतिहासिक संयोगच होता !

नोव्हेंबर क्रांतीप्रमाणेंच क्रांतीनंतर जी यादवी माजली तींतहि ट्रॉट्स्कीनें असामान्य कर्तबगारी गाजविली व एक 'अचाट कर्तृत्वाचा लष्करी नेता' म्हणून जगभर कीर्ति संपादन केली. सतत दोन-अडीच वर्षें तो क्रांतीच्या संरक्षणार्थ, जागतिक भांडवलशाहीनें उठविलेल्या प्रतिक्रांतीच्या भुताशीं आघाडीवर झुंजत होता. कोठेंहि प्रतिक्रांतीचा ध्वनि उठला म्हणजे ट्रॉट्स्की तेथें जातीनें हजर राही—प्रतिक्रांतीच्या कल्लोळांत वेगानें शिरे आणि आपल्या अलौकिक वक्तृत्वानें सैनिकांचीं अंतःकरणें भरून टाकी व प्रसंगीं धाकदपटशा देऊन त्यांच्या भित्र्या मनाला सावरून धरी. ट्रॉट्स्कीची भेट म्हणजे विद्युल्लतेची चमक ! जेथें पूर्वी प्रतिक्रांतीचें वारें घुमे तेथें क्षणार्धांत क्रांतीच्या ठिणग्या उडत !

स्वत: लेनिननें युद्धशास्त्र आणि लष्करी डावपेंच यांचा कसून अभ्यास केला होता; पण प्रसंग येतांच या क्षेत्रांतलें ट्रॉट्स्कीचें श्रेष्ठत्व त्यानें आनंदानें मान्य केलें आणि त्याची युद्धखात्याच्या प्रमुखपदीं स्थापना केली. या पदावरून दुरून हुकूम सोडावयाची

सुरक्षित कामगिरी तेवढीच त्यानें केली असें नव्हे, तर कित्येकदां जातीनें रणधुमाळींत शिरून त्यानें प्रत्यक्ष मृत्यूशीं हस्तान्दोलन केलें होतें. कम्युनिस्टांच्या अभिमानाची जागती ज्योत अशी जी लाल फौज तिचा निर्माता म्हणून ट्रॉट्स्कीचें नांव इतिहासांत नेहमींच आदरानें घेतलें जाईल. ट्रॉट्स्कीच्या या कामगिरीचा लेनिनला अतिशय अभिमान वाटत असे. त्यानें मॅक्झिम गॉर्कीपाशीं एकदां उद्गार काढले होते कीं, 'Show me another man who could organise almost a model army in a single year and win the respect of military experts. We have Trotsky with us, we have everything. Miracles are going to happen!' [ एका वर्षाच्या अल्पावधींत अशी नमुनेदार फौज उभारणारा आणि लष्करी तज्ज्ञांच्या आदराचा विषय होणारा दुसरा एकादा इसम मला दाखवा पाहूं! आपल्यापाशीं ट्रॉट्स्की आहे. आतां चमत्कार घडणार आहेत, चमत्कार! ]

रशियन क्रांतीचा विकास ट्रॉट्स्कीच्याच ध्येयदर्शित्वानें अगोदर पाहिला; प्रत्यक्ष क्रांतीचें कार्य ट्रॉट्स्कीच्याच साक्षात् नेतृत्वाखालीं पार पडलें. क्रांतीनंतर माजलेल्या यादवीत क्रांतीचें रक्षण देखील ट्रॉट्स्कीच्या अचाट व्यक्तित्वानें केलें. असें जर आहे तर रशियन क्रांतीचा प्रणेता या नात्यानें तरी लेनिन ट्रॉट्स्कीहून श्रेष्ठ कसा? असा प्रश्न यावर सहजच विचारतां येईल. या प्रश्नाला अगदीं सरळ उत्तर असें कीं, स्वतः ट्रॉट्स्कीच लेनिनचें श्रेष्ठत्व मान्य करीत असे. ट्रॉट्स्की मोठा अभिमानी पुरुष होता. विनयाची बाधा त्याला फार करून कधीं झाली नाहीं. स्वतःच्या ऐतिहासिक स्थानाविषयीं त्याला पुरेपूर कल्पनाहि होती आणि खात्री देखील होती. आपल्या ऐतिहासिक स्थानाला धक्का लागूं नये म्हणून हवें तें दिव्य करावयास तो तयार असे. पण तो दुरभिमानी नव्हता, आणि भलत्याच महत्त्वाकांक्षेनें त्याला कधीं ग्रासलें नव्हतें. आपल्याहून निकृष्ट प्रतीच्या

माणसाला त्यानें खोटें महत्त्व ज्याप्रमाणें कधीं दिलें नाहीं त्याप्रमाणें आपल्याहून श्रेष्ठ माणसाला वंदन करावयासहि तो कधीं नाराज नसे आणि म्हणूनच लेनिनवर मतभेदाच्या प्रसंगीं हवी तितकी कठोर टीका करूनहि त्याला त्यानें नेता मानलें. उभ्या आयुष्यांत दोनच व्यक्तींचें निर्विवाद श्रेष्ठत्व त्यानें मान्य केलें: एक मार्क्स व दुसरा लेनिन.

लेनिनचें श्रेष्ठत्व ट्रॉट्स्कीला एकदम पटलें नाहीं. त्यासाठीं त्याला स्वतःशीं बराच झगडा करावा लागला. पण एकदां लेनिनचें श्रेष्ठत्व पटल्यानंतर मात्र त्यानें कसलाहि आखडतेपणा दाखविला नाहीं. त्यानें स्वतःच म्हटलें आहे, 'I came to Lenin fighting, but I came unreservedly and all the way.' रशियन राज्यक्रांतीच्या ऐतिहासिक स्वरूपाचें आपलें विश्लेषण जरी अधिक अचूक असलें तरी त्या क्रांतीसाठीं योग्य ती संघटना आणि राजकीय उपाययोजना लेनिननेंच आंखली होती, हें रशियन क्रांतीच्या दूरस्थ छाया दिसूं लागल्यावरोबर त्याच्या ध्यानांत आलें. १९०३ सालीं रशियन समाजवादी पक्षांत मेन्शेव्हिक व बोल्शेव्हिक अशी दुफळी पडल्यापासून हे दोन पक्ष पुनरपि एकत्र आणण्यासाठीं ट्रॉट्स्की धडपडत होता. परंतु रशियन क्रांतीचा वेग आणि तीव्रता जसजशी वाढूं लागली तसतसें मेन्शेव्हिक पक्ष किती कमअस्सल आहे व त्याला नेस्तनाबूत करण्याचें धोरण आंखण्यांत लेनिन किती बरोबर होता हें त्याच्या ध्यानांत आलें व त्यानें लेनिनचें नेतृत्व स्वीकारून बोल्शेव्हिक पक्षांत प्रवेश केला. राजकारणांतील पक्षविशिष्ट संघटनेस ट्रॉट्स्की लेनिनप्रमाणें लायक नव्हता. लेनिनचें मन जितकें चिवट तितकेंच लवचिक होतें. ट्रॉट्स्कीच्या मनाचा कणखरपणाच अधिक नजरेंत भरे. लेनिन अतिशय शांत स्वभावाचा आणि धिमा माणूस होता, तर ट्रॉट्स्की अस्थिर वृत्तीचा आणि संतापी होता. देवाणघेवाण करण्याची लेनिनची गोड आणि मृदु वृत्ति ट्रॉट्स्कीपाशीं नव्हती.

कोणाच्याहि मूर्खपणाची गय करण्यास तो कधींच तयार नसे आणि जगांत मूर्खांचाच बाजार अधिक, याचीहि अति तीव्र जाणीव त्याला असे. प्रो. लास्कींनीं म्हटल्याप्रमाणें, 'Trotsky has no power to suffer fools gladly, and he is profoundly aware that men are mostly fools.'

थोडक्यांत म्हणजे लेनिनचें राजकीय शहाणपण त्या जपाशीं बऱ्याच प्रमाणांत असलें तरी त्याचें व्यावहारिक शहाणपण त्याजपाशीं फारच कमी होतें. पण ट्रॉटस्कीची राजकीय दृष्टिदेखील लेनिनच्या इतकी लवचिक आणि भेदक नव्हती. मार्क्सच्या सिद्धांतांवर दोघांचेंहि सारखेंच प्रभुत्व होतें. मार्क्सवरील ट्रॉट्स्कीचीं भाष्यें त्याच्या प्रतिभाशालित्वामुळें अधिक तेजस्वी आणि चमकदार झालीं आहेत, परंतु मार्क्सच्या सिद्धांतांना परिस्थितीप्रमाणें बेमालूम कलाटणी देण्याची लेनिनची आश्चर्यकारक शक्ति ट्रॉट्स्कीपाशीं नव्हती; निदान त्या प्रमाणांत नव्हती. म्हणूनच मॅक्स ईस्टमनसारखा ट्रॉटस्कीचा पक्का पक्षपाती आणि जिव्हाळ्याचा मित्रसुद्धां असे उद्गार काढतो कीं, केव्हां केव्हां 'Trotsky substitutes the logical deductions from an intellectual *schema* for the full rich human sensing of a total situation which was Lenin's magic gift.'

मानवी जीवन हें कोणत्याहि तत्त्वज्ञानाच्या चवकटींत चपखल बसूं शकत नाहीं इतकें तें विविध आणि चैतन्यपूर्ण आहे हें सत्य लेनिनच्या रक्तांतच भिनलें होतें कीं काय नकळे !

लेनिनचें हें जादूमय व्यक्तित्व ट्रॉट्स्कीपाशीं नसल्यामुळें लेनिनचा आधार तुटल्याबरोबर त्याच्या तल्लख आणि तिखट व्यक्तित्वानें दुखावलेल्या दशम दर्जाच्या लोकांनीं अक्षरशः कट केला, आणि त्याला त्याच्या कर्मभूमींतून आणि मायभूमींतून हद्दपार केलें.

राजकीय नेतृत्वाची बाब सोडली तर लेखन आणि वक्तृत्व या दोन प्रांतांत ट्रॉट्स्कीच्या पासंगासहि लेनिन पुरला नसता. सबंध समाजसत्तावादी आंदोलनांत ट्रॉट्स्कीसारखा प्रतिभाशाली वक्ता दुसरा झाला नाहीं, असें ल्युनाचार्स्कीनें म्हटलें आहे. वक्तृत्वांत ट्रॉट्स्कीशीं मुकाबला करणारा दुसरा वक्ता म्हणजे वॉरेज [Juares]; आणि विरोधविकासवाद किंवा ऐतिहासिक भौतिकवाद असल्या तात्त्विक आणि गहन विषयांवर तीनतीन तास आपल्या अमोघ वक्तृत्वानें श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकणारा ट्रॉट्स्कीसारखा दुसरा वक्ता तोच. ट्रॉट्स्कीच्या वक्तृत्वाचें उत्कृष्ट वर्णन ल्युनाचार्स्कीनें पुढील वेंचक वाक्यांत केलें आहे:

"Effective presence, beautiful broad gesture, mighty rhythm of speech, loud, absolutely tireless voice, wonderful compactness,literariness of phrase, wealth of imagery, scorching irony, flowing pathos, and an absolutely extraordinary logic, really steel-like in its clarity—those are the qualities of Trotsky's speech. He can speak epigrammatically, shoot a few remarkably well-aimed arrows, and he can pronounce such majestic political discourses as I have heard elsewhere only from Juares."

[ परिणामकारक व्यक्तित्व, विस्तृत आकर्षक हावभाव, तालबद्ध भाषा, खणखणीत तजेल आवाज, आश्चर्यकारक सूत्रबद्धता, भाषा-प्रयोगाचें लालित्य, अलौकिक कल्पनाविलास, जळजळित उपहास, हृदयविदारक कारुण्य, लखलखित तर्कशुद्धता, युक्तिवादाचे अचाट प्रयोग, हे ट्रॉट्स्कीच्या वक्तृत्वाचे विशेष होत. तो सुभाषितांची खैरात करूं शकतो, त्याच्या वाग्बाणांचा नेम अचूक असतो, आणि भर सभेंत हवी तितकी भारदस्त राजकीय चर्चाहि त्याला वॉरेज-सारखी सहज साधते. ]

ट्रॉट्स्कीपुढें लेनिनचें वक्तृत्व म्हणजे विजेपुढें मेणबत्ती! तें कमालीचें तर्कशुद्ध आणि कोणाहि कामगाराला समजेल इतकें साधें आणि सरळ असे. हेंच त्याचें वैशिष्टय. वक्तृत्वाच्या इतिहासांत ट्रॉट्स्कीचें नांव सिसेरोप्रभृतींच्या बरोबरीनें तेजस्वितेनें विलसेल. त्या संदर्भांत लेनिनचें नांव उच्चारलें जाण्याचाहि संभव नाहीं.

ट्रॉट्स्कीच्या वक्तृत्वाचें ल्युनाचार्स्कीकृत वर्णन आवश्यक ते फेर-फार करून त्याच्या लेखनालाहि लावतां येतें. बर्नार्ड शॉनें एकदां ट्रॉट्स्कीचें वर्णन The Prince of Pamphleteers असें केलें होतें. साहित्यसृष्टींतील एका ' प्रिन्स 'नें दुसऱ्या ' प्रिन्स 'ला उद्देशून हे उद्गार काढले असले तरी ट्रॉट्स्कीच्या प्रतिभेचें विशालत्व शॉपाशीं नाहीं, एवढें मात्र स्पष्टपणें नमूद केलें पाहिजे. अलौकिक कल्पनाविलास, मर्मभेदक उपहास, बुद्धिदीपक तर्कवाद इत्यादि गुणां-मुळें ट्रॉट्स्कीचा अगदीं मामुली लेखहि अभिजात साहित्यांत जमा होतो. मग त्याच्या ' राशियन 'राज्यक्रांतीच्या इतिहासा 'सारख्या अपूर्व ग्रंथाचें वर्णन मि. एडमंड विल्सनसारख्या विचिकित्सक टीकाकारानें ' विसाव्या शतकाचें महाकाव्य ' असें केलें तर त्यांत आश्चर्य तें कसलें ? हा ग्रंथ अक्षरशः अपूर्व आहे. कारण रशियन क्रांतीसारख्या एका प्रचंड ऐतिहासिक घटनेचा शास्त्रशुद्ध इतिहास, त्याच घटनेच्या एका अतिप्रमुख नेत्यानें लिहिल्याचें इतिहासांतलें हें पहिलेंच उदाहरण आहे. या ग्रंथाइतकेंच त्याचें आत्मचरित्रहि चिरंतन स्वरूपाचें आहे, व आत्मचरित्रवाङ्मयांत त्याला, रूसोच्या अभिजात आत्मचरित्राइतकी प्रतिष्ठा खात्रीनें प्राप्त होईल. मान-वांचीं मनें भारून टाकण्याचें सामर्थ्य जोंवर थोर साहसांच्या वृत्तां-तांत आहे तोंवर हें आत्मचरित्र टिकेल, ' His Autobiography will live as long as men are moved by the record of a great adventure ' असें ट्रॉट्स्कीच्या आत्मवृत्ताबद्दल प्रो. लास्की यांचे उद्गार आहेत. ट्रॉट्स्कीची साहित्यविषयक निर्मिति

जितकी प्रतिभाशाली तितकीच ती बहुविध आहे. त्यानें इतिहास आणि आत्मचरित्र ज्याप्रमाणें लिहिलें त्याचप्रमाणें अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य, राजकारण यांवर प्रेरक, प्रवर्तक आणि प्रचारक प्रबंध लिहिले आणि मनोवेधक आठवणी देखील लिहिल्या.

रशियन वाङ्मयाची परंपरा फार थोर आहे. स्टॅलिनच्या राजवटींत मात्र ती खुंटलेली दिसते. सुदैवानें ट्रॉट्स्कीनें अमर स्वरूपाची साहित्यनिर्मिति केली आणि रशियन वाङ्मयाची लाज राखली. रशियन साहित्याच्या भविष्यकालीन इतिहासकाराला याबद्दल ट्रॉट्स्कीला धन्यवादच द्यावे लागतील.

ट्रॉट्स्की कांहीं धंदेवाईक लेखक नव्हता — तो साहित्यिक नव्हता. परन्तु साहित्यिकांची प्रतिभा त्याजपाशीं होती. ट्रॉट्स्कीच्या बालपणांतील एका हकीगतीवरून ही प्रतिभा किती अभिजात होती हें समजून येईल. तो आठनऊ वर्षांचा असतांना शिक्षणासाठीं एका नातेवाइकाकडे राहत होता. तेथें सर्जी आयव्हॅनोव्हिच नांवाचा एक नामांकित टीकाकार येत असे. ट्रॉट्स्कीसारखा तरतरीत मुलगा सर्जीच्या प्रथमदर्शनींच मनांत भरला. प्रथम भेटींतच त्यानें ट्रॉट्स्कीला पुश्किनची ‘ कवि आणि ग्रंथविक्रेता,’ व नेक्रासोव्हची ‘ कवि आणि नागरिक ’ या कवितांची तुलना करावयास सांगितलें. ट्रॉट्स्कीनें नेक्रासोव्हच्या कवितेचें नांवहि ऐकलें नव्हतें. परंतु आयव्हॅनोव्हिचला धीर कसचा ! त्यानें ती कविता तेथच्या तेथें एका पुस्तकांतून वाचायला सुरुवात केली; व ट्रॉट्स्कीला आपली हुशारी दर्शविण्यास एका तासाचा अवधि दिला. तासभरानंतर ट्रॉट्स्कीनें कांपऱ्या हातानें आपला लेख त्या ‘ श्रेष्ठा ’ च्या हातांत दिला व भयभीत अंतःकरणानें पुढें काय होणार याचा विचार तो करूं लागला. सर्जी आयव्हॅनोव्हिचनें तो लेख वाचला मात्र, क्षणार्धांत लेख हातांत धरून तो जवळ जवळ नाचूं लागला. ‘ किती हुषार पोरगा

आहे हो हा ! पहा, यानें काय लिहिलें आहे ! ' असें म्हणून आपल्या पाणीदार डोळ्यांनीं तो वाचूं लागला, 'The Poet lived with his beloved nature whose every sound both gay and sad echoed in the poet's heart. ' नऊ वर्षे वयाच्या पोराची ही रचना होती !


लेनिनच्या लेखनांत ही प्रतिभेची चमक फारशी कोठें नाहींच. त्याचें लेखन कमालीचें साधें, रोखठोक, व्यावहारिक आणि लालित्यशून्य होतें. कल्पनाविलासाचा लेनिनला अगदीं वीट होता. त्याच्या लेखनांत उपमा, उत्प्रेक्षा आणि अलंकार यांचा जवळ जवळ संपूर्ण अभावच असे. एखादी उपमा आलीच तर ती कमालीची कामचलाऊ असेल. अलंकारादि आभरणें हीं साहित्य-सृष्टींतील भांडवलशाहीचीं लक्षणें त्याला वाटत असत कीं काय नकळे ! लेनिनच्या लेखनाचा प्रमुख गुण म्हणजे तर्कवाद आणि युक्तिवाद—आणि त्याच्या शिकवणुकीचें सामर्थ्य ! युक्तिवाद अपुरा ठरला म्हणजेच मनुष्य शिव्यागाळीचें शस्त्र उगारतो अशी जी समजूत आहे तिला लेनिन हा मोठा ठळक अपवाद आहे. अतिसुन्दर युक्तिवादाला भयंकर शिव्याबाजीचें अस्तर जोडतांना तो अनेकदां आढळतो. तसेंच बेसुमार पुनरुक्तीमुळें लेनिनच्या लेखनाचा पुढें पुढें कंटाळा येऊं लागतो. ट्रॉट्स्कीची नवनवोन्मेषशाली प्रतिभा त्यांत नाहीं – व म्हणून केवळ वाङ्मयीन आनंदाकरितां ट्रॉट्स्कीचे ग्रंथ भावी कालांत वाचले जाण्याचा संभव आहे, तसा लेनिनच्या बाबतींत नाहीं. वक्तृत्वाप्रमाणें लेखनांतहि लेनिनला ट्रॉट्स्कीकडे वर टक लावूनच पाहिलें पाहिजे.

क्रांतिकारक नेतृत्व, प्रभावी वक्तृत्व आणि प्रतिभाशाली लेखन या गुणांप्रमाणेंच उज्ज्वल ध्येयवादासाठींसुद्धां ट्रॉट्स्कीचें नांव इतिहासांत अजरामर राहील. ट्रॉट्स्कीचा ध्येयवाद उज्ज्वल आणि सत्त्वशील असल्यामुळें स्टॅलिनपुढें नामोहरम झाल्यावर त्यानें अवि-

काराचा त्याग केला, मायभूमीचा निरोप घेतला आणि हद्दपारींत भटक भटक भटकण्याचा मार्ग स्वीकारला; पण ध्येयवाद सोडला नाहीं कीं स्वतःच्या प्रामाणिक मतांना मूठमाती दिली नाहीं! स्टॅलिननें त्याचें सारें वैभव हिरावून घेण्याचा प्रयत्न केला, त्यासाठीं सत्याचे हवे तसे मुडदे त्यानें पाडले, बोल्शेव्हिक क्रांतीच्या स्फूर्तिजन्य इतिहासाचें स्मरण करून देणाऱ्या अनेक गोष्टींचा त्यानें नायनाट केला; पण ट्रॉट्स्कीनें सत्त्व सोडलें नाहीं. इतक्या हालअपेष्टा, इतकी मानहानि त्यानें सोसली, परंतु स्वतःच्या वैयक्तिक सुखदुःखानें जगाचें मोजमाप करण्याइतकें त्याचें दिल कधींच कमकुवत झालें नाहीं. 'I do not measure the historical process by the yardstick of one's personal fate' असे तेजस्वी आणि तत्त्वनिर्भर उद्गार त्यानें काढले. अशा या थोर व्यक्तीवर एका मारेकऱ्यानें खुनशी हल्ला चढविला व तिचें पार्थिव शरीर नष्ट केलें. परन्तु या मारेकऱ्याच्या म्होरक्यानें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ट्रॉट्स्कीचें ऐतिहासिक कर्तृत्व नष्ट करण्यास जगांतील साऱ्या खुनशी संहारशक्ति अपुऱ्याच पडतील!

ऑक्टोबर १९४०

ग्रंथ संग्रह
निबंध
८०



# डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

डॉ. आंबेडकरांच्या आणि माझ्या पहिल्याच भेटींत त्यांजविषयीं माझा जो ग्रह झाला तो अद्याप कायम आहे; इतकेंच काय, पण उत्तरोत्तर तो वाढत आहे. डॉ. आंबेडकर हे अभिजात विद्वान् व तडफदार वृत्तीचे, दांडग्या आत्मविश्वासाचे आणि खमक्या स्वभावाचे गृहस्थ आहेत, हाच तो ग्रह होय. विविधवृत्ताच्या कचेरींत आम्ही बसलों होतों. डॉक्टरसाहेब रेडिओचे मि. झेड्. ए. बुखारी यांच्याशीं गांधींच्या तत्त्वज्ञानाविषयीं चर्चा करीत होते. आमच्या प्रथम भेटींतच डॉक्टरसाहेब गांधींविषयीं बोलतांना आढळावे हा योगायोग विलक्षण खराच ! तुम्हीं प्रो. न. र. फाटकांना केळकरांबद्दल बोलतांना कधीं ऐकलें आहे काय ! प्रो. फाटक आपल्या वाक्चातुर्यानें केळकरांची जी दुर्दशा करतात तशीच डॉ. आंबेडकर गांधींची करतात.

गांधींच्या अहिंसावादावर चर्चा चालू होती. डॉक्टरसाहेब आपल्या प्रखर जिव्हास्त्रानें आणि मुद्देसूद प्रतिपादनानें गांधींचें तें

प्रभावी तत्त्व केविलवाणें करून सोडीत होते. त्या प्रतिपादनाच्या भरांत जर्मनीच्या इतिहासाचीं पानें उलटलीं, फ्रेंच व रशियन क्रांतीचे दाखले मिळाले, बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची फोड झाली, बायबलांतील आधारांचा विचार झाला आणि भगवद्गीतेंतील मानीव अहिंसावादाचे वाभाडे निघाले. गांधींनीं भगवद्गीतेचा अर्थ कसा चुकीचा लावला आहे हें विशद करून सांगतांना डॉक्टरसाहेबांच्या संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासाचा जो साक्षात्कार झाला त्यानें मी अक्षरशः दिपून गेलों. डॉक्टरांचा संस्कृतचा अभ्यास म्हणजे लहानपणीं शाळेंत, अस्पृश्यवर्गांत जन्माला येण्याचा गुन्हा केल्याबद्दल संस्कृत विद्येस पारखें व्हावें लागलें त्याची केवळ प्रतिक्रिया आहे, हा विचार माझ्या मनास डसून गेला. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें शिकत असतांना आंबेडकरांनीं संस्कृत विषय घ्यावयाचें ठरविलें, तेव्हां गीर्वाण–भाषेच्या अध्यापकांनीं तो विषय त्यांना शिकविण्याचें साफ नाकारलें. ‘ संस्कृत ही देवांची भाषा. वेदांतील शब्द शूद्राच्या कानावर पडूं नये अशी वेदांची आज्ञा आहे. मग मी ही भाषा या अतिशूद्राला कशी शिकवूं ? ’ असा मुद्दा या धर्मनिष्ठानें उभा केला, आणि तें सरकारी हायस्कूल असूनहि अधिकाऱ्यांना कांहीं करतां आलें नाहीं, व आंबेडकरांना पर्शियन भाषा घ्यावी लागली–हा नामुष्कीचा इतिहास त्या वेळीं माझ्या नजरेसमोर उभा राहिला.

भगवद्गीतेवर बोलतांना, आंबेडकरांनीं साहजिकच ज्ञानेश्वरीचा उल्लेख केला, आणि मला, ‘ आंबेडकर ज्ञानेश्वरीवर उत्कृष्ट प्रवचन करतात ’ हे माझ्या एका स्नेह्यानें एकदां काढलेले उद्गार आठवले. ज्ञानेश्वरीवर बोलतांना आंबेडकर कसे तन्मयतेनें रंगून जातात याचें रसभरित वर्णन त्यानें मजपाशीं एकदां केलें होतें. असा गृहस्थ धर्मांतर करील ? आज आंबेडकरांची धर्मान्तराची भाषा मागें पडली असली तरी हा प्रश्न अजूनहि कोठें कोठें अगदीं आस्थेनें विचारला

जातो. कांहीं दिवसांपूर्वी अहमदाबादच्या महाराष्ट्रसमाजानें त्यांचा सत्कार केला तेव्हांहि हा प्रश्न विचारण्यांत आला होता. हा प्रश्न विचारणारांना डॉक्टरसाहेबांची एक आठवण नुकतीच माझ्या कानांवर आली ती मी सादर करूं इच्छितों. आंबेडकर अतिशय आजारी होते. त्या आजारांत माझे एक स्नेही त्यांना भेटायला गेले. तेव्हां डॉक्टर काय करीत असतील असें तुम्हांला वाटतें? त्यांच्या हातांत एक पुस्तक होतें. हें पुस्तक म्हणजे पी. जी. वोड-हाऊसची एखादी विनोदप्रचुर कादंबरी किंवा एडगर वॅलेसची एखादी सणसणाटीभरेली गुप्तपोलिसी कथा नव्हती. डॉक्टरांच्या हातांत ज्ञानेश्वरी [ कीं दासबोध ? ] होती. त्या रुग्णावस्थेंत, जगा-पासून अगदीं अलिप्त अशा आत्मचिंतनाच्या एकाकी स्थितींत डॉ. आंबेडकर हिंदूंच्या एका धर्मग्रंथाचें परिशीलन करतांना आढळले! आंबेडकर धर्मान्तर करतील असें मला वाटत नाहीं. आणि त्यांनीं दुसरा एखादा धर्म स्वीकारलाच तर तो बुद्धधर्मच ठरेल, असा माझा विश्वास आहे. डॉक्टर आंबेडकर बुद्धाचे भक्त आणि बुद्धधर्माचे चाहते आहेत. त्यांच्या दादर येथील बंगल्याला त्यांनीं 'राजगृह' असें नांव दिलें आहे, व राजगृहांतील दिवाणखान्यांत प्रवेश केल्या-बरोबर बुद्धाच्या एका भव्य व सुंदर चित्राचें दर्शन होतें. वेळ-प्रसंगीं आंबेडकरांचें गौतमप्रेम सहज उचंबळून येतें. तुम्ही त्यांच्या-बरोबर एखादें बुद्धकालीन लेणें पाहावयास जा म्हणजे तुम्हांला याची प्रतीति येईल. त्या बुद्धविहारांतील कलाकौशल्यांचें वर्णन करतांना ते बुद्धभिक्षूच्या त्यागी जीवनाचें सुंदर चित्र तुमच्या मन-श्चक्षूंपुढें रेखाटतील; आणि अशा वेळीं एखादा प्राचीन भिक्षू तुमच्यापुढें येऊन गौतमबुद्धाच्या तत्त्वज्ञानावर प्रभावी प्रवचनच करीत आहे कीं काय असें तुम्हांला वाटेल.

गौतमबुद्धाच्या त्यागी जीवनाबद्दल आंबेडकरांना कितीहि आदर असला तरी गांधींवाद्यांचें दरिद्री नारायणाचें थोतांड त्यांना कधींहि

मान्य होणें शक्य नाहीं. गडगंज संपत्तीची साक्ष देणारें बँकबुक खिशांत मिरविणाऱ्या खादीच्या कुडत्यांची ही दरिद्रीनारायणी मिजास कोणत्या सरळ बुद्धीच्या माणसाला पटेल? चार आण्यांची सफेत टोपी डोक्यावर ठेवली कीं हव्या त्या ऐषआरामाचा पासपोर्ट मिळतो, असा गांधीवाद्यांच्या दरिद्रिनारायणी तत्त्वांचा व्यावहारिक अर्थ आहे. आंबेडकरांना तो पटणें शक्य नाहीं. कारण जन्मापासून आंबेडकरांना ऐषआरामाची अगर चैनीची कधीं चटकच लागली नाहीं. आज कसलीहि आडकाठी नसतांना आंबेडकरांकडे नमुनेदार निर्व्यसनी म्हणून बोट दाखविण्यास कांहींहि हरकत नाहीं. सिग्रेटचेंहि व्यसन त्यांना नाहीं. मग दरिद्रीनारायणांची ढोंगी ऐट त्यांनीं कां सहन करावी? आजच्या कॉंग्रेसमध्यें गर्दी करून राहिलेल्या दरिद्रीनारायणांपैकीं एकानें तरी, डॉक्टर आंबेडकरांनीं सहन केल्या तशा हालअपेष्टा सहन केल्या असें कोणी दाखवून देईल काय? डॉक्टर आंबेडकरांचे वडील कै. रामजी मालोजी आंबेडकर हे लष्करांत सुभेदाराच्या हुद्दयावर होते. आंबेडकर त्यांचें चौदावें अपत्य. [ डॉक्टरांच्या स्वतःच्या विनोदी भाषेंत बोलायचें तर 'चवदावें रत्न!' ] कोरडी भाकर आणि कांदालसूण हें डॉक्टरांचें विद्यार्थिदशेंतील 'स्थायी' अन्न होतें. पुढें सयाजीरावांच्या मदतीनें बी. ए. झाल्यावर ते अमेरिकेस जाऊन कोलंबिया युनिव्हर्सिटींत जॉन ड्यूई यांच्या हाताखालीं एम्. ए., पीएच्. डी. झाले व बडोद्यास नोकरीस राहिले. हाच काय तो त्यांच्या जीवनांतील सांपत्तिक दृष्टया सुखाचा काल असें म्हणतां येईल. पण याहि अवधींत त्यांच्या जन्मजात अस्पृश्यतेमुळें त्यांना विलक्षण मनस्ताप सहन करावा लागला. कचेरींत त्यांच्या हाताखालचे कारकून त्यांच्याकडे दुरून कागद फेंकीत व त्यांना आपल्या टेबलालाहि स्पर्श करूं देत नसत. सायंक्लबमध्यें त्यांचे सहकारी त्यांच्या अस्पृश्यतेची चेष्टा करून त्यांचा बुद्धिपुरस्सर अपमान करीत. त्यांना घड

राहायलाहि जागा मिळेना. एका पारशाच्या हॉटेलमध्यें त्यांनीं कांहीं दिवस मुक्काम टाकला. पण आपली गिऱ्हाइकी तुटेल या भीतीनें त्यानेंहि त्यांच्यावर बहिष्कार पुकारला. अशा परिस्थितींत त्यांना बडोद्याची नोकरी सोडून मुंबईस यावें लागलें. कांहीं दिवस सिडनहॅम कॉलेजमध्यें प्राध्यापन केल्यावर ते बॅरिस्टरीच्या अभ्यासास गेले व फिरून त्यांच्या दरिद्री व खडतर जीवनास सुरुवात झाली. लंडन येथील त्यांच्या आयुष्यक्रमाचें वर्णन मी त्यांच्याच तोंडून ऐकलें, तेव्हां माझ्या अंगावर शहारे आले. ते ज्या बाईकडे राहत होते ती अगदीं नतद्रष्ट बाई होती [ "That landlady was a horrible woman. I am always praying for her soul; but, I am sure, she will go to perdition ! " ] "सकाळीं ती न्याहारीला मला काय देत असेल वाटतें तुम्हांला ? एक मांसाचा तुकडा, एक कप चहा, एक पावाची स्लाइस आणि गणपतीच्या कपाळाला गंध टेकतात त्याप्रमाणें त्या तुकड्याच्या टोंकाला लावलेला जॅम ! तें कदान्न खाऊन मी म्युझिअममध्यें वाचायला जाई. दुपारचें जेवण घ्यावयास मजपाशीं पैसेच नव्हते. तसाच मी अर्धपोटीं मी पांच वाजेपर्यंत वाचीत असें. घरीं आल्या-वर संध्याकाळचें जेवण—तें जेवण म्हणजे एक कप बॉव्हरीन आणि बटर बिस्किटस् ! नंतर पुनः वाचन ! रात्रीं १० ला कडकून भूक लागे. मग मी काय खात असें माहीत आहे ? माझ्या एका गुजराथी मित्रानें मला एक पापडांची करंडी दिली होती. ते भाजण्याकरितां एक पत्र्याचा तुकडा कोठून तरी मीं पैदा केला होता. तो माझा तवा ! त्यावर भाजलेले चार पापड आणि कपभर दूध, हें माझें अन्न ! असा राहत असें मी. महिना ८—८॥ पौंडांत गुजराण करीत होतों मी ! " या दरिद्री अन्नावर डॉ. आंबेडकरांनीं रोजीं अठरा-अठरा तास अभ्यास केला आणि The Problem of the Rupee सारखें पुस्तक लिहून त्याच्या प्रस्तावनेंत प्रो. कॅनन यांना

' या माझ्या शिष्याकडून मलाहि कांहीं शिकतां येण्यासारखें आहे ', असे अभिमानाचे उद्गार त्यांनीं काढावयास लावले ! लंडनच्या या मुक्कामांत लंडन युनिव्हर्सिटीचे एम्. एस्सी., डी. एस्सी., आणि बॅरिस्टर होऊन परत आल्यावर त्यांनीं सिडनहॅम कॉलेजच्या प्रिन्सिपॉलशिपकरितां अर्ज केला; पण येथेंहि त्यांची जात आडवी आली. डॉ. र. पु. परांजप्यांसारख्या बुद्धिवादी शिक्षणमंत्र्यालाहि त्यांची नेमणूक करतां आली नाहीं ! जन्मजात दारिद्य आणि अस्पृश्यता यांनीं आंबेडकरांचा पद्धतशीर छळवाद मांडला. पण यामुळेंच डॉ. आंबेडकर जागे झाले. हायकोर्ट जज्जशिप मिळवायची हें ध्येय १९२४ सालीं बोलून दाखविणाऱ्या आंबेडकरांनीं सरकारी नोकरीवर गंधाक्षता टाकून स्वतंत्ररीत्या प्रॅक्टिस करावयाची व अस्पृश्योद्धाराच्या कार्यास वाहून घ्यावयाचें ठरविलें.

पण वर वर्णन केलेले काबाडकष्ट आंबेडकरांनीं कां सहन केले ! इतकी सहनशीलता आणि चिकाटी दाखविणारी प्रेरक शक्ति कोणती असावी ? निर्भेळ ज्ञानलालसा हीच ती प्रेरकशक्ति होय. ज्ञानानंदापुढें डॉक्टरसाहेबांना इतर सर्व कांहीं तुच्छ आहे. विद्वत्तेमुळें येणाऱ्या मानसन्मानाचीहि त्यांना विशेषशी पर्वा नाहीं. १९१७ सालीं ते एम्. ए., पीएच्. डी. होऊन अमेरिकेहून परत आले, तेव्हां कांहीं अस्पृश्य पुढाऱ्यांनीं त्यांचा सन्मान करून त्यांना मानपत्र द्यावयाचें ठरविलें. तेव्हां आंबेडकरांनीं त्या लोकांना सांगितलें, " आपण मला मानपत्र देतां याबद्दल मी आपला फार आभारी आहे. परन्तु मला मानपत्र देण्याची कांहीं गरज नाहीं. मी कांहीं तुमच्यावर उपकार करण्याच्या बुद्धीनें शिकलों नाहीं. मला स्कॉलरशिप मिळाली. मी पीएच्. डी. झालों. माझ्याप्रमाणें इतरांना संधि मिळाली तर तेहि माझ्याप्रमाणेंच परीक्षा पास होतील. म्हणून माझ्या मानपत्रासाठीं जो पैसा जमविला असेल तो आपल्या अस्पृश्यवर्गातील लायक विद्यार्थ्यांस स्कॉलरशिपच्या रूपानें द्या. " डॉ.

आंबेडकरांच्या अंगच्या या गुणांमुळेंच ते अल्पावधींत इतके कमाल लोकप्रिय पुढारी झाले व अस्पृश्यांमध्यें त्यांनीं इतक्या झपाट्यानें जागृति केली. सन १९२७ सालीं महाडचा सत्याग्रह झाला. त्यापूर्वी अस्पृश्यांची चळवळ अशी नव्हतीच म्हटलें तरी चालेल. महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहांत आणि नाशिक येथील काळाराममंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहांत आंबेडकरांचें नेतृत्व तावून-सुलाखून निघालें. लोकमान्य टिळकांप्रमाणें निग्रही व तत्त्वनिष्ठ पुढारी ते आहेत याची खातरजमा तेव्हां झाली. ‘ डॉक्टर आंबेडकरांनीं आपल्या पक्षांतून ब्राह्मणांना वगळलें तर आपण आपल्या ब्राह्मणेतर पक्षातर्फे चवदार–सत्याग्रहास पाठिंबा देऊं ’ असें जवळकरांनीं डॉक्टरसाहेबांना सांगितलें. तेव्हां आपल्या अभिजात तत्त्वनिष्ठेस जागून त्यांनीं जवळकरांना स्पष्ट नकार दिला. एकदोन ब्राह्मणांना दूर करून शेंकडों ब्राह्मणेतरांचा पाठिंबा मिळविण्याची संधि त्यांनीं केवळ तत्त्वासाठीं गमाविली.

डॉक्टर आंबेडकरांच्या वाढत्या यशाचें रहस्य त्यांच्या उपरोक्त गुणांत ज्याप्रमाणें आहे त्याचप्रमाणें त्यांच्या प्रगमनशील विकासवादी विचारसरणींतहि आहे. संकुचित जातीय राजकारणाचे प्रवक्ते म्हणून त्यांनीं आपल्या सार्वजनिक जीवनास सुरुवात केली. महाडास मनुस्मृति जाळून त्यांनीं संपादिलेली मूर्तिभंजकाची कीर्ति किती लोकांना स्पृहणीय वाटली हें भास्करराव जाधवांसारखे ब्राह्मण्य-विध्वंसक तेव्हां बिथरून गेले, यावरून स्पष्ट होतें. पुढें सायमन कमिशनशीं सहकार्य केल्यामुळें मवाळांसकट सर्वांनींच त्यांच्यावर ‘ अराष्ट्रीय ’ असा शिक्का मारला. सायमन कमिशनच्या बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल कमिटीच्या रिपोर्टाला त्यांनीं जो जोरदार ‘मिनिट ऑफ डिसेंट ’ लिहिला तेव्हां हॉर्निमनसारख्या जहाल टीकाकारानें केलेल्या स्तुतीमुळेंच तो शिक्का जो कांहीं थोडाबहुत पुसून निघाला असेल तेवढाच. वर्तुळपरिषदेंत गांधींवर त्यांनीं चढविलेल्या हल्ल्यांमुळें

'राष्ट्रभक्तां'नीं पुनः त्यांचें नांव बद्दू करण्यास सुरुवात केली. पण या परिषदेंतील त्यांच्या कर्तबगारीमुळेंच इंग्रज मुत्सद्द्यांना व जनतेला त्यांच्या योग्यतेचा परिचय झाला, व त्यांची गणना एकदम अखिल-भारतीय दर्जाच्या पुढाऱ्यांत होऊं लागली. हिंदुस्थानांतील स्वातंत्र्यवादी मात्र त्यांजबद्दल बेदिलच होते. इतक्यांत दोन वर्षांपूर्वी त्यांनीं अकस्मात् स्वतंत्र मजूरपक्षाची स्थापना जाहीर केली आणि सर्व हिंदुस्थानचें चित्त आपल्याकडे खेचून घेतलें. तेव्हांपासून आंबेडकरांचा पक्ष सर्व जुन्या-नव्या विरोधकांना मूर्तिमंत आव्हान होऊन राहिला आहे.

या परिवर्तनाचा अर्थ उघड आहे. आजपर्यंत अस्पृश्यवर्ग अगदीं उकिरड्यावर होता. त्याला माणुसकीच्या उंबरठ्यावर आणून सोडण्यापूर्वी त्यांची चळवळ जातिवाचक होणें अपरिहार्यच झालें. आतां त्याला माणुसकीचे किमान हक्क प्राप्त झाले आहेत. यापुढें त्याची प्रगति समाजांतील कामगार-किसानांसारख्या दलितवर्गाच्या बरोबरीनें समाजवादाच्या दिशेनेंच होणार. अस्पृश्यांच्या उन्नतीला यापुढें दुसरी गतच नाहीं. अस्पृश्य हा समाजांतील सर्वांत खालचा थर. त्याची उन्नति झाल्याखेरीज एकंदर समाजाचा उद्धार झाला असें म्हणतां येणार नाहीं. ही उन्नति ज्याची त्यानें—म्हणजे अस्पृश्य वर्गानें—स्वतःच करून घेतली पाहिजे. अर्थात् सर्व समाजाच्या उद्धाराची ऐतिहासिक जबाबदारी पर्यायानें अस्पृश्यवर्गाकडेच आली. डॉ. आंबेडकरांनीं ती स्वीकारली हा त्यांच्या विकासशील बुद्धीचा पुरावाच होय. त्यांचें गतकालीन जातिवाचक राजकारण त्यांच्या प्रचलित दृष्टिकोनाला कमीपणा आणूं शकत नाहीं. निर्भेळ समाजसत्तावादाचा पुरस्कर्ता पॉल रॉबसन ज्या न्यायानें नीग्रोंची जातिविशिष्ट चळवळ आजहि करतो त्याच न्यायानें डॉक्टरसाहेबांची ती चळवळ समर्थनीय ठरते.

जानेवारी १९३९



# झेड्. ए. बुखारी

ऑल इंडिया रेडिओ-ऑफिसमधील एका टाइपिस्टच्या चुकी-मुळें स्टेशन-डिरेक्टर मि. बुखारी यांच्या आकर्षक व्यक्तित्वाचा नमुनेदार प्रत्यय आम्हाला आला.

माझे मित्र श्री. गजाननराव माडखोलकर यांच्या व्याख्यानाचें ' रिहर्सल ' घेण्यासाठीं मी, आमचे स्नेही प्रो. वि. इ. कुलकर्णी यांच्याबरोबर रविवारीं दुपारीं एक वाजतां रेडिओच्या इमारतींत प्रवेश केला. लिफ्ट् बंद असल्यामुळें आम्हांला जिना तुडवीत वर जावें लागलें, आणि आज सुट्टीचा दिवस याची तीव्र जाणीव आम्हांला झाली. पण याच दिवशीं आणि याच वेळीं माडखोल-करांना ' रिहर्सल 'साठीं बोलाविलें असल्याचें पत्र त्यांच्या खिशांत होतें. तें शिपायाजवळ देत आम्हीं प्रोग्रॅम-डिरेक्टर श्री. मर्ढेकर यांची चौकशी केली. पण मर्ढेकर आज गैरहजर असल्यामुळें तें

पत्र मि. बुखारी यांचेकडे गेलें आणि आम्ही त्यांची वाट पाहत वेटिंग-रूममध्यें बसलों.

* * *

थोड्याच वेळांत माडखोलकरांची चौकशी करीत एक सुमारें पावणेसहा फूट उंच, सडपातळ, देखणी मूर्ति थोडीशी डुलत व बरीचशी तरंगत आमच्या खोलींत आली. 'हेच ते बुखारी' हें आम्हीं तत्काल ओळखलें. त्यांच्या अर्धोन्मीलित, तरंगत्या व किंचित् बेहोष वाटणाऱ्या टपोऱ्या काळयाभोर डोळ्यांतहि एक प्रकारची भेदकता होती; व ती त्यांच्या चेहऱ्याच्या रुबावांत भर टाकीत होती. त्यांचे व्यवस्थित निष्काळजीपणानें मागें वळवलेले केंस त्यांच्या रेखीव चेहऱ्याला आकार देत होते.

आम्ही मर्ढेकरांची चौकशी केली.

' Mr. Mardhekar is enjoying his holiday. आज रविवार आहे. रविवारीं मर्ढेकरांचें कामहि मीच पाहतों.'

हा रुबाबदार गृहस्थ ताठ उभा राहून बोलत नव्हता. एका पायावरच कमरेंत किंचित् वांकून ते उभे होते. दुसरा पाय आपल्या जोडीदाराशीं गुणिलें चिन्ह करून ठेवलेला होता. बुखारींच्या पायाची हालचाल सारखी चालू होती. त्यांच्या पायांतील जरीच्या, उत्तर हिंदुस्थानी, हिरव्या रंगाच्या चपलाहि त्यांच्या विलासी व्यक्तित्वाचें दिग्दर्शन करीत होत्या. त्यांचा एकंदर रुबाब मर्दानी होता; पण त्यांत एक प्रकारची मोहक जनानी झांक होती !

'चला, आपण स्टुडिओ-रूममध्यें जाऊं.' असें म्हणून ते निघाले. इतक्यांत जिन्याजवळ लिफ्ट्मधून एक तेराचौदा वर्षांचा छोकरा हंसतमुखानें बाहेर पडला. त्याच्याकडे जिव्हाळ्याच्या आर्द्रतेनें पाहत ते तडक त्याच्याकडे गेले, आणि त्याची निमुळती हनुवटी कुरवाळीत उद्गारले, " My boy, arn't you a bit early ? "

* * *

आम्हांला स्टुडिओ-रूममध्यें बसवून बुखारी गेले; व मिनिट दीड मिनिटांतच परत आले. कांहींतरी घोटाळा झाला आहे असें सांगणारी भावना त्यांच्या चेहऱ्यावर होती.

'I never looked so stupid in my life.'

आम्हांला त्यांच्या या उद्गारांचा अर्थच कळेना. इतक्यांत माडखोलकरांचें पत्र टेबलावर पसरून त्यांनीं त्याचें स्पष्टीकरण करण्यास सुरुवात केली.–'या पत्रांत कांहीं तरी चूक दिसते. तुम्हाला रिहर्सल-करितां दुसरा कोणता तरी दिवस द्यावयास हवा होता. कारकुनानें चुकीची तारीख टाइप केलेली असावी. बरें, असो. मी घेतों तुमची रिहर्सल. मिस्टर माडखोलकर, तुम्ही या टेबलाजवळच्या खुर्चीवर– आणि तुम्ही–' 'तुम्ही कोण बरं?' या प्रश्नाची छटा त्यांच्या चेहऱ्यावर उमटली. वि. ह. कुलकर्ण्यांच्या ती तत्काल ध्यानांत येऊन त्यांनीं आमची ओळख करून देण्यास सुरुवात केली, 'हे धनुर्धारीचे संपादक मि. प्रभाकर पाध्ये आणि मी, मि. व्हि. एच्. कुलकर्णी. मी तुमच्या रेडिओवर कांहीं दिवसांपूर्वी बोललों होतों.'

'Oh! I remember!' इतकें म्हणून त्यांनीं आम्हांला त्या स्टुडिओ-रूममध्येंच बसविलें; आणि स्वतः बाहेर गेले व निमिषार्धांत कांहीं आठवल्यासारखें करून पुनः आंत आले व सरळ माडखोल-करांसमोर जाऊन बोलूं लागले, 'कालच्या 'धनुर्धारी'मध्यें मी एका ठिकाणीं राजकारणावर चर्चा करीत होतों असें छापलें आहे. 'Now I won't go and talk politics. I must talk fish!' मला आश्चर्य वाटलें. हे उद्गार काढतांना त्यांची पाठ आमच्या-कडे होती. ते माझ्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करीत होते असें दिसलें. वर्गांत एखाद्या विद्यार्थ्यावर जरा गंमतीनें रागावतांना मिस्किल वृत्तीचा प्रोफेसर त्या विद्यार्थ्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करून दुसऱ्याच एखाद्या विद्यार्थ्याकडे टक लावून बोलण्याचें ढोंग करतो, तशीच बुखारींची ती वागणूक मला भासली.

* * *

ते पुनः बाहेर गेले व पुनः आंत आले. 'Well, you must now be ready. This is going to be no easy task for you.' तुम्ही वर्तमानपत्रकार आहांत. तुम्हांला मी तसा सोडणार नाहीं. तुम्ही वर्तमानपत्राचे लोक मला नेहमीं छळतां. आतां माझी पाळी आली आहे. It is once in a blue moon that you newspapermen come into my clutches!'

हे उद्गार काढतांना बुखारींनीं चेहेऱ्यावर मोठा करडा भाव आणला. पण तो उसना असल्याचें स्पष्ट दिसत होतें. ते मनांतल्या मनांत खूप हंसत असावे.

इतकें बोलून ते शेजारच्या 'लिसनिंग-रूम'मध्यें गेले. थोड्याच वेळांत 'Now begin' असा उजवीकडल्या भिंतीला लावलेल्या जाळीच्या कर्ण्यांतून दरडावणीचा स्वर ऐकूं आला. मूळचा दमदार स्वर दम देणारा वाटला ही अर्थात् या यंत्राची करामत होती!

* * *

घसा साफ करून माडखोलकर वाचूं लागले. "माझ्या विद्यार्थि-मित्रांनो, तुम्हीं 'गड आला पण सिंह गेला' ही कादंबरी वाचली असेल..." दोनतीन मिनिटें हें वाचन चाललें असेल नसेल इतक्यांत फिरून दरडावणी झाली, 'कृपा करून जरा सावकाश वाचा.'

माडखोलकर जरा सावकाश वाचूं लागले. वाचलेल्या मजकुरा-पेक्षां वाचनाच्या गतीकडेच आमचें लक्ष खेचूं लागलें. इतक्यांत खोलीचा दरवाजा उघडला. बुखारी आंत आले आणि माडखोल-करांच्या टेबलासमोर जाऊन टेबलावर ओणवून म्हणाले, 'You are reading at least two hundred per cent fast! याच्या निम्या वेगानें वाचलें पाहिजे.' इतकें सांगून ते पुनः शेजारच्या खोलींत गेले.

पुनः पहिल्यापासून वाचन सुरू झालें. श्री. माडखोलकर हे 'सुशील पत्नी आणि सुंदर कन्यका' हे शब्द वाचतात न वाच-

तात तोंच पुनः यंत्रांतून आवाज आला, 'सुंदर कन्यका! You are still considerably fast. You must learn that fluency and speed are not the same thing. You seem to be excited–' सुंदर कन्यका!' तुम्ही कशाला तरी बुजलां आहांत का?' यंत्रानें दुर्दशा उडालेल्या त्या आवाजांतहि विनोदाचा स्वर ऐकूं येत होता.

'नाहीं. मी मुळींच बुजालेलों नाहीं. निदान तुम्हांला तरी खासच नाहीं!' बुखारींच्या विनोदाला विनोदानें उत्तर देत माडखोलकर म्हणाले.

तत्काळ तें यंत्र गरजलें, 'तुम्ही मला बुजलां नाहींत हें मी जाणतों. But some people are afraid more of the microphone than of its director!'

* * *

माडखोलकरांनीं आपल्या गतींत पुनः सुधारणा केली व स्वरांत अधिक धीटपणा भरला. या वेळीं वाचन बराच वेळ निर्वेध चाललें. आपण आतां तरबेज झालों, असा खुषीचा स्वर माडखोलकरांच्या वाचनांत येऊं लागला. इतक्यांत पुनः गर्जना झाली. 'Now you are reading all right. पण तुम्ही विरामचिन्हांना विसरूं नका. वाचतांना मधून मधून योग्य ठिकाणीं थांबा. माझ्या मतें वाचावयाच्या मजकुरांत विरामस्थलांना विशेष महत्त्व आहे. मी माझ्या विधानाचें प्रत्यंतरच देतों. मी एक उतारा तुम्हाला दोन प्रकारांनीं वाचून दाखवितों. एकदां विराम न घेतां व एकदां भरपूर विराम घेऊन. ऐका—'

इतकें बोलून बुखारींनीं फिल्डन यांनीं रेडिओवर जें नुकतेंच भाषण केलें होतें, त्यांतलाच एक उतारा वाचण्यास सुरवात केली. विरामचिन्हांना मुद्दाम वगळून तो वाचीत असतांना मला न्हाणीघरांत मोकळ्या सुटलेल्या नळाची आठवण झाली. नंतर त्यांनीं तोच

उतारा मधूनमधून विश्रांति घेऊन वाचण्यास सुरुवात केली. घडा घालून देण्याच्या बुद्धीनें तें वाचन चाललेलें नसतें तर त्यांतील विरामस्थलें विनाकारण ऐसपैस होतीं, व त्यांवर बुखारींची भारावलेली नजर त्यांना चुकवून डुलक्या घेत होती, असेंच मीं म्हटलें असतें. बुखारींचें हें सावकाश-वाचन मला तरी शर्यतींतल्या स्लो-सायकलिंगसारखें वाटलं! त्याच्या गतीला मधूनमधून विरामांचे खसके बसत होते.

एखाद्या आज्ञाधारक आणि विद्यातुर विद्यार्थ्याप्रमाणें माडखोलकर त्या वाचनाचे पाठ घेत होते. त्यांनीं आपलें वाचन सुधारून पुढें सुरू केलें. चारपांच मिनिटें तें ठीक चाललें. इतक्यांत त्यांना खोकला आला. तो पुरा होतो न होतो, तोंच भिंतीच्या जाळींतून खबरदार स्वर आला, 'Please delete that. तेवढें गाळा.'

'काय गाळा?'

'तो खोकला--Please delete that cough!' अर्थात् हें अशक्य झालें, कारण आम्ही सर्वच मोठमोठ्यानें हंसूं लागलों. खोकला आणि हास्य यांचें साहचर्य प्रकृतीच्या कांहीं विशिष्ट अवस्थांत टाळणें अशक्य ठरतें, हें सर्वांच्या अनुभवाचेंच आहे! तो खोकला दबल्यावर पुनः कसलीहि अडचण न उद्भवतां तें वाचन पुरें झालें व आम्हीं समाधानाचा श्वास टाकला.

*　　　*　　　*

इतक्यांत बुखारी आले. इतक्या उत्कृष्ट सूचना दिल्याबद्दल त्यांचे आभार कसे मानावे, हें माडखोलकरांना कळेना असें दिसलें. पण ते एवढेंच म्हणाले, 'I must thank you for the troubles you have taken for me.' या एकंदर कार्यक्रमाला बत्तीस मिनिटें लागलीं; व तसें सांगून, माडखोलकरांचें तें भाषण थोडें छाटून कमी केलें पाहिजे, असा अभिप्राय बुखारींनीं दिला.

' अधिक मला कांहीं सांगतां येणार नाहीं. कारण मला मराठी समजत नाही. तुमचें भाषण उर्दूत असतें तर मात्र तुम्ही असे सुखासुखी सुटलां नसतां. ' आम्हांला पोचवतां पोचवतां बुखारी बोलण्याच्या रंगांत येत आहेतसें दिसलें. लिफ्टच्या समोर जाऊन आम्ही बोलत उभे राहिलों.

ते माडखोलकरांना म्हणाले, ' तुमचा आवाज इतका अस्पष्ट कां येत होता ? ' त्यावर माडखोलकरांनीं सांगितलें, ' मी नुकताच इन्फ्ल्युएंझांतून उठलों आहें ! ' त्याबरोबर एकदम त्यांचा हात घट्ट धरून बुखारी सानुकंप स्वरांत उद्गारले, 'Oh, you seem to be feverish even now !–तुमच्या अंगांत आतांसुद्धां ताप असल्यासारखा दिसतो ! '

त्यावर माडखोलकर म्हणाले, ' छे छे ! आतां माझी प्रकृति अगदीं छान आहे ! फक्त खोकल्याचा त्रास होतो तेवढाच !'

' मींहि तुम्हांला पुष्कळ त्रास दिला ! उर्दू लेखक मला सैतान म्हणत असतात. त्यांचें भाषण मी सत्तर टक्के सुधारून घेतों. या भाषणाकडे निरनिराळ्या दृष्टींनीं पाहावें लागतें. नुसते वाङ्मयीन गुण जोखून भागत नाहीं. आपल्या भाषेंत असे कांहीं शब्द असतात कीं, ते मनुष्याच्या जिभेला नीट उच्चारतांच येत नाहींत; असे शब्द गाळावे लागतात. मला मराठी येत नाहीं. म्हणून मराठी लेखक माझ्या जाचांतून सुटतात. नाहीं तर –Any way you must excuse me... '

' Oh nothing—nothing. तुमच्या सूचना फारच उपयोगाच्या आहेत. ' माडखोलकर म्हणाले.

' खरं सांगूं ? मी दिल्या इतक्या सूचना कांहींच नव्हत. This is manifestly not enough. पण मला तुम्हांला अधिक सूचना देतां येत नाहींत. I know my limitations. अहो, आम्ही तुम्हांला देतों काय ? B. B. C.वर मीं चार भाषणें

केलीं. दर भाषणास मला २५ गिनी मिळाल्या. तसा मोबदला आम्हांला देतां येता तर ? मीं तुम्हांला दर भाषणागणिक शंभर रुपये दिले असते, तर मीं मला हवें तसें भाषण लिहून-वठवून घेतलें असतें. पण...Mr. Dhanurdhari criticises me for this and that ( हें अर्थात् माझ्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करून, )-पण आमचा काय इलाज आहे ? Considering our funds, we are giving you the best that is available in the land.'

या रिहर्सलच्या प्रसंगाचा देखील आपल्या धोरणाची तरफदारी करण्यासाठीं उपयोग करून घेण्याची ही चतुराई मजेदार होती. याच गुणाच्या जोरावर त्यांनीं आपल्या सगळ्या टीकाकारांना गप्प केलें आहे. आम्ही त्यांचे आभार मानून निघालों. इतक्यांत त्यांनीं माडखोलकरांना सांगितलें, 'उद्यां भाषणाच्या दहापंधरा मिनिटें अगोदरच या. उशीर लावूं नका. तुम्हांला उशीर झाला तर आमची धांदल उडेल. You mustn't be late or else we will be anxiously looking out of the windows !'

* * *

दुसऱ्या दिवशीं आम्ही वेळेवर गेलों. बुखारींच्या त्या खिडक्या तेथें बरोबर होत्या. फक्त त्यांतून बाहेर पाहायला बुखारीच तेथें हजर नव्हते !

आमचें स्वागत ढोलेकरांनीं केलें !

ता. १५ जानेवारी १९३९



# लो० माधवराव अणे

लोकनायक माधव श्रीहरि अणे यांच्या वयाला ता. २९ ऑगस्ट १९४० रोजीं साठ वर्षे पुरीं होतात; त्या निमित्तानें एक षष्ठ्यब्दिपूर्तिसमारंभ मोठ्या उत्साहानें साजरा होणार आहे. या समारंभाच्या तयारीकडे पाहिलें कीं न. चिं. केळकरांच्या तत्सम समारंभाचें स्मरण होणें अपरिहार्य आहे. अणे आणि केळकर हे दोघे लोकमान्य टिळकांचे आवडते शिष्य आणि लोकमान्यांच्या राजकारणाचा ध्वज फडकत ठेवण्याची कामगिरी या दोन शिष्यांनीं यशस्वितेनें पार पाडावी अशी आशा आणि इच्छा टिळकाभिमान्यांनीं सदैव बाळगिली. अलीकडे तर ही सारी आशा आणि इच्छा अणे यांच्या तेजस्वी व्यक्तित्वावर केंद्रित झाली आहे; कारण केळकरांनीं आपण राजकारणांतून निवृत्त झाल्याची घोषणा मागेंच करून टाकली.

खरें म्हटलें तर कोणत्याहि टिळकशिष्याला सार्वजनिक आयुष्यांतून निवृत्त होण्याचा हक्क नाहीं. टिळकांनीं राजकारणाचा स्वीकार एक व्यवसायधंदा किंवा उपजीविकेचें साधन म्हणून केला नाहीं. इंग्लंडसारख्या पाश्चात्य देशांतील राजकारणी पुरुषांप्रमाणें राजकारणाकडे त्यांनीं ' करीअर ' या दृष्टीनें कधींच पाहिलें नाहीं. राजकारण ही टिळकांना ' करीअर ' वाटत नव्हती; तो त्यांचा कर्मयोग होता. स्वतःला टिळकांचे प्रधान शिष्य मानणाऱ्या व्यक्तींना टिळकांचें धडाडीचें राजकारण न साधलें तरी आयुष्याच्या अखेरपर्यंत जमेल तसें राजकारण करीत राहणें एवढें तरी त्यांच्या हातांत निश्चित आहे. अर्थात् केळकरांनीं सार्वजनिक आयुष्यांतून निवृत्त झाल्याची घोषणा कितीहि जोरानें केली असली तरी तसे ते अगदींच निवृत्त झालेले नाहींत हें सहज सिद्ध करतां येईल. केळकरांच्या भाषेंतच बोलायचें झालें तर 'म्हटलें तर ते निवृत्त झाले आहेत, म्हटलें तर नाहींत.' पण टिळकांचें राजकारण पुढें चालविण्याच्या दृष्टीनें ते सार्वजनिक आयुष्यांत असून नसून सारखेच !

त्या मानानें बापूजी अणे यांनीं लोकमान्यांचे शिष्य या नात्यानें आपलें कर्तव्य अधिक चांगल्या रीतीनें पार पाडलें आहे. केळकरांच्या मानानें बापूजी अणे यांचेंच टिळकांशीं अधिक साधर्म्य आहे. टिळकांचे ते अधिक प्रमाणांत समानधर्मे शोभतात, व म्हणून टिळकांचे अनुयायी त्यांना ' छोटे टिळक ' म्हणतात तें अगदीं बरोबर आहे. दिसण्यांत ते साधारणपणें टिळकांची आठवण करून देतात. त्यांची ती ठेंगू देहयष्टि, त्यांची कू्रांतच जमा होण्यासारखी मुद्रा, त्यावरची गंभीर विचारशीलता व तन्निदर्शक अशा कपाळावरील दोन–तीन आंठ्या, त्यांच्या बोलण्या–वागण्यांतली घाई गडबड, व्यासपीठावर बोलण्याची त्यांची रीत, ती हातांतली काठी आणि डोक्यावरची पगडी–

टिळकच त्यांच्या रूपानें आजच्या राजकारणांत वावरत आहेत असें भाविक टिळकभक्तांना वाटलें तर त्यांत काय आश्चर्य ?

पण आकृतीप्रमाणें प्रकृतींत देखील ते टिळकांचे समानधर्मेच आहेत. लोकमान्य टिळक आणि लोकनायक अणे यांच्या स्वदेश-सेवेची व राजकारणाची स्फूर्ति एकच आहे. टिळकांप्रमाणेंच अणे देखील स्वराज्याच्या संग्रामाकडे भरतभूमीच्या सांस्कृतिक पुनरुज्-जीवनाचें एक साधन म्हणून पाहतात. हिंदुस्थानच्या प्राचीन संस्कृ-तीचा त्यांना टिळकांप्रमाणेंच ज्वाज्वल्य अभिमान वाटतो. या अभिमानामुळेंच ते हिंदूंच्या शास्त्रीय ग्रंथांचें व पुराणांचें वाचन मोठ्या जिव्हाळ्यानें करतात व श्राद्धकर्मादि धार्मिक कृत्यें आस्थेनें पार पाडतात. त्यांची ही श्रद्धा टिळकांच्या श्रद्धेप्रमाणेंच डोळस आहे. श्राद्धकर्मादि विधींसंबंधीं एखाद्या बुद्धिवादी चिकित्सकानें त्यांच्याशीं घोळ घालण्याचा प्रयत्न केला तर ते चोख सांगतील कीं, ‘ श्राद्धकर्मादि कृत्यें पार पाडल्यानें स्वर्गात पितरांना अन्नप्राप्ति होऊन त्यांचें उदरशमन होतें असें समजण्याइतके आम्ही देखील दूधखुळे नाहीं. पण हीं कृत्यें पार पाडणें हें आमच्या सांस्कृतिक अभिमानाचें लक्षण आहे व म्हणूनच तीं पार पाडण्याची दक्षता आम्ही बाळगतों. ’ त्यांची धर्मविधींकडे पाहण्याची ही दृष्टि असल्यामुळें वृत्तीनें कर्मठ नसून देखील ते स्नानसंध्यादि कर्में रोज कसोशीनें पार पाडतात, इतकेंच नव्हे तर कसल्याहि परिस्थितींत ते त्यांत अंतर पडूं देत नाहींत. अमृतसरची कडकडीत थंडी असो, नाहींतर सिमल्याचा गात्रें आंखडणारा गारठा असो, अण्यांची स्नानसंध्या बिनचूक पार पडते. १९३२ सालच्या धरपकडीनंतर मिदनापुरच्या तुरुंगांत असतांना सत्याग्रहाची धमकी देऊन त्यांनीं संध्येचीं उपकरणें तुरुंगाधिकाऱ्याकडून मिळविलीं. अलाहाबादला नेहरू–रिपोर्टावर चर्चा चालू असतांना सप्रूंच्या बंगल्यावर सर्व पुढाऱ्यांच्या देखत आपला सायंसंध्याविधि उरकण्यास ते कचरले

नाहींत. धार्मिक कर्तव्याच्या जाणिवेनें येणाऱ्या स्थितप्रज्ञतेच्या भावनेनेंच तुरुंगांतील भिकार टिनपॉट्सकडे व सप्रूंच्या बंगल्यावरील उंची रुपेरी उपकरणांकडे त्यांनीं पाहिलें. एकाचा त्यांना विषाद नव्हता तर दुसऱ्याचें वैभवहि वाटलें नाहीं – धर्मप्रेरित समदृष्टीनें ते आपलें कर्तव्य पार पाडते झाले! अन्यायाची चीड देखील या कसोशीच्या धर्माचरणास केव्हां केव्हां कारण झाली आहे. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या सभा, मुसलमानांना नमाज पढायला सोईचें जावें म्हणून, तहकूब केल्या जातात; परंतु हिंदु सभासदांच्या सायंसंध्येसाठीं मात्र त्या तहकूब करण्याची कॉंग्रेसश्रेष्ठींना आवश्यकता वाटत नाहीं, असें एकदां अण्यांच्या ध्यानांत आल्याबरोबर त्यांनीं आपलें आग्रहाचें अस्त्र उपसलें आणि हिंदूंच्या सायंप्रार्थनेसाठीं वर्किंग कमिटीची सभा तहकूब करून घेतली!

आग्रहीपणांत अणे हे टिळकांचेच शिष्य शोभतात. अण्यांचा आग्रहीपणा हा त्यांच्या तेजस्वी व युयुत्सु स्वभावाचा द्योतक आहे. १९०९ सालीं म्हणजे यवतमाळास वकिली सुरू केल्यावर दोनतीन वर्षांच्या आंतच सरकारनें त्यांची सनद रद्द केली, तेव्हां त्यांनीं 'सरकार फार तर सनद घेईल, पण बुद्धीवर तर ताबा चालवूं शकणार नाहीं ना' असे जे निर्भय उद्गार काढले ते त्यांच्या तेजस्वी वृत्तीचेच द्योतक आहेत. लोकनायक अणे हे टिळकांप्रमाणेंच स्वभावानें युयुत्सु आणि युद्धप्रवण आहेत. कॉलेजांत असतांना ते टिळकांच्या व्यक्तित्वाकडे व राजकारणाकडे आकृष्ट झाले ते या समानवृत्तीमुळेंच. १८९८ सालीं कॉलेजांत टिळकांना बोलावण्याचा उपक्रम त्यांनीं केला, तेव्हांच त्यांच्या राजकारणास प्रारंभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यानंतर अमरावतीचें 'शिवाजी विद्यालय', 'स्वदेशीची चळवळ', 'हरिकिशोर' पत्राचा पुरस्कार, यवतमाळची जिल्हा-सभा, वऱ्हाडांतील जमीन-धाऱ्याची व जंगल-तक्रारीची चळवळ इत्यादि अनेक प्रकारांनीं त्यांनीं लोकमान्य टिळकांचें लक्ष

स्वतःकडे वेधून घेतलें, व १९१८च्या स्वराज्याच्या दौऱ्यांत वऱ्हाड प्रांतीं टिळक गेले असतां तेथें त्यांनीं अण्यांचा जाहीर उद्गारांनीं गौरव केला. टिळकांच्या मृत्यूनंतर अणे साधारणपणें गांधींच्या विरोधकांतच सामील झाले, तरीपण मूळच्या युयुत्सु वृत्ती-मुळें १९३० सालची चळवळ सुरू झाल्याबरोबर त्यांत ते धडाडीनें सामील झाले. गांधींचें कौन्सिल-बहिष्काराचें राजकारण त्यांना कधींच मान्य झालें नाहीं. १९३० सालीं कॉंग्रेसचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांनीं, 'एक कॉंग्रेस तरी सोडा नाहीं तर कौन्सिल तरी सोडा' असा निर्वाणीचा हुकूम सोडला तेव्हां अण्यांनीं ऑ. इं. कॉं. क. च्या सभासदत्वाचा राजिनामा दिला आणि विदर्भ प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षाची जागा खालीं केली, पण असेंब्ली सोडली नाहीं. पुढें त्यांनीं असेंब्लीचा राजिनामा दिला तो देखील सरकारच्या दडपशाहीचा निषेध करण्यासाठीं, कौन्सिल-बहिष्काराचें राजकारण पटल्यामुळें नव्हे. गांधींच्या राजकारणाशीं असा मतभेद असून देखील ते गांधीच्या चळवळींत शिरले याचें कारण त्यांचा युयुत्सु आणि तेजस्वी स्वभाव त्यांना स्वस्थ बसूं देईना हेंच होय. सारें राष्ट्र स्वातंत्र्य-संपादनाच्या संग्रामांत नाना प्रकारच्या हालअपेष्टा सोशीत असतांना, आणि सगळीकडे दडपशाहीचा डोंब उठलेला असतांना मामुली मतभेदासाठीं घरीं स्वस्थ बसणें अण्यांना भेकडपणाचें वाटलें व त्यांनीं जंगलसत्याग्रहाचें नेतृत्व पत्करलें. एकदां ते त्या संग्रामांत पडल्यानंतर इतर टिळक-शिष्यांप्रमाणें त्यांनीं शारीरिक अगर मानसिक आखडतेपणा मुळींच दर्शविला नाहीं. ते त्यांत धडाडीनें आणि तन्मयतेनें पडले. साहजिकच गांधी-वादी पुढाऱ्यांनीं देखील त्यांना अधिक आपुलकीनें आणि मान-मान्यतेनें वागविण्यास सुरवात केली, आणि ते वर्किंग कमिटीचे सभासद, इतकेंच काय पण कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष देखील झाले.

गांधींशीं मतभेद असूनहि अणे कायदेभंगाच्या चळवळींत हिरिरीनें पडले. त्यांना सरकारनें शिक्षा आणि काँग्रेसनें मानमान्यता दिली ! केळकरांना अण्यांची ही विसंगति वाटली. गांधीप्रणीत असहकारितेच्या अव्यवहार्यतेवर एका काळीं कठोर टीका करणारे अणे कायदेभंगाच्या चळवळींत अडकले हें केळकरांना दैवदुर्विलसिताचें एक उदाहरण वाटलें. वस्तुतः अण्यांच्या टिळकाभिमानी राजकारणाचाच तो एक काळकामवेगानुसार बदललेला नमुना होता. टिळकांचें अत्यंत समर्पक वर्णन The Father of Indian Unrest या शब्दप्रयोगानें चिरोलनेंच केलें होतें. कायदेभंगाचा हा काल म्हणजे हिंदी स्वातंत्र्याकांक्षी अशांततेचा एक संस्मरणीय समय होता. अशा वेळीं अणे कांहीं किरकोळ तात्त्विक मतभेदासाठीं फुरंगटून बसले असते, आणि जनतेच्या लढ्यापासून त्यांनीं स्वतःची फारकत करून घेतली असती तर तोच त्यांचा मोठा टिळकद्रोह झाला असता. त्या वेळीं टिळकद्रोह अण्यांनीं केला नाहीं, तर प्रतियोगी सहकारितेचे शुद्ध सहकारवादी अर्थ लावून वर्तुळ परिषदेस समारंभानें हजर राहणाऱ्या केळकरांनींच केला.

या आणीबाणीच्या वेळीं माधवराव अणे यांनीं टिळकद्रोह करावयाचें नाकारलें हाच त्यांच्या राजकीय सत्त्वशीलतेचा मोठा पुरावा होय. टिळकांच्या राजकारणाचें मर्म इतर कोणत्याहि टिळकशिष्याहून त्यांना अधिक समजलें, इतकेंच नव्हे तर अधिक उमजलें आहे, हें या प्रसंगानें सिद्ध झालें. लोकमान्य टिळकांच्या कार्यसिद्धीचें वर्णन श्री.तात्यासाहेब केळकरांनींच आपल्या एका लेखांत उत्तम रीतीनें करून राजकीय पुढारी या नात्यानें टिळक गांधींपेक्षांहि श्रेष्ठ कां ठरतात हें असें सांगितलें आहे : ‘ सरकारशीं राजकारणाचें भांडण सतत भांडत राहून त्या भांडणांत जास्तींत जास्त लोक सामील करून त्याची दहशत सरकारास बसविणें हीच टिळकांची कार्यसिद्धि ’—व या कार्यसिद्धीमुळेंच ते गांधींहूनहि

श्रेष्ठ ठरले. हिंदी राजकीय आंदोलनांत कांहीं कांहीं क्षण असे आले कीं जेव्हां गांधींचें राजकारण तीव्रतेच्या दृष्टीनें टिळकांच्या राजकारणापुढें बरेंच गेलें व गांधींनीं जनतेचें पाठबळ मिळविण्याची पात्रता टिळकांहून अधिक सिद्ध केली. ' पण या गोष्टी झाल्या तरी क्षणभर झाल्या. त्या तशा टिकल्या नाहींत. त्यांमध्यें सातत्य राहिलें नाहीं. उलट टिळकांविषयीं सरकारची जी शत्रुत्वाची भावना १८९५-९६ सालीं होती तीच १९२० सालपर्यंत एकसारखी टिकली. चिरोलसाहेबांनीं टिळकांचें Father of Indian Unrest हें जें वर्णन केलें आहे तें त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभाला जसें लागतें तसें ' सरकारचे शत्रु ' हें जें त्यांचें वर्णन सरकारनें केलें तें त्यांच्या कारकीर्दीच्या जवळ जवळ अखेरच्या काळांत उद्भवलें होतें. म्हणजे अशा रीतीनें टिळकांच्या कारकीर्दीचे आद्यंत हे सुसंवादी स्वर असून या कारकीर्दीच्या मध्यभागीं झालेले त्यांच्यावरील खटले हे अनुवादी-स्वरानें टिळकांचें धोरण एकाच प्रकारचें राहिलें असें सांगतात. सरकारशीं झुंज ठेवणें, केव्हांहि त्या झुंजेंत जास्तींत जास्ती लोक सामील करणें व सरकारास दहशत वाटेल अशा रीतीनें झुंज लढवणें या तिहींनाहि अवश्य लागणारी अशी एक गोष्ट म्हणजे धोरणाचा सुसंगतपणा व उद्योगसातत्य ही होय. ' करारीपणा हा लोकमान्यांचा गुण गांधींपाशीं असूनहि टिळकांचे इतर युयुत्सादि गुण नसल्यामुळें गांधींना सरकारविरोधी चळवळीच्या तीव्रतेचें सातत्य व दहशत टिळकांप्रमाणें राखतां आलेली नाहीं.

टिळकांच्या यशाचें हें मर्म विशद करतांना त्यांच्या कार्यसिद्धीचें एक महत्त्वाचें कारण केळकरांनीं सांगितलें नाहीं, ही त्या लेखाची मोठीच उणीव होय. ' साधनानामनेकता ' हा टिळकांच्या कार्यपद्धतीचा एक प्रधान विशेष होता. आपल्या आंदोलनाचें सातत्य ते अखेरपर्यंत टिकवूं शकले याचें प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या कार्य-

पद्धतीचा हा विशेष. बदलत्या परिस्थितीप्रमाणें साधनांत फरक करण्याचें बुद्धिचापल्य टिळकांपाशीं असल्यानें त्यांना आपल्या इष्ट कार्याचें सातत्य टिकवतां आलें. टिळकांच्या कार्यपद्धतीचा हा प्रभावी विशेष गांधींनीं ओळखला नाहीं, किंवा ओळखूनहि तो स्वीकारला नाहीं याचें कारण गांधींनीं मुत्सद्देगिरीपेक्षां माहात्म्याला अधिक मार्क दिले, हें असेल. अहिंसा हेंच त्यांनीं स्वराज्याचें एकमेव साधन ठरविलें. टिळकांच्या कार्यपद्धतीचा ' साधनानामनेकता ' हा विशेष गांधीवादाला मानवला नाहीं यांत विशेष कांहींच नाहीं. परंतु स्वतःला आग्रहानें टिळकशिष्य म्हणविणाऱ्यांनाहि टिळकांच्या कार्यपद्धतीचें हें मर्म समजलें नाहीं, व प्रतियोगी सहकाराचें सनदशीर स्वरूप हेंच त्यांनीं आपल्या राजकारणाचें एकमेव साधन मानलें. गांधीवादी आणि टिळकवादी या दोघांनींहि ' साधनानामनेकता ' या टिळकसूक्ताचा त्याग केला. अणे हेच एकटे या विधानाला अपवाद ठरले व म्हणून ते इतर कोणाहिपेक्षां टिळकांचे अधिक उत्तम शिष्य ठरले. आज गांधींच्या विरोधकांत व उद्यां गांधीवाद्यांच्या मेळाव्यांत –असे अणे आढळले याचें कारण त्यांची धरसोड हें नाहीं, तर ' साधनानामनेकता ' या तत्त्वाचें त्यांचें पालन हेंच होय.

आणि म्हणूनच अणे हे टिळकांचे शिष्योत्तम ठरतात. टिळकांप्रमाणेंच राजकारण हा अण्यांच्या जीवनाचा आत्मा झाला आहे. राजकारण हा त्यांचा कर्मयोग आहे, ' करीअर ' नव्हे. अणे आणि केळकर यांच्या राजकीय जीवनांत हा मूलभूत फरक असल्यामुळेंच आठ वर्षांपूर्वीचा केळकरांचा षष्ट्यब्दिपूर्तिसमारंभ हा त्यांच्या राजकीय निवृत्तीचा सूचक म्हणजे त्यांना निरोप देणारा ठरला तर अण्यांचा समारंभ त्यांच्या राजकीय प्रवृत्तीचा गौरव म्हणजे ' तिलकम् अनुस्मर युध्य च ' असें सांगणारा ठरत आहे.

ऑगस्ट १९४०



# नरसिंह चिंतामण केळकर

लोकशिक्षण मासिकाच्या संपादकांनीं एका 'टिळकभक्ता'नें केलेला 'केळकरांचा जयजयकार !' व त्याला श्री. तात्यासाहेब केळकरांनीं आत्मचरित्रांत विस्तारशः दिलेलें उत्तर यांचें पुनर्मुद्रण केलें आहे. 'टिळकभक्ता'चा हा लेख १९३२ सालीं लोकशिक्षणांतच प्रथम प्रसिद्ध झाला होता. त्याला इतक्या वर्षांनीं इतकें साक्षेपानें उत्तर देऊन स्वत: केळकरांनींच त्यांचें महत्त्व मान्य केलें आहे. इतकेंच काय, पण 'केव्हां केव्हां माझ्या खऱ्या योग्यतेचें मोजमाप प्रतिपक्षीयांच्या निंदेंतूनच प्रगट झालें आहे' या स्वानुभवप्रणीत नियमाचें ते तो लेख एक उदाहरण मानतात. अर्थात् या लेखाला दिलेल्या उत्तराचें महत्त्व किती आहे तें वेगळें वर्णन करून सांगण्याचें कारण नाहीं. आणि म्हणूनच 'टिळकभक्ता'नें त्या उत्तराला एक प्रत्युत्तरहि प्रसिद्ध करावयास हवें होतें. परंतु तसें त्यानें केलेलें नाहीं. ही उणीव अंशतः भरून काढण्याचा प्रयत्न मी या लेखांत करीत आहें.

'टिळकभक्ता'ची टीका विद्वेषानें स्फुरली होती, असें केळकरांना वाटतें. या प्रत्युत्तराला देखील ते त्याच कोटींत ढकलतील अशी भीति मला वाटतें. परंतु लोकमान्य टिळकांचा वारसा मिरविणाऱ्या एका व्यक्तीच्या योग्यायोग्यतेच्या मोजमापाचा हा प्रश्न असल्यामुळें हें धाडस करणें भाग आहे. तात्यासाहेबांच्या कामगिरीचा विचार करतांना त्यासंबंधीं त्यांच्या स्वतःच्या ज्या अपेक्षा आहेत, त्यांच्या अनुरोधानें त्या मोजमापाला मुरड न घालतां केळकरांबद्दल महाराष्ट्राच्या ज्या अपेक्षा आहेत [म्हणजे होत्या] त्यांच्या दृष्टीनेंच तें महत्त्वमापन झालें पाहिजे. कारण केळकर हे एक खाजगी व्यक्ति म्हणून जन्मले असले तरी टिळकांच्या संप्रदायांत सामील झाल्यापासून ते सार्वजनिक जीवनच जगले, आणि त्या दृष्टीनेंच महाराष्ट्राला त्यांच्या जीवनसाफल्याची अगर वैफल्याची चवकशी करण्याचा मोह होतो.

केळकर साताराला केवळ वकिली करीत राहिले असते तर त्यांच्या जीवनाचें सार काढण्याचा खटाटोप त्यांच्या कुटुंबियांखेरीज अगर केळकर कुटुंबाचा इतिहास लिहिणाऱ्या एखाद्या हौशी कलमबहाद्दराखेरीज कोणीं केला नसता.

केळकरांना स्वतःला मात्र स्वचरित्राकडे पाहण्याची ही वस्तुनिष्ठ दृष्टि आलेली नाहीं, असें त्यांनीं टिळकभक्ताला दिलेल्या उत्तरावरून स्पष्ट दिसतें. तशी वस्तुनिष्ठ दृष्टि असती तर 'टिळकभक्ता'च्या लेखांत केळकरांच्या वाजवी अगर गैर-वाजवी स्तुतीचीं जीं चारदोन वाक्यें इकडे तिकडे विखुरलेलीं आहेत त्यांवर अधाशीपणानें झडप घालून त्यांनीं, 'बस्स ! एवढें मान्य करतां ना तुम्ही ? त्यावर मी संतुष्ट आहें' असे आत्म-समाधानाचे म्हणजे खरोखर आत्मवंचनेचे उद्गार काढले नसते. 'केळकरांच्या वाङ्मयमोहिनीनें महाराष्ट्राची बुद्धि बधिर झाली होती.' 'आपल्या बुद्धिचापल्यानें व लेखनकौशल्यानें केळकरांनीं टिळकांच्या राजकारणी चिटणिशीचें व संपादकाचें काम रीतसर

पार पाडलें.' 'केळकरांनीं केसरी-मराठा संस्थेची सांगड तरती ठेवली आहे.' या टिळकभक्ताच्या उद्गारांनीं आनंदभरित होत्साते 'बस्स्! मला संतोष आहे. पुष्कळ झालें मला', असें समाधान आपण मानतों हा खरोखर आपला अधःपात आहे एवढें जाणण्याची ताकद केळकरांमध्यें आज उरलेली नाहीं हें पाहून दुःख होतें. केळकरांना एवढें उमजायला हवें होतें कीं, हा त्यांच्या एकट्याच्या संतोषाचा प्रश्न नाहीं. ज्या महाराष्ट्राच्या राजकीय सिंहासनावर आरूढ होण्याचा मान त्यांना मिळाला व त्यांनीं तो स्वीकारला त्या महाराष्ट्राच्या संतोषाचा हा प्रश्न आहे. केळकरांच्या एवढें ध्यानांत यावयास हवें होतें कीं, ज्या महाराष्ट्रीयांनीं टिळकांच्या तेजस्वी राजकारणाचा ध्वज त्यांच्या हातांत दिला त्या महाराष्ट्रीयांच्या समाधानाचा हा प्रश्न आहे. केळकरांनीं आपल्या वाङ्मयमोहिनीनें महाराष्ट्रीय बुद्धिमन्तांना भुरळ घातली, त्यांनीं टिळकांच्या राजकीय कार्यवाहकाचें आणि केसरीच्या संपादनाचें कार्य यशस्वितेनें पार पडलें, त्यांनीं टिळकांच्या मागें केसरी-मरांठा संस्थेचा पसारा कायम राखला—इतकेंच नव्हे, तर आर्थिक दृष्ट्या वाढविला—हें सारें मलाहि मान्य आहे. पण केळकरांच्या एवढ्या या कामगिरीवर महाराष्ट्र संतुष्ट आहे, केळकरांकडून महाराष्ट्रानें अधिक कांहीं अपेक्षा केली नव्हती, आणि केळकरांनीं देखील महाराष्ट्राचा कसला अपेक्षाभंग केला नाहीं, असें स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीस स्मरून आणि सारासारबुद्धीस साक्ष ठेवून ते सांगू शकतील काय?

केळकरांना स्वतःच्या वाङ्मयसेवेबद्दल अभिमान वाटतो व 'साहित्याचार्य किंवा साहित्यसम्राट् ही पदवी लोकांनीं मलाच दिली' असें ते बहादुरीच्या थाटांत सांगतात. परंतु स्वतःच्या साहित्याची थोरवी वर्णन करतांना त्यांनीं जो अजब युक्तिवाद केला आहे तो कोणत्याहि सम्राटाच्या वैभवास किंवा आचार्यांच्या

तर्कवादास शोभणारा नाहीं. ‘ केळकरांना टिळक-तांबेप्रभृति प्रसिद्ध आधुनिक कवींचा दर्जा नाहीं. हरिभाऊ आपट्यांप्रमाणें एकहि सुरेख कादंबरी त्यांनीं अद्यापि लिहिलेली नाहीं. इतकेंच नव्हे, तर एकभावनाव्यास अथवा एकप्रसंगव्यास अशा चटकदार लघुकथाहि त्यांस अजून लिहितां आलेल्या नाहींत. उडतीबागडतीं अनेक नाटकें त्यांनीं रचिलीं असलीं तरी उदात्त प्रसंगांच्या अभावीं खाडिलकरांच्या नाटकांप्रमाणें तीं लोकमान्य झालीं नाहींत. इतिहास-प्रबंधांत वैद्य-राजवाड्यांची सखोल विद्वत्ता व उच्च प्रतिभा नाहीं ’—या टिळकभक्ताच्या अभावदर्शक आक्षेपांना उत्तर देतांना केळकरांनीं जो साविर्भाव तर्कवाद लढविला आहे तो ते पुढेंमागें जो तर्कशास्त्रावर प्रबंध लिहितील [ अशी भीति वाटते ] त्यांत तर्कदुष्टतेचें बिनतोड उदाहरण म्हणून खुलून दिसेल. केळकर म्हणतात, ‘ कोणांत काय होतें हें न पाहतां दुसऱ्या एखाद्या-सारखें काय नव्हतें हेंच पाहत गेल्यास कोणासहि श्रेष्ठ पदावरून खालीं ओढतां येईल. ’ एवढें मोघम विधान करूनच केळकर थांबले असते तर त्यांच्या तर्कशक्तीचीं लक्तरें लोंबलीं नसतीं. ‘ पण कोणासहि श्रेष्ठपदावरून खालीं ओढण्याच्या ’ युक्तीचे जे कांहीं नमुने त्यांनीं कृपायुक्त अंतःकरणानें वाचकांस सादर केले आहेत त्यांवरून त्यांना स्वतःच्या तर्कदुष्टतेची जाणीव व वाचकांच्या तर्क-शक्तीबद्दल पुरेसा आदर नसल्याचें एकदम सिद्ध होतें. ‘टिळक-भक्ता’स चीत करून त्याच्याकडून स्वतःच्या वाङ्मयीन योग्यतेची निर्विवाद कबुली मिळविण्यासाठीं केळकर विचारतात, ‘ हरिभाऊ आपटे तरी रवींद्रनाथ टागोरांसारखे तत्त्वज्ञानी कोठें होते ? राज-वाड्यांना खाडिलकरांसारखीं नाटकें कोठें लिहितां येत होतीं ! चिंतामणरावांना खाडिलकरांसारखें ललितवाङ्मय कोठें लिहितां येत होतें !...’ तुलनाशास्त्राचा सहज लीलया मुडदा पाडणारे हे प्रश्न विचारून केळकर तितक्याच बेगुमानपणें बजावतात,

' चिंतामणरावांना माझ्यासारखें सुश्लिष्ट वाङ्मय कधींच लिहितां आलें नाहीं. हरिभाऊ आपट्यांपेक्षां मी अधिक चांगला निबंधकार होतों. ' साम्यविरोधाचे साधे बालबोध नियम पाळावयाचें केळकरांनीं ठरविलें असतें तरी असला तर्कदुष्ट युक्तिवाद त्यांनीं कधींच केला नसता. एखाद्या व्यक्तीची दुसऱ्या एखाद्या व्यक्तीशीं तुलना करतांना [ किंवा त्यांच्यामधील विरोध दाखवितांना ] ती तुलना तिच्या विशिष्ट कार्यक्षेत्रापुरती किंवा कार्यपद्धतीपुरती करावी लागते, हें केळकर विसरले. 'टिळक-भक्ता'ला या प्राथमिक नियमाची जाणीव होती, व म्हणूनच त्यानें हरिभाऊ आपट्यांची कादंबरीकार केळकरांशीं तुलना केली व खाडिलकरांच्या कांट्यावर नाटककार केळकरांना उभें केलें. तशी जाणीव बाळगावयाचा तर्कशास्त्रीय शिष्टाचार आसमन्तांत झुगारून देऊन केळकरांच्या वाङ्मयनिर्मितीची अवस्था हास्यास्पद करण्यासाठीं त्यांना कवि काळेले यांच्या-प्रमाणें चित्रकला अवगत नव्हती व के. नारायण काळ्यांप्रमाणें चित्रपटकला ज्ञात नव्हती या मुद्द्यावर काळे-काळेल्यांपेक्षां नक्की हिणकस ठरवितां आलें असतें. पण या युक्तिवादानें केळकरांचें वाङ्मय हास्यास्पद ठरण्याऐवजीं ' टिळकभक्त 'च हास्यास्पद ठरला असता ! येथें मात्र खुद्द केळकर हास्यास्पद ठरले आहेत ! आपटे-खाडिलकर-तांबे प्रभृति श्रेष्ठ साहित्यिकांपाशीं नसलेलें वैशिष्ट्य आपल्यांत आहे एवढेंच प्रतिपादन करण्याची केळकरांची ईर्ष्या असती तर ' त्यांच्या बुद्धीला माझ्या बुद्धीप्रमाणें चौरसपणा कोठें आहे ? ' एवढेंच विचारून ते स्वस्थ राहिले असते. पण टिळक-भक्तास हा प्रश्न विचारण्याची खरोखर आवश्यकता आहेच कोठें ! केळकरांचें हें वैशिष्ट्य त्याला काय किंवा कुणालाहि काय अमान्य नाहींच !

केळकरांचा ६१ वा वाढदिवससमारंभ 'एक अनेकांगी अभिजात साहित्यसेवक व चतुरस्र संपादक' म्हणून झाला असता तर 'टिळक-

भक्त'च काय, पण इतर कोणीहि त्यावर आक्षेप घेण्याच्या फंदांत सहसा पडला नसता. पण तो समारंभ देशांत सर्वत्र स्वातंत्र्याचें आंदोलन सुरू असतां व हजारों स्त्री-पुरुष सत्याग्रहीं तुरुंगांत दारुण हाल-अपेष्टा सोशीत असतां सर्व सदभिरुचि आणि औचित्य यांचें गांठोडें ओंकारेश्वरावर पोंचवून झाला आणि केळकरांची 'महाराष्ट्राच्या राजकीय नेतृत्वाच्या तेजस्वी पदा'वर प्रतिस्थापना करून झाला म्हणूनच त्याबाबत निषेधाचे आवाज काढणें टीकाकारांना भाग पडलें. या आक्षेपावर केळकर उत्तर करतात कीं, 'हा प्रसंग-योग आणि समारंभाचें हें प्रमाण या दोन्हीहि गोष्टी माझ्या हातच्या नव्हत्या. १९३२ सालींच माझ्या वयाचीं साठ वर्षे पुरीं झालीं, याला माझा काय उपाय?' जणूं काय हा समारंभ झाला नसता, तर ६१ वें व पुढचीं वर्षे प्रकृतिस्वास्थ्याच्या दृष्टीनें केळकरांना सुख-क्षेमाचीं गेलीं नसतीं! ६१ वा वाढदिवससमारंभ म्हणजे कांहीं व्रतबंधविधि नव्हे कीं ज्याच्या अभावीं केळकरांना कोणाहि सु-ब्राह्मणानें आपली कन्या अर्पण करावयास नाकारलें असतें! 'हा योग ठीक नव्हे असें जाणून माझी मीच या उत्सवाला अत्यंत निक-रानें हरकत घेतली होती.' असेंहि बयाण केळकर यावर करतात. मग ती निकराची हरकत खाडिलकरांनीं आपल्या वाढदिवस-समारंभास घेतलेल्या हरकतीप्रमाणें यशाला कां गेली नाहीं? तुमच्या चाहत्यांनीं तुमचे हातपाय बांधून तुम्हांला समारंभाच्या स्थानीं नेलें आणि तेथें मानपत्रानंतर नाक दाबून उत्तरादाखल तोंड उघडावयास लावलें अशांतला तर कांहीं प्रकार नव्हता ना!

'आपल्या तोंडासमोर पाजळावयाच्या मशालीला फडकीं गुंडाळणारा, किंवा त्यावर चोरून तेल ओतणारा असा मी कधींच नव्हतों.' असें केळकर सात्त्विक संतापानें सांगतात. मला हें कबूल आहे. त्या मशालीला फडकीं तुमच्या चाहत्यांनींच गुंडाळलीं व त्यावर तेल ओतण्याचें आवश्यक कार्यहि त्यांनींच केलें—पण ती

मशाल पाजळण्यासाठीं तुमची मूर्ति मिळेल अशी खात्री असल्या-मुळेंच ते या खटाटोपांत पडले ही गोष्ट खरी कीं खोटी ?

हा समारंभ अनुचित कालीं झाला म्हणूनच केवळ नव्हे तर केळकरांना महाराष्ट्रीय राजकारणाचे यशस्वी सूत्रधार कल्पून झाला म्हणूनच त्यावर 'टिळकभक्ता'चा आक्षेप आहे. लो. टिळकांच्या लढाऊ पक्षाचें नेतृत्व स्वीकारण्यास केळकर नालायक असल्यामुळें टिळक-संप्रदाय निस्तेज झाला व त्यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राची पिछेहाट झाली; टिळकांचा निःशस्त्र प्रति-काराचा कार्यक्रम शास्त्रशुद्ध स्वरूपांत केळकरांनीं धडाडीनें पुढें ठेवला असता तर गांधींच्या अव्यवहार्य, अस्थिर व अतिरेकी तत्त्वांचा जनतेनें अंगीकार केला नसता; पण केळकरांपाशीं टिळ-कांचें तेजस्वी कर्मयोगित्व नसल्यामुळें ते केसरी-संस्थान पकडून बसले आणि टिळकांच्या राजकारणाची वाताहात झाली, असें 'टिळकभक्ता'चें प्रतिपादन आहे, व सर्वसाधारणपणें तें सर्व सुबुद्ध व्यक्तींस मान्य व्हावयास हरकत नाहीं. या प्रतिपादनावर केळकरांनीं जो उत्तरादाखल युक्तिवादाचा फापटपसारा मांडला आहे त्यानें बुद्धि एका निराळ्याच तऱ्हेनें स्तिमित होते. 'टिळकभक्ता'नें केलेली टीका केळकर अमान्य करीत नाहींत, मग हा फापटपसारा कशाला ? तर [ केळकर सांगतात ] " तींत मला लावलेलीं विशे-षणें पुष्कळशीं अकरणरूपी ' निगेटिव्ह ' आहेत; उलट स्वरूपाचे प्रत्यक्ष असे ' पॉझिटिव्ह ' दोष त्याला मुळींच दाखवितां आलेले नाहींत." म्हणून. प्रत्यक्ष स्वरूपाचे 'पॉझिटिव्ह' दोष 'टिळकभक्ता'नें दाखविले नाहींत यावरून ते आपल्या अंगीं नाहींत अशी केळ-करांची भाबडी समजूत दिसते. यावर दोन मिनिटें ' अचंचल ' वृत्तीनें केळकरांनीं विचार केला तर ही गैरसमजूत दूर होऊन त्यांना दिसून येईल कीं, त्यांच्या अंगीं असे दोष आहेत, पण आदरभावने-मुळें 'टिळकभक्ता'नें त्यांना 'निगेटिव्ह' स्वरूप दिलें असावें. उदाहर-

णार्थ, केळकरांपाशीं टिळकांची धडाडी किंवा धैर्यशालित्व नव्हतें असें म्हणण्याऐवजीं केळकर रणभीरू होते असें 'पॉझिटिव्ह' पद्धतीनें म्हणतां आलें असतें, व एके ठिकाणीं 'टिळकभक्ता'नें त्यांना 'राजकारणसमरपराङ्मुख ' असें संस्कृतप्रचुर वाणीनें संबोधिलें आहेहि ! तो शहाणा नाहीं म्हणजे तो मूर्ख आहे, अशा धर्तीचें हें समीकरण आहे. 'टिळकभक्तां'ना केळकरांचें वर्णन 'निगेटिव्ह' पद्धतीनेंच प्रायः करावें लागलें याचें कारण उघड आहे. टिळकांच्या राजकारणाचा वारसा मस्तकीं धारण केल्यामुळें केळकरांच्या राजकीय कार्याचें महत्त्वमापन करतांना टिळकांशीं त्यांची तुलना करणें भाग पडतें. अशा वेळीं टिळकांत होतें तें केळकरांत नाहीं असें अकरण पद्धतीनें सांगण्याखेरीज दुसरा सोपा मार्ग कोणता ?

लो. टिळकांच्या मागें त्यांचा संप्रदाय निस्तेज झाला हें केळकरांना मान्य आहे. पण, या दुर्दशेचें खापर आपल्याच तेवढें डोक्यावर कां फोडलें जावें ? महाराष्ट्रांत केळकरांखेरीज परांजपे-खाडिलकर-वैद्यप्रभृति निष्ठावंत टिळकाभिमानी होते ना ? मग एकदोन वर्षांतच टिळकांचें निशाण पळवून ते गांधींच्या गोटांत कां शिरले ?— असा तात्यासाहेबांचा सवाल आहे. महाराष्ट्रांत टिळक-संप्रदाय शक्य तितका टिकविण्याचा प्रयत्न काय तो आपणच केला, मग ' टिळकांच्या व माझ्यामध्यें महाराष्ट्रांत कोणीं येऊं शकला नाहीं हें खरें कीं खोटें ? ' असाहि प्रश्न ते टीकाकारांवर हाणतात. पण या प्रश्नांतील हेत्वाभास न जाणण्याइतका महाराष्ट्रांतील सर्वच टीकाकारांच्या मेंदूचा कांहीं गायकवाडवाडा झालेला नाहीं. शिवरामपंत परांजप्यांसारख्या तेजस्वी पुरुषानें गांधींच्या अविवेकी चळवळींत विलीन होऊन जावें, ही विषादकारक गोष्ट झाली हें खरें; पण याला कारण टिळकांच्या राजकीय पुण्याईचा व जिंदगीचा नैतिक आणि व्यावहारिक वारसा ज्यांच्याकडे आला ते सुवर्णमध्याच्या शिळोप्याच्या गप्पा मारीत निष्क्रियतेच्या दिशेनें झपाट्यानें

मार्ग कापूं लागल्यामुळें परांजपे-प्रभृति लोक असहकारितेच्या प्रभावी प्रतिकाराकडे आकर्षिले जाऊं लागले हेंच होय. टिळकांच्या संप्रदायाचें संरक्षण व संवर्धन करण्याचें कार्य, त्यांच्या पुण्याईचें चंदन कपाळीं धारण करणाऱ्या व केसरीकचेरीचा ताबा घेणाऱ्या केळकरांचेंच मुख्यत्वेंकरून होतें.

टिळकांच्या राजकारणाचा वारसा [केसरी कचेरीसकट] परांजपे प्रभृतींकडे आला असता, आणि मग जर त्यांनीं टिळकांचें निशाण पळविलें असतें तरच केळकरांच्या आजच्या या बोटमोडीला कांहीं अर्थ उरला असता. टिळकांच्या राजकीय पुण्याईवर व कमाईवर आपणच सर्वस्वी हक्क सांगावयाचा, आणि अपयश आल्यावर मात्र त्याच्या दावणींत बांधायला झाडून सारे नवे-जुने टिळकाभिमानी ओढून आणावयाचे, हा तर्कवाद केळकरांना आज वृद्धावस्थेंत आणि निस्तेजत्वाच्या काळांत समाधान देत असला तरी त्यांच्या राजकीय कामगिरीचें महत्त्वमापन करण्याच्या दृष्टीनें तो कुचकामाचा ठरतो, एवढें त्यांनीं ध्यानांत घेण्याचा प्रयत्न केल्यास बरें. आपण असहकारतेच्या आहारीं गेलों नाहीं; पहिल्या दिवसापासून 'आपण टिळकसंप्रदाय टिकविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला व त्यासाठीं कॉंग्रेसनिष्ठांच्या शिव्या खाल्ल्या; परांजपे-प्रभृतींचें अनुकरण करून आपण टिळकसंप्रदायाशीं बेइमानी केली असती, केसरीवर चरख्याचें चित्र छापलें असतें, गांधीटोपी घातली असती तर आपली लोकप्रियता कायम राहिली असती; आपण जो लोकप्रियतेचा स्वार्थत्याग केला तो टिळक-संप्रदाय टिकावा म्हणून, ' असें केळकर एका परिच्छेदांत कळवळून सांगतात. या एका परिच्छेदांत केळकरांच्या वृद्धावस्थेंतील विस्मरणशीलतेचा विलास विलक्षण प्रमाणांत दिसून येतो. अजूनहि कोठें कोठें दृष्टीस पडणारें गांधीटोपींतील त्यांचें छायाचित्र या विलासाचा सर्व तपशील साक्षेपानें वर्णन करून सांगण्यास समर्थ आहे. केळकरांनीं लोकप्रियतेचा

त्याग कितपत केला हें त्यांनीं कायदेभंगाच्या चळवळींत शिवाजी-मंदिरांत ' निमकका कायदा तोड दिया 'चा जो अपूर्व प्रयोग केला तो पाहण्यास जमलेले पुणेरी प्रेक्षकच योग्य प्रमाणांत सांगतील.

टिळकांचा संप्रदाय टिकविण्यास आपण काय काय केलें याचें ' गीतारहस्य ' विशद करतांना केळकरांनीं स्वतःच्या मनाला, ' हा संप्रदाय टिकविण्याची आपली खरोखर पात्रता आहे काय ?' असा एखादा प्रश्न हळूच विचारला असता तर स्वतःवर तसेंच महाराष्ट्रावर त्यांचे मोठे उपकार झाले असते. ' साध्या गर्दीदाटीच्या सभांनाहि मी कंटाळतों ' असें याच लेखांत कबूल करणाऱ्या गृहस्थाला टिळकांचें लढाऊ, बाणेदार आणि धकाधकीचें राजकारण कितपत जमलें असतें, असा प्रश्न एखाद्यानें केला तर त्याला इतिहासानें दिलें त्याहून दुसरें कोणतें उत्तर केळकरी तर्कवादाच्या जादूगृहांत तरी शक्य आहे ? केळकर हे टिळकांचे समानधर्मे नव्हतच. टिळक संग्रामप्रिय तर केळकर स्वास्थ्यप्रिय. टिळक कर्मशूर तर केळकर शब्दशूर. टिळक एकान्तिक तर केळकर सदा सुवर्णमध्यावर स्थिर झालेले. टिळक दुर्दम्य महत्त्वाकांक्षी तर केळकर महत्त्वाकांक्षारहित. टिळक सूर्याच्या तेजोगोलाप्रमाणें प्रखर, तर केळकर परप्रकाशित चंद्राप्रमाणें शीतल. एक झुंझार योद्धा, तर दुसरा समेटसाधक. हा प्रकृतीचाच फरक आहे. तो फरक ओळखून केळकरांनीं टिळक-संप्रदायाचें निशाण अधिक लायक व्यक्तीच्या स्वाधीन केलें असतें तर ती त्यांची कर्तव्य-परायणता आणि स्वार्थत्याग अपूर्व व सदैव कौतुकास्पद ठरला असता. असें कांहीं करण्याचा साधा विचारहि न करतां ते 'टिळक-भक्ता'च्या लेखासारख्या टीकेला उत्तर देणें हें महत्कार्य मानून अशा उत्तरात्मक टांचा घाशीत बसण्यांत कालापव्यय करतात, हाच ते टिळकांचें प्रभावी, आत्मनिरपेक्ष व लोकाभिमुख राजकारण चाल-विण्यास नालायक होते याचा उत्तम पुरावा आहे.

' टिळकभक्त'ला दिलेल्या उत्तराची अभिजात मौज ती ही कीं, केळकरांना स्वसमर्थनार्थ जें कांहीं खरोखर म्हणतां आलें असतें तेवढेंच नेमकें त्यांनीं म्हटलेलें नाहीं. लोकमान्य दिवंगत झाले त्या सुमारास महायुद्ध संपलें होतें, व लोकांचीं मनें नुसत्या सभा, व्याख्यानें व ठराव यांनीं संतुष्ट राहावयास तयार नसून प्रत्यक्ष विधायक कृति करण्यास उत्सुक झालीं होतीं—असें ' टिळकभक्त 'च म्हणतो. अर्थात् या नव्या परिस्थितींत नवे डावपेंच योजणें, थोडक्यांत म्हणजे सर्वसामान्य जनतेस कृति करण्यास शिकविणें हें पुढाऱ्यांचें कर्तव्य होतें. केळकरांना तें साधलें नाहीं; पण जुन्या जमान्यांत मुरलेल्या टिळकांना तरी तें हमखास जमलें असतें असें ' टिळकभक्त ' छातीठोकपणें म्हणूं शकेल काय ? टिळक हे लढाऊ बाण्याचे पुढारी व निःशस्त्र प्रतिकाराचे प्रणेते असल्यानें त्यांनीं हें कार्य धडाडीनें पार पाडलें असतें असें म्हणण्याचा मोह होतो. पण याची खात्री कोणीं द्यावी ? आयुष्याच्या अखेरीस टिळकांवर देखील नेमस्त-वृत्तीचा आरोप करण्यास कांहीं जहालवृत्तीचे राष्ट्रभक्त पुढें सरसावले होतेच कीं नाहीं ?

पण केळकर हा बचाव देत नाहींत व तेंहि बरोबरच. टिळक-संप्रदायाचें केवळ संरक्षणच नव्हे तर संवर्धनहि करण्याची जबाब-दारी त्यांच्यावर पडली होती. हें संवर्धन-कार्य करावयाचें म्हणजे टिळकांचें राजकारण प्रत्यक्ष प्रतिकाराच्या दिशेनें पुढें न्यावयाचें. एवढी आपली पात्रता व तयारी नाहीं हें केळकर बरोबर जाणतात. अर्थात् ते संप्रदाय-संरक्षणाचें न केलेलेंच कार्य फुलवून सांगूं लागले. तेंहि त्यांना जमलें नाहीं, हा त्यांचा आणि महाराष्ट्राचा दैवदुर्विपाक !

जून १९३९



# जी. के. चेस्टर्टन

मि. गिल्बर्ट कीथ चेस्टर्टन यांच्या निधनानें ब्रिटिश साहित्यिकांच्या रांगेत भली थोरली खिंड पडली आहे. मि. चेस्टर्टन यांच्या जाडजूड शरीराच्या आधारानेंच हें विधान केलेलें आहे असें समजण्याचें कारण नाहीं. त्यांनीं निर्मिलेल्या साहित्याची प्रतिष्ठाच तशी मोठी आहे. ब्रिटिश साहित्यिकांच्या मेळ्यांत मिस्किलपणें मिरविणारें हें धूड डोळे भरून पाहण्याकरितां दूरदूरच्या देशांतील रसिक भक्त इंग्लंडला जाणाऱ्या प्रवाशांत सामील होत. जणूं काय चेस्टर्टन म्हणजे एखादा पिरॅमिडच ! आणि खरोखरच आंग्ल वाङ्मयांत ते एखाद्या पिरॅमिडसारखेच शोभतात. इतिहासाच्या पूर्वकालांतील सुखासीन पण सामर्थ्यवान् राजांच्या वैभवाचीं शिंडें मिरविण्याचें कार्य पिरॅमिड करतात. त्यांत कला नाहीं, पण कलेचें सामर्थ्य आहे; त्यांत कलेचा नाजूकपणा नाहीं, पण कला-

वंतांना येणारा नशा आहे; त्यांत मार्दव नाहीं, पण मगरूरी आहे; त्यांत संगीताचे मंजुळ स्वर नाहींत, पण स्वतःचें श्रेष्ठत्व ओरडून सांगणाऱ्या आवाजाचा खडेपणा आहे; त्यांत कलेचें चिरंजीवि आनंददायित्व नाहीं, पण हृदय क्षणभर हलवून सोडणारा आवेश आहे; त्यांत कलेची तरलता नाहीं, पण दीर्घ काल न ओसरणारा भरभक्कम पाया आहे. नेमके हेच विशेष चेस्टर्टन यांच्या कलेचे म्हणून सांगतां येतील. अभिजात प्रतिभासंपन्न कलावंताच्या निर्मितींतील शाश्वत गुण चेस्टर्टन यांच्या वाङ्मयांत, त्यांच्या काव्यांतहि नाहींत असें मला वाटतें. कवि व निबंधकार या नात्यानें त्यांचें वाङ्मय सदैव वाचनीय राहील, म्हणून त्यांचे भक्त घसा खरवडून म्हणतात. स्वतः चेस्टर्टन यांनाहि स्वतःच्या काव्यानिर्मितीची मातब्बरी विशेष वाटे, हें त्यांनीं आपली ' समग्र कविता ' राजे पंचम जॉर्ज यांच्या रौप्य-ज्युबिलीच्या वेळीं त्यांना अर्पण केली होती यावरून दिसून येतें. त्यांच्या काव्यनिर्मितीस सुरुवातहि अगदीं बालवयांत म्हणजे त्यांच्या शालेय दिवसांत झाली होती. म्हणजे त्यांची काव्यनिर्मिति खरीखुरी प्रस्फुरित होती. पण प्रत्येकाची प्रस्फुरित वाङ्मयसेवा चिरंजीवी व्हावी असा कवींचा संकेत असला तरी निसर्गाचा नाहीं !

तरीपण त्यांच्या लेखनांतील वावदूकपणा,आवेश,घडाडी, स्वमताविषयींचा बेफाट अभिमान, प्रतिपक्षाच्या मूर्खपणाविषयींची बालंबाल खात्री, त्याची टर करण्याची अनावर हौस, याला अवश्य असलेली विद्वत्ता व व्यासंग, कल्पकता व कोटीबाजपणा वगैरे गुण त्यांजपाशीं भरपूर प्रमाणांत वसत होते. या सर्वांना मतांच्या व वागणुकीच्या विक्षिप्तपणाची जोड मिळाल्यानें त्यांच्या लिखाणाला एक प्रकारचें वैशिष्ट्य प्राप्त झालें. त्यांच्या लिखाणाचें हें वैशिष्ट्य, व्यक्तित्व त्यांनीं अलबत्यागलबत्यांना नेस्तनाबूद करण्यांत खर्चिलें नाहीं. ज्यांनीं स्वतःच्या विद्वत्तेनें, प्रतिभेनें, कल्पकतेनें सर्व रसिकवर्गावर विलक्षण

छाप टाकली होती अशा शॉ, वेल्स, किप्लिंग प्रभृति रथींअतिरथींवर त्यांनीं आपल्या सामर्थ्याचे गोळे सोडले. विशेषतः बर्नार्ड शॉ यांच्या-बरोबर लेखणीचा डाव खेळतांना त्यांची प्रतिभा विशेष चमकली व त्यांची करामत खऱ्या कसोटीला लागली. बर्नार्ड शॉबरोबर ते वादाच्या रंगणांत उतरले तेव्हां ते शॉच्याहून वयानें बरेच लहान होते; इतकेंच नव्हे, तर त्यांचें कीर्तिनक्षत्र क्षितिजावर नुकतेंच कोठें उमल-लेलें होतें. या वादविवादांत उठलेल्या धुळीच्या लोळानें सर्व आकाश धुरकटून हें नक्षत्र त्यांत गडप व्हावयाला वेळ लागला नसता. पण चेस्टर्टन यांच्या प्रतिभेचा स्रोत प्रखर होता. त्यांत या धुळीचे कण अधिक स्पष्ट दिसत; पण त्यांच्या कीर्तिनक्षत्राची दीप्तिहि त्यामुळें अधिक खुले. वावदूकपणांत ते बर्नार्ड शॉ यांना तुल्यबल होते. आणि म्हणूनच या दोघांमधील वादप्रसंग रसिकांना पर्वणीसारखे वाटत. लेखणी आणि वाणी या दोनहि शस्त्रांनीं ही धुमश्चक्री चाले आणि वाणीच्या प्रांतांत शॉपुढें जरी त्यांना हार खावी लागे तरी लेखणीच्या खणखणाटांत यांच्या दणकट शस्त्राचा आवाज कधीं कमी म्हणून पडला नाहीं. शॉना विरोध करण्याची पुढेंपुढें त्यांना खोडच जडली. शॉनीं हवें तें मत मांडावें, चेस्टर्टन बरोबर त्याच्या विरुद्ध मत स्वीकारून त्यासाठीं आटापीट करायचे; शॉनीं हवी ती बाजू घ्यावी, ते बरोबर विरुद्ध बाजूच्या गर्दीत तावातावानें ओरडत दिसावयाचे; शॉनीं हवा तो मार्ग सुधारावा, हे बरोबर उलट्या दिशेनें दौड करूं लागावयाचे! शॉच्या प्रत्येक आवडत्या मताला त्यांनीं कसून विरोध केला. स्वदेश, स्वकुल, स्व-संस्कृति यांविषयींच्या शॉच्या मतांच्या बरोबर विरुद्ध अभिप्राय त्यांनीं प्रकट केलेला आढळे.

केवळ शॉना विरोध केल्यानेंच त्यांच्या वावदूकपणाचें समाधान झालें, असें नव्हे. शॉ किंवा रसेल या दोहोंपेक्षां इंग्लंडमध्यें विचा-रानें अधिक प्रभावी ठरलेले मि. एच्. जी. वेल्स यांनाहि त्यांच्या

विरोधाचे तडाखे सहन करावे लागले. एच्. जी. वेल्स हे परा-काष्ठेचे स्वप्नाळु ध्येयवादी आहेत. या ध्येयवादांत रंगून जाऊन त्यांनीं मानवतेच्या भवितव्याचीं जीं एकमेकाहून सरस व आकर्षक अशीं स्वप्नचित्रें रंगविलीं त्यांचा पद्धतशीर उपहास चेस्टर्टन यांनीं केला. वेल्स यांच्या विश्वांतील एकाहून एक आकर्षक अशा खगोलांकडे अंगुलिनिर्देश करून चेस्टर्टन विचारतात कीं, मनुष्यानें कोणत्या खगोलावर वसति करावी, हें वेल्स निश्चितपणें सांगूं शकतील काय ? पण वेल्स यांना तरी कोठें माहित आहे ? आणि म्हणूनच त्यांचीं भाराभर व भराभर बदलणारीं मतें चेस्टर्टन यांच्या उप-हासाच्या आवेशांत हास्यापद ठरलीं.

बोअर युद्धाच्या सुमारासच चेस्टर्टन यांच्या खऱ्या साहित्य-सेवेस सुरुवात झाली, असें म्हणतां येईल. इंग्लंडचे भांडवली मुत्सद्दी ज्या वेळेस साम्राज्यवादी राजकारणाचा पाया दृढ करीत होते त्याच वेळेस चेस्टर्टन यांनीं स्वतःच्या साहित्यसाम्राज्याचा पाया रोंवला. इंग्रज सैन्यें ज्या वेळीं बोअर लोकांच्या स्वराज्यांतील शोभिवंत मंदिरें जमीनदोस्त करीत होतीं, त्याच वेळीं चेस्टर्टन यांनीं स्वतःचें साहित्य-मंदिर उठविण्यास सुरुवात केली. साम्राज्यवादावर चेस्टर्टन यांचा हल्ला त्यांच्या इतर हल्ल्यांप्रमाणेंच विक्षिप्त होता. साम्राज्यलालसेनें स्वदेशा-भिमानाचा लोप होतो, असें त्यांचें म्हणणें होतें. जोसेफ चेंबरलेन यांच्या साम्राज्यवादी धोरणाला स्वदेश-प्रेमी उदारमतवादी मुत्सद्दी ज्या मुद्यावर विरोध करीत त्याहून चेस्टर्टन यांच्या युक्तिवादाला अधिक महत्त्व नव्हतें. स्वदेशाभिमान व भांडवलशाही यांच्या कला-त्मक संयोगाचेंच साम्राज्यवाद हें कडू व करडें फळ होतें हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं.

चेस्टर्टन यांची वादपद्धति जितकी विचित्र तितकीच आकर्षक होती. उपहास हा जसा त्यांच्या युक्तिवादाचा आत्मा होता तसा विरोधाभास [ paradox ] हा त्यांच्या लेखनशैलीचा

आत्मीभूत विशेष होता. त्यांचें लेखन नेहमीं तडफेचें, तीव्र व द्रुतगति असे, पण त्याला paradox च्या आडवळणांतून जातांना खरी मौज वाटे. कोटिक्रम, सुभाषित व शाब्दिक कसरत यांची त्यांना विलक्षण चटक. या कोटिक्रमाच्या माऱ्यांत कोणत्या मुद्द्याचा कसा धुव्वा उडेल तें कधीं सांगतां यावयाचें नाहीं. प्रत्यक्ष शत्रूनेंहि स्तिमित होऊन स्वतःवरील हा मारा कौतुकानें पाहत राहावा, असें त्यांचें अलौकिक कौशल्य. बर्नार्ड शॉवर त्यांनीं एक स्वतंत्र पुस्तक लिहिलें, त्यांत सुरुवातीस, I am the only person who understands him, and I do not agree with him असे उद्गार काढून त्यांना सुमारें २५० पृष्ठांत त्यांनीं एकसारखें धारेवर धरलें आहे. तरी सुद्धां बर्नार्ड शॉ त्या पुस्तकाबद्दल लिहितातच कीं, " This book is what everybody expected it to be, the best work of literary art I have yet provoked. " पण प्रतिपक्षाला मोहून टाकणाऱ्या चेस्टर्टनच्या वादकौशल्यास आणखी एका अलौकिक गुणाची जोड होती. त्यांच्या माऱ्यास वैयक्तिक द्वेषाचा वास चुकूनहि येत नसे. त्यांच्या विशाल देहाच्या आंत दडलेल्या अंतःकरणांतील दिलदार प्रेमाचा प्रवाह अविरत वाहत असे. बर्नार्ड शॉ व चेस्टर्टन यांचा मतांच्या बाबतींत उभा दावा. पण त्यांच्या मृत्यूमुळें बर्नार्ड शॉइतकी कळवळून रडणारी व्यक्ति दुसरी असेल असें वाटत नाहीं.

चेस्टर्टन यांचा उपहास जसा व्यक्तिद्वेषानें स्फुरला नव्हता तसाच तो उथळपणाचाहि निदर्शक नव्हता. त्यांच्या उपहासास तत्त्वज्ञानाची शोभिवंत मुरड होती. म्हणूनच त्यांना टिंगलबाज तत्त्वज्ञानी [ jesting philosopher ] असें संबोधण्यांत येई. त्यांच्या तत्त्वज्ञानाचें एका शब्दांत वर्णन करावयाचें झालें तर त्यावर ' प्रतिगामी ' असा ठळक शिक्का मारावा लागेल. बारा–तेराव्या शतकांतील मध्ययुगीन, सरंजामी, कॅथॉलिक संस्कृतीचे व परंपरेचे ते कडवे

पक्षपाती होते. इंग्लंडसारख्या साम्राज्यवादी–भांडवली राष्ट्रांत, इंग्रजांच्या स्वभावांत मुरलेल्या लवचिक व तडजोडीच्या वृत्तीमुळें सरंजामशाहीचे जे अवशेष तग धरून आहेत त्यांचा अत्यंत प्रतिभाशाली पक्षपाती व अभिवक्ता म्हणून चेस्टर्टन यांचें महत्त्व आहे. भांडवली समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या प्रत्येक विशेषाला त्यांनीं अत्यंत आत्मीयतेनें, आस्थेनें व तत्परतेनें विरोध केला. यांत्रिक सुधारणा, उत्क्रांतिवाद, समाजसत्तावाद, संशयवाद, नास्तिकवाद – विकासवृक्षाच्या या जोमदार शाखांचे अंकुर खुडण्यांत त्यांना कृतकर्तव्यतेचें समाधान लाभत होतें. १९ व्या शतकांत भांडवलशाहीनें दिगंत विजय संपादन केला होता; भौतिक शास्त्रांनीं आश्चर्यकारक प्रगति आरंभिली होती; भांडवली संस्कृतीच्या ऐतिहासिक परिसीमा स्पष्ट करणारें साम्यवादी तत्त्वज्ञान संवर्धन पावत होतें; नीति-अनीतीच्या बुरसलेल्या तत्त्वांचें गांठोडें बांधून त्यांना अडगळींच्या खोलींत फेंकण्याची तयारी नीतिशास्त्र करीत होतें; समाजशास्त्राची अभिनंदनीय वाढ होत होती – व या सर्वांचें सकौतुक अभिनंदन व संवर्धन करण्यांत बर्नार्ड शॉसारखे प्रगतिपर आत्मे दंग होते. अशा वेळीं जुन्या, मोडकळीस आलेल्या, पडत्या पक्षाची बाजू सांवरण्याचें कार्य चेस्टर्टन यांनीं आपल्या अंगावर घेतलें. या बुद्धिवान् व प्रतिभाशाली टीकाकाराला प्रतिपक्षाचे डावपेंच साध्य करून घ्यावयाला मुळींच वेळ लागला नाहीं. शत्रुपक्षाची मुख्य मदार तर्कबुद्धीवर आहे हें ओळखून चेस्टर्टन यांनीं तर्कशास्त्राला तर्कविरोधी तत्त्वज्ञानासाठीं राबविण्याचा निश्चय केला. त्यांनीं बचावाचें धोरण टाकून चढाईचें धोरण स्वीकारलें व शत्रुपक्षानें तर्कवादानें पुढें आणलेले मुद्दे तर्कदृष्ट्याच अग्राह्य आहेत, असें दाखविण्याचा क्रम चालविला.

तर्कशास्त्राचा चेस्टर्टननीं केलेला अलौकिक उपयोग जरी त्यांच्या तेजस्वी बुद्धिमत्तेची ग्वाही देई, तरी तो त्यांच्या तर्कवादाबद्दल संशय उत्पन्न करण्यासच कारणीभूत झाला. चेस्टर्टन तर्कवादानें हवें

तें सिद्ध करूं शकतात, हें सिद्ध होण्यानें त्यांच्या तर्कप्रणालीची प्रतिष्ठा वाढणार नव्हती. तर्कवाद्यांचे मुद्दे घेऊन, ते फोल आहेत असा युक्तिवाद चेस्टर्टन यांना करितां आला तर त्यांचा हा युक्तिवादहि अमोघ नाहीं हें सिद्ध करतां येण्यासारखें होतें. तर्कवादाच्या योग्य त्या मर्यादा न पाळल्या तर तें एक दुधारी शस्त्र बनतें हें चेस्टर्टन यांना दाखवून देणें कांहीं विशेषसें कठिण नव्हतें.

उत्क्रान्तिवाद्यांनीं, ईश्वराचें अस्तित्व तर्कशास्त्रानें सिद्ध करतां येत नाहीं, असा मुद्दा मांडल्याबरोबर त्याचें नास्तित्वहि तर्कशास्त्रानें सिद्ध होत नाहीं, असा प्रतिमुद्दा चेस्टर्टन यांनीं मांडला. या वाद-पद्धतीकडे पाहिलें म्हणजे त्यांच्या एकंदर तर्कवादाचें सामर्थ्य स्पष्ट होईल. एखाद्या वस्तूचें अस्तित्व सिद्ध करण्यासच पुराव्याची खरी जरूरी असते; नास्तित्वासाठीं नाहीं – निदान अस्तित्व सिद्ध करण्यास पुराव्याची अधिक जरूरी असते, इकडे चेस्टर्टन यांचें लक्ष गेलेलें नाहीं. बरें, ही बाब तर्कवादानें अनिर्णित राहिली तर संशयवादच तर्कशुद्ध व प्रामाणिक ठरतो. पण चेस्टर्टन तर पुरेपूर आस्तिक. नास्तिकवाद्यांच्या ग्रंथांतील परस्परविरोधी विधानें वाचूनच आपली आस्तिक्यबुद्धि दृढमूल झाली, असें ते म्हणतात. उदाहरणार्थ, अशा ग्रंथांत कांहीं ठिकाणीं ख्रिस्तधर्माला आशावादी म्हटलें आहे तर कांहीं ठिकाणीं तो निराशावादी असल्याचें दर्शविलें आहे. पण ख्रिस्त-धर्म ह्या दोनहि स्वरूपांत वावरला हें ऐतिहासिक सत्य आहे – व जो धर्म अशा परस्परविरुद्ध स्वरूपांत दृग्गोचर होतो त्याची सामाजिक विचारसरणी या दृष्टीनें उपयुक्तता अगर अनुपयुक्तता कांहींहि असली तरी तो ‘ धर्म ’ या पदवीस सहसा पात्र होणार नाहीं, इकडे चेस्टर्टन यांचें लक्ष गेलें नाहीं – व म्हणूनच स्वतःच्या धर्मोत्साहांत ते निमग्न राहिले !

त्यांची इतरहि विचारसरणी अशीच आहे. घटस्फोटाला विरोध करतांना ते म्हणतात, ‘ स्त्रीपुरुषांमध्यें परस्पर आकर्षण उत्पन्न

करण्यांत निसर्गाचा व पर्यायानें ईश्वराचा कांहीं विशिष्ट हेतु असला पाहिजे. आणि म्हणूनच विवाहाला करार ही संज्ञा न देतां तो एक धार्मिक व पवित्र संबंध आहे, हें मान्य केलें पाहिजे.' पण हें परस्पर प्रेम मावळल्याखेरीज कोणी घटस्फोटासाठीं आसुसणार नाहीं, व जर हें प्रेम अगर आकर्षण ईश्वरेच्छेनें निर्माण होतें तर त्याचा लोपहि ईश्वरेच्छेनें होतो हें उघड आहे, व असा लोप झाल्यावरहि विवाह हा पवित्र संबंध आहे असें मानून घटस्फोट टाळणें हें ईश्वरेच्छेचा भंग करण्यासारखें आहे. तेव्हां ईश्वरेच्छेला मान देऊन घटस्फोटाची इच्छा झाल्याबरोबर प्रत्येकाला तो मिळावा. या तर्कवादाकडे चेस्टर्टन यांचें दुर्लक्ष झालेलें दिसतें.

कित्येक ठिकाणीं चेस्टर्टन यांनीं अतिव्याप्ति-अव्याप्ति हे तर्क-दोष दडपून तर्कवादाच्या माथीं मारले आहेत व इकडून तिकडून आदळ-आपट करून 'जितं मया'चा भास निर्माण केला आहे. मांसाशनाची तरफदारी करतांना ते असें विद्वत्ताप्रचुर भाष्य करितातः ' मनुष्याला मृत्यूची जी एक जाणीव असते ती इतर प्राण्यांत आढळून येत नाहीं...मृत्यूच्या जाणिवेनें मनुष्यानें मानवी जीविता-संबंधीं जी तत्त्वज्ञानाची उभारणी केली आहे त्यावरच त्याची योग्यता अवलंबून असल्यामुळें मनुष्याच्या जीविताला मोठें मोल प्राप्त झालें आहे....मनुष्याचें मरण हें केवळ त्याच्या शरीराचें मरण नसून त्याच्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छा, आशा, आकांक्षा, इत्यादिकांचें तें मरण असतें. परंतु घोड्याला आज मारलें काय किंवा उद्यां तो आपसुख मेला काय, एकच. मरतेवेळीं खुद्द घोड्याच्या मनावर किंवा त्याच्या मरणानें इतर घोड्यांच्या मनांवर कांहींच परिणाम होत नाहीं.' घोड्याच्या मनाशीं चेस्टर्टनची ही समरसता कशी काय झाली असावी हा एक प्रश्न आहे. चेस्टर्टन यांनीं मनुष्य आणि सिंह ही इसापनीतींतील गोष्ट वाचली असली तरी हें वाक्य लिहितांना ती

ते पार विसरून गेलेले दिसतात. नाहीं तर त्यांनीं असला पोरकट युक्तिवाद केला नसता. तत्त्वज्ञान्याला सर्वस्वीं न शोभणाऱ्या या कोटिक्रमाचा प्रयोग त्यांनीं स्त्रियांच्या स्वातंत्र्यवादी चळवळीवरहि केला आहे. स्त्रियांनीं मतस्वातंत्र्याकरितां किंवा घराबाहेर पुरुषांबरोबरीनें हक्क मिळविण्याचा प्रयत्न करणें हें मूर्खपणाचें आहे, असें प्रतिपादन करतांना ते म्हणतात: ' स्त्रियांना घरांत जें स्वातंत्र्य आहे, त्याच्या पावपटहि नोकरीवाल्या पुरुषांना घराबाहेर नसतें. ' यावरून स्वातंत्र्य हें इथूनतिथून एकाच सांच्याचें असतें, अशी चेस्टर्टन यांची समजूत दिसते. स्वातंत्र्याचे निरनिराळे प्रकार असूं शकतात हें ज्याच्या बुद्धीच्या कक्षेंत शिरूं शकत नाहीं त्याची तर्कशक्ति त्याच्या मेंदूशीं बरीच धिंगामस्ती करीत असावी !

तरीपण बर्नार्ड शॉसारख्या तर्ककर्कशाशीं चेस्टर्टन यांनीं बरीच निकराची टक्कर दिली यांत संशय नाहीं. या दोघांमधील भांडण पाहण्यास प्रेक्षकांचा तुटवडा कोठेंच पडला नसता. पण इंग्लंडचे प्रेक्षक या भांडणाच्या निकालाबद्दल सर्वसाधारणपणें बेफिकीर असल्यामुळें त्यांच्या कौतुकाला एक प्रकारचें निर्व्याजत्व प्राप्त झालें होतें. आंग्ल प्रेक्षकांच्या या बेफिकीर वृत्तीचें मूळ आंग्ल प्रकृतीच्या व्यावहारिक संशयवादांत व इंग्लंडच्या महायुद्धपूर्व सुबत्तेंत होतें. रोजचा संसार सुखानें चालला असल्यानें या दोघांमधील बौद्धिक कसरत स्पेनमधील बैलांच्या झुंजीसारखीच त्यांना केवळ मनोरंजनाची बाब वाटली. परंतु शुद्ध तात्त्विकदृष्टया शॉ-चेस्टर्टनवाद महत्त्वाचा आहे यांत संशय नाहीं. चेस्टर्टन यांच्या वृत्तींत बालकाचा उत्साह व केवलानंदवृत्ति एकवटली होती. निसर्गाकडे व जगाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि रसिकाची होती, तर्कविवश टीकाकाराची नव्हती. शॉ यांच्या कट्टर 'प्युरिटॅनिझम'चें त्यांना वावडें होतें. त्यांच्या सौंदर्यदृष्टीला तर्कवादाच्या खुपऱ्या होऊन तिला अंधत्व आलें नव्हतें. एकंदर जीवन थोडेंसें मजेंत, आनंदांत, चैनींत घालवावें, अशी त्यांची

विचारसरणी होती. ' चैन करणें हा वैयक्तिक स्वातंत्र्याचा एक प्रकार असून थोड्याशा प्रमाणांत कां होईना पण प्रत्येक व्यक्तीला चैन करण्यास सवड ठेविली पाहिजे. नाहींतर मानवी जीवित सर्व-संगपरित्याग केलेल्या एखाद्याच्या आयुष्यासारखें कष्टप्रद व नीरस झाल्याखेरीज राहणार नाहीं, ' असें ते बजावून सांगत. दारूबंदीचा निषेध ते याच तत्त्वावर करीत. आपण मांसाला शिवत नाहीं व दारूचा वासहि घेत नाहीं, असें शॉ संधि सांपडेल तेव्हां मोठा गाजावाजा करून सांगत. आपण हीं दोनहि अति आनंदानें करतों, असें शॉच्याहूनहि आवाज वर चढवून चेस्टर्टन सांगत. बर्नार्ड शॉसारख्या शास्त्रव्युत्पन्न व प्रगतिपर विचारवन्ताला ते अनेकदां चीत करीत याचें इंगित हेंच. चेस्टर्टन यांचीं तत्त्वें कितीहि अशास्त्रीय, जुनाट व बुरसलेलीं असलीं तरी त्यांची जगाकडे पाहण्याची ही स्वागतपर दृष्टि शास्त्रीय व सांस्कृतिक विकासाला अधिक जवळची होती. शॉ यांचा कट्टर प्युरिटॅनिझम प्रतिगामी होता. इतकेंच काय, पण शॉ यांचें तत्त्वज्ञान कितीहि क्रांतिकारक असलें, त्यांचीं, विवाह, घटस्फोट, धर्म, कुटुंब, स्वदेशाभिमान, खासगी मालमत्ता वगैरे बाबतींत मतें कितीहि बंडखोरीचीं असलीं तर ज्या तत्त्वज्ञानजन्य प्रभेनें तीं सर्व अवगुंठलेलीं होतीं तें Elan Vital, Creative Will, अगर Evolutionary Appetite चें तत्त्व अशास्त्रीय आणि अतिभौतिक [mystical व metaphysical] होतें. चेस्टर्टन हे कट्टे आस्तिक्यवादी असूनहि त्यांच्या प्रखर तर्क-बुद्धीला प्रतिपक्षाच्या तर्कप्रणालींतील हे कच्चे सांधे सहज दिसले व त्यांनीं शॉच्या या आवडत्या तत्त्वाची मनसोक्त टर केली. शॉच्या Creative Willच्या तत्त्वावरील चेस्टर्टन यांची टीका आजहि उल्लेखनीय ठरेल. बर्नार्ड शॉसारख्या प्रगतिपर तत्त्वज्ञानाच्या विचार-संपदेंतील ह्या खोट्या दागिन्यांवर चेस्टर्टननीं आपल्या प्रतिभेचा

तेजाब टाकल्यामुळें त्यांचें पितळ उघडें पडलें व चेस्टर्टनसाहेबांचा युक्तिवाद पुष्कळ ठिकाणीं बिनतोड झाला, यांत संशय नाहीं.

पण आंग्ल संस्कृतीच्या किंवा विचारांच्या इतिहासांत चेस्टर्टन यांचें स्थान निश्चित करूं लागल्यास ते एक डॉन क्विक्झोटच वाटूं लागतात. केवळ त्यांच्या विक्षिप्त मतांकडे पाहून त्यांना डॉन क्विक्झोट हें अभिधान पुष्कळांनीं बहाल केलें आहे. परंतु विक्षिप्त-पणा हा कांहीं क्विक्झोटचा खरा विशेष नव्हे. बर्नार्ड शॉहि कांहीं कमी विक्षिप्त नाहींत. परंतु या विक्षिप्त मूर्तीला डॉन क्विक्झोट म्हणणें हास्यास्पद ठरेल. क्विक्झोटच्या विक्षिप्तपणाचें मूळ त्याला आधुनिक युगांत सरंजामी chivalryचीं स्वप्नें पडलीं व तीं त्यानें प्रत्यक्षांत आणण्याचा प्रयत्न केला या विचित्र घटनेंत आहे. याच खऱ्याखुऱ्या अर्थानें चेस्टर्टन हे इंग्लंडच्या वाङ्मयाचे आधुनिक डॉन क्विक्झोट आहेत. चेस्टर्टन हे आजच्या युगांत जन्मले खरे, पण ते जन्मभर भूतकालांत वावरले. मध्ययुगीन सरंजामशाही कार-भाराच्या काल्पनिक सुखस्वप्नांत ते सदासर्वदा रंगून जात. मानवी इतिहासाच्या या, घनदाट काळ्या नव्हे तरी करड्या भोरकट युगांत ते भविष्यकाळाचा स्वच्छ सुंदर चित्रपट पाहत. चालत्या गाडींतून, मागें धांवणाऱ्या सभोंवतालच्या प्रदेशाबरोबर परत जाऊं पाहणाऱ्या प्रवाशाशीं त्यांची तुलना करणें योग्य ठरेल. त्यांना मीं आंग्ल वाङ्मयांतील पिरॅमिड म्हटलें. इंग्लंडच्या वैचारिक इतिहासांतीलहि ते पिरॅमिडच ठरतील; पण उलटे पिरॅमिड ! पिरॅमिडच्या निमुळत्या टोंकावर त्याचा अवाढव्य पाया तोलून धरण्याइतकाच त्यांचा, आधुनिक युगाचा वैचारिक पाया गतयुगांतील सरंजामी बैठकीवर तोलून धरण्याचा प्रयत्न हास्यास्पद होता !

जुलै १९३६



# प्रो. वामन मल्हार जोशी

परवां बडोद्याला श्री. माडखोलकरांबरोबर कांहीं मंडळींशीं गप्पा मारतांना प्रो. वामनराव जोश्यांचा विषय निघाला, तेव्हां माडखोलकर माझ्याकडे वळून एकदम म्हणाले, " वामनराव ना, त्यांच्याबद्दल यांना विचारा. ते यांचे ' हीरो ' आहेत." माझ्या ' हीरो 'विषयींच्या माझ्या मित्रांच्या कल्पना पाहिल्या, विशेषत: मी माझे 'हीरो' वारंवार बदलतों हा त्यांचा आरोप ऐकला म्हणजे माझी खूप करमणूक होते. मला ज्याचे गुण आवडतात त्याची त्या गुणांपुरती मी मनसोक्त स्तुति करतों. ज्या व्यक्ति आणि वस्तु मला आवडतात त्यांच्याबद्दल स्तुतीचे आत्यंतिक उद्गार काढायची माझी संवय आहे. पण म्हणून मला त्यांचे दोष माहीत नसतात हा आरोप बरोबर नाहीं. आकाशांतील व्याधाच्या चांदणीच्या सौंदर्यानें मी जेव्हां मोहून जातों, तेव्हां याच आकाशांत एखादा धूमकेतु संचार करीत आहे याची जाणीव मला असते. जिला मी ' हीरो '

असें प्रामाणिकपणें म्हणूं शकेन अशी एकच व्यक्ति होऊन गेली — ती म्हणजे लिऑं ट्रॉट्स्की. ट्रॉट्स्कींच्या स्मरणानें मला मानवी इतिहासांतल्या अलौकिकत्वाचा साक्षात्कार अनेकदां झाला आहे. पण ट्रॉट्स्कींच्याहि दोषांकडे माझी डोळेझांक होऊं शकली नाहीं. माझी कोणावर आंधळी श्रद्धा जडेल असें मला वाटत नाहीं, आणि जडूं नये अशी माझी इच्छा आहे.

तरीपण ज्ञानोपासनेच्या दृष्टीनें प्रो. वामन मल्हार जोशी हे मला एक आदर्श पुरुष वाटतात हें मी एकदम कबूल करतों. वामनरावांच्या ज्ञानोपासनेचा मी विचार करूं लागलों म्हणजे एक प्रसंग मला नेहमीं आठवतो. १९३४ च्या डिसेंबरांतली हकीकत. मी तेव्हां पुण्यास होतों आणि माझा मुक्काम बहुतेक वामनरावांकडेच असे. एका सायंकाळीं मी इन्टरनॅशनल बुक सर्व्हिसमधून घरीं आलों. वामनराव नुकतेच टेनिस खेळून दमूनभागून आले होते. इंटरनॅशनल-मध्यें चाळलेल्या प्रो. जॉन मॅक्मरी याच्या 'कम्युनिझमचें तत्त्वज्ञान' या पुस्तकांतील एका वाक्यानें माझ्या डोक्यांत विचारांचा इतका व्याप माजला होता कीं मला राहवेना. लगेच त्यांना मीं म्हटलें, 'तात्या, आतांच मी जॉन मॅक्मरींचें एक पुस्तक वाचलें. त्यांत तो म्हणतो—'

तात्यांची श्रान्त मुद्रा आतुरतेनें एकदम टवटवीत झाली ! मी उत्तेजित होऊन बोलूं लागलों,

"मॅक्मरी म्हणतो, 'Communism and Individualism are opposite and irreconcilable. But Community and Individuality are correlatives—"

"त्याचं असं आहे—" तात्यांनीं बोलण्यास सुरवात केली. पण त्यांचें वाक्य पुरें करूं न देतांच मी म्हणालों,

'पण पटत नाहीं मला हें तितकेंसें. हें नुसतें तात्त्विक सत्य झालें. पण तें व्यवहारांत कसं उतरवायचं ? The problem to-day is how to reconcile Community with Individualism

[in the Capitalist World] and Individuality with Communism [in Soviet Russia].'

माझें हें वाक्य ऐकतांच तात्या एकदम गप्प झाले. त्यांच्या चेहऱ्यावर विचारांच्या छटा पसरूं लागल्या. त्यांच्या कपाळावरील आंठ्यांत भर पडली. त्यांच्या शोधक नजरेंत तेजस्विता लकाकूं लागली. मी तेथून उठून आंतल्या खोलींत जाऊन बसलों.

जरा वेळानें त्यांच्याकडे त्यांचे दोन सहकारी प्राध्यापक आले. दिवसभराचा शीण तात्यांच्या काव्यशास्त्रविनोदाच्या जलवाहिनीत बुडवून टाकावा असा त्यांचा विचार होता हें त्यांच्या नुसत्या आवाजावरून स्पष्ट होत होतें. पण तात्यांनीं एकदम शास्त्रालाच हात घातला. त्यांनीं तडक मला हांक मारली आणि ते म्हणाले, 'अहो पाध्ये, तेवढं तुमचं तें मघांचें वाक्य यांना सांगा. फार सुंदर आहे तें—अहो, ऐका, ऐका!'

मी माझें वाक्य त्याच्या साऱ्या पार्श्वभूमीसह त्यांना सांगितलें. त्या वाक्याचा परिणाम त्या दोन सद्गृहस्थांवर, त्यांच्या हातांतल्या काठीवर झाला तितकाच झाला ही गोष्ट वेगळी. पण त्या प्रसंगानें तात्यांच्या अभिजात ज्ञानोपासनेचा प्रत्यय मला आला. 'बालादपि सुभाषित् ग्राह्यम्' ह्या सुभाषिताचा साक्षात्कार ज्याच्या ठिकाणीं झाला आहे असा ज्ञानोपासक मला त्या दिवशीं प्रथमच भेटला. [हें वाक्य लिहून माझ्या उद्गारांना मी स्वतःच सुभाषित असें म्हणून घेत आहें — पण वामनरावांचा त्या उद्गारांना आशीर्वाद असल्यानेंच तें धाष्टर्य माझ्या हातून झालें!]

प्रो. वामनराव हे इतके निष्ठावान् ज्ञानोपासक आहेत कीं आपल्या उपास्यदैवताशीं त्यांची जवळजवळ एकरूपता झाली आहे. प्रो. वामनरावांच्या संगतींत आलें कीं, प्रत्यक्ष ज्ञानाच्या संगतींत आल्यासारखें वाटतें. वामनरावांहूनहि विद्वान् आणि बहुश्रुत गृहस्थ महाराष्ट्रांत आहेत, परंतु वामनरावांच्या संगतींत आपणाला

आपल्या लघुत्वाची जशी जाणीव होते तशी त्यांच्या संगतींत होत नाहीं. मात्र हें लघुत्व आईपुढील बालकाच्या लघुत्वासारखें असतें. लहान मुलें आईवडिलांच्या हाताखांद्यावर जशीं आनंदानें बागडतात तसे आपण वामनरावांच्या संगतींत ज्ञानाच्या हाता-खांद्यावर बागडतों. मला हा अनुभव आणखी एका विद्वानाच्या संगतींत आला आहे. ते म्हणजे डॉ. केतकर. परंतु केतकर आणि जोशी यांच्या व्यक्तित्वांत एक मोठा फरक आहे. जगांत एकंदरींत खोटीं नाणींच फार, याची तीव्र जाणीव ज्ञानकोशकारांना होती; तर 'No man is essentially bad' हें वामनरावांचें ब्रीदवाक्य आहे. म्हणजे ज्ञानोपासनेनें केतकरांच्या सात्त्विक वृत्ति जागृत झाल्या नव्हत्या असें मला म्हणावयाचें नाहीं. ज्ञान हें तत्त्वतः सात्त्विकच असतें. ज्ञानाला अज्ञान आणि असत् यांची कारण-मीमांसा माहीत असल्यानें तें नेहमींच सात्त्विक आणि सहनशील असतें. डॉ. केतकरांच्या अंतःकरणांत सात्त्विकता नांदत होती, परंतु त्यांच्या वृत्तीनुसार तिचा विलास मिस्किल बनला. वामन-रावांच्या सात्त्विकतेचें स्वरूप उदात्त आहे.

सात्त्विकता हाच वामनरावांचा आत्मीय विशेष आहे. वामन-रावांच्या सहवासांत काय अगर वाङ्मयांत काय, त्यांच्या अभिजात सात्त्विकतेचाच प्रत्यय अगोदर येतो. या सात्त्विकतेमुळेंच प्रत्येक व्यक्तींत अगर वस्तूंत चांगलें असेल तें, हवें तर हुडकून काढून, पाहण्याची संवय त्यांना जडली आहे. याचा परिणाम असा झालेला दिसतो कीं, एखादी गोष्ट त्यांना पूर्णपणें समाधानकारक वाटली नाहीं तरी ती पूर्णपणें टिकाऊ आहे असेंहि त्यांना कधीं वाटत नाहीं. मला वाटतें, पॅरिसच्या बदमाषखान्यांत [ underworld ] त्यांना नेलें तरी येथें सृजनशील संस्कृतीचीं बीजें आहेत, असा शोध लावून ते परत येतील ! या त्यांच्या वृत्तीमुळेंच ते अजातशत्रु झाले आहेत. इतकेंच काय, पण एखाद्यानें त्यांचें शत्रुत्व करावयाचें म्हटलें तरी

त्याच्या वाजवी योग्यतेबद्दल त्यांच्या वर्तणुकींत अशी कांही आपुलकी आणि आदर प्रतीत होईल कीं, शत्रुत्वाच्या मोहिमेवर निघालेला तो लढाऊ वीर सुरुवातीच्या चकमकींतच घायाळ होऊन त्यांना शरणचिठ्ठी लिहून देईल आणि आजन्म मैत्रीचें व्रत घेऊन परत फिरेल !

जग खरोखर सात्त्विक आहे, अशी वामनरावांची भावना आहे. आणि इतरांतली सात्त्विकताच त्यांना विशेष दिसत असल्यानें तिच्याशीं एकरूप होण्यासाठीं त्यांच्यांतली सात्त्विकता धडपडत असते. जगांत चांगलें पाहावयाचें व जगाला चांगलें द्यावयाचें, हा वामनरावांचा स्वभाव बनला आहे. त्यांच्या मनमोकळ्या आणि प्रेमळ वर्तणुकीचें हेंच रहस्य आहे. दुसऱ्याशीं ते झटकन् समरस होतात आणि या त्यांच्या वृत्तीमुळेंच, मला वाटतें, ते कोणत्याहि वादांतला पूर्वपक्ष इतका चांगला रंगवूं शकतात. इतरांशीं समरसता साधण्याच्या भरांत ते स्वतःला केव्हां केव्हां इतकें विसरतात कीं, वादांत त्यांनीं स्वतःच रंगविलेला पूर्वपक्ष त्यांच्यावर मात करतो — त्यांचा उत्तरपक्ष फिका पडतो ! ' ज्ञान हें विष कीं अमृत ' हा त्यांचा प्रबंध या विधानाचें उत्कृष्ट उदाहरण आहे. प्रतिपक्षाचा दृष्टिकोन पाहण्यांत वामनरावांचा हातखंडा आहे आणि म्हणूनच कोणत्याहि वादांत शिष्टाई करण्यास त्यांच्यासारखा मध्यस्थ नाहीं.

वामनराव मध्यस्थ होतील, परंतु लढवय्ये म्हणून गाजणार नाहींत. कोणत्याहि लढ्यांत हिरिरीनें पडण्यास प्रतिपक्षाबद्दल जो एक प्रकारचा त्वेष, एक प्रकारचा अनादर अंगांत बाणावा लागतो तो, प्रतिपक्षाचे गुणच वामनरावांच्या नजरेस अधिक पडत असल्यानें, त्यांच्या अंगांत कधींहि बाणणार नाहीं; आणि म्हणूनच ' मराठ्या 'चे संपादक असतांना, ' संपादकांनीं नेहमीं वकिली धोरण ठेवावें; आपल्या पक्षाचें समर्थन, प्रतिपक्षाकडे थोडीशी

डोळेझांक करून, त्यानें करावें ' हा लोकमान्य टिळकांचा उपदेश त्यांच्या वृत्तीला मानवला नाहीं. आपल्या सार्वजनिक जीवनास राजकारणानें–सक्रिय राजकारणानें–सुरुवात केलेले वामनराव आयुष्याच्या उत्तरार्धांत समाजाचे प्रतिभावान् नेते न बनतां एक आदर्श शिक्षक बनले हें या वृत्तीस अगदीं धरूनच झालें.

एका दृष्टीनें हा खरोखर पराभव होता. ' विश्ववृत्त 'प्रकरणीं घडलेल्या तुरुंगवासानें त्यांना कांहीं अमोलिक अनुभव दिले व त्यामुळें त्यांचें वाङ्मय सकसहि झालें; परंतु ज्या ध्येयानें प्रेरित होऊन त्यांनीं सार्वजनिक जीवनास प्रारंभ केला त्या ध्येयाच्या ध्रुवताऱ्याकडे दृष्टि लावून जीवनपथावर पावलें टाकीत राहण्याचें त्यांना फार काल जमलें नाहीं. खाजगी जीवनांतहि त्यांना अत्यंत विदारक अनुभव वारंवार आले; तरी देखील ते निराशावादी किंवा निरर्थवादी [cynic] बनले नाहींत. आणि याला कारण त्यांची अभिजात सात्त्विकताच. कटुतेंत मधुरता अनुभवण्याची शक्ति त्यांना लाभली असल्यानें त्यांच्या अंतःकरणांत विषारीपणास अवकाश नाहीं. वामनराव कोणाविरुद्ध कधीं कडवटपणानें बोलतांना आढळत नाहींत याचें कारण हेंच. पण दैवदुर्विलास हा कीं, याच कारणास्तव कांहीं लोक त्यांच्यावर टीका करतांना आढळतात. कांहीं जण ते हीन वाङ्मयाविरुद्ध निषेध प्रकट करीत नाहींत म्हणून रागावलेले आहेत, तर कांहीं इतर ते हीन व्यक्तींच्या विरुद्ध काहूर उठवीत नाहींत म्हणून रुसलेले आहेत. कांहीं उथळ व्यक्तींना तर यांत भीरुताच आढळते. आणि मौज अशी कीं, कित्येकदां खुद्द वामनरावच या उथळ व्यक्तींच्या गैरसमजुतीस स्वतःच्या मुखानें पाठिंबा देतांना आढळतात. दोन वर्षांपूर्वी, एका प्रकाशकातर्फे, त्यांना आत्मचरित्र लिहिण्याची विनंती करण्यासाठीं मी भेटलों, तेव्हां त्यांनीं मला नकार दिला आणि आपला भित्रेपणा हेंच या नकाराचें कारण सांगितलें. ' अहो, आत्मचरित्र लिहावयाचें म्हणजे त्यांत कित्येक

व्यक्तींवर टीका करावी लागते – आणि तेवढें मला धैर्य नाहीं.' धैर्य नाहीं हें सांगण्याचें धैर्य ज्या गृहस्थापाशीं आहे त्याची ही सबब तितकीशी बरोबर नसावी हें उघड होय. मला तरी वामनरावांच्या या नकाराचें खरें कारण वेगळेंच दिसतें. आयुष्यांत ज्या व्यक्ति वाईट वाटल्या त्या खरोखर वाईट नसाव्यात, किंवा जे अनुभव कटु वाटले ते तितकेसे कटु नसावेत, ही जाणीव त्यांच्या अंतर्मनांत खोल कोठें तरी दडून बसली आहे, आणि तिच्यांतूनच आत्मचरित्र लिहिण्याची ही अनिच्छा उद्‌भवली असावी असें मला वाटतें.

प्रो. वामनराव हे ' संशयात्मा ' म्हणून प्रसिद्ध – किंवा अधिक अचूक बोलायचें तर कुप्रसिद्ध– आहेत. परंतु 'संशयात्मा' असूनहि ' संशयात्मा विनश्यति ' अशी त्यांची स्थिति कां झाली नाहीं हें मात्र त्यांचे आक्षेपक सांगत नाहींत. माझ्या मतें, वामनरावांवर ' संशयात्मा ' असा आरोप करतांना जो अभिप्राय आक्षेपकांच्या मनांत असतो त्या अभिप्रायाच्या दृष्टीनें वामनरावांना संशयात्मा म्हणणें बरोबर नाहीं. कारण, ' इरसाल संशयात्म्या 'प्रमाणें यांत काय आहे, त्यांत काय आहे अशी वृत्ति त्यांची नाहीं. यांत कांहीं अर्थ नाहीं, त्यांत कांहीं अर्थ नाहीं, कशांतच कांहीं अर्थ नाहीं, असे तुच्छतापूर्वक आवाज काढणारे निरर्थवादी वामनराव नाहींतच. उलट, प्रत्येक लहानसहान गोष्टींत कांहींतरी अर्थ, कांहींतरी आशय, कांहींतरी चांगुलपणा, त्यांना दिसतोच. जगाकडे अशा स्वागतपर दृष्टीनें पाहणाऱ्या सार्थवादी तत्त्वज्ञान्याला विनाशाची वाट चालणारा संशयात्मा ( म्हणजे खरोखर ' शंकेखोर ' ) म्हणणें म्हणजे शब्दांची केवळ विटंबना नव्हे काय ? आणि ज्या अर्थी वामनरावांचा असा संशयात्मा कधीं झालाच नाहीं त्या अर्थी ' संशयात्म्या 'साठीं व्यासांनीं मुद्दाम ' रिझर्व्ह ' केलेली जागा त्यांच्या वांट्याला कधीं आलीच नाहीं.

अर्थात् वामनराव हे मि. बर्ट्रँड रसेल यांच्या कोटींतले संदेहवादी आहेत, एवढेंच जर एखाद्याला सुचवायचें असेल तर त्याच्या अभिप्रायाचा अधिक सहानुभूतीनें विचार करतां येईल. परंतु संदेहवादाचें ध्येय सत्यसंशोधन हें असतें, हरेक गोष्ट अर्थ-शून्य आहे असें सिद्ध करणें हें नसतें. म्हणूनच संदेहवादाचें पर्यवसान विनाशांत होत नाहीं. मि. रसेल यांनींच संदेह-वादावरील आपल्या सुप्रसिद्ध निबंधांत म्हटल्याप्रमाणें, खरा संदेहवादी हा आपल्या संदेहवादाबद्दल सुद्धां संदेह बाळगतो. [ A sceptic shoud be sceptical about his own scepticism also. ] वामनराव स्वतःच्या संदेहवादाकडे याच दृष्टीनें पाहतात असें 'वाङ्मयापेक्षां जीवित उच्चतर आहे' या त्यांच्या आवडत्या सूत्रावरून स्पष्ट दिसतें. मानवी जीविताबद्दल त्यांनीं एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, 'काव्यांतले प्रसंग वाचण्यापेक्षां स्वतःचें जीवनच काव्यात्मक करावें व मग दुसऱ्यांनीं वाटल्यास त्यासंबंधीं काव्यें करावींत किंवा वाचावींत ! संशयस्थानांनीं परि-पूर्ण असा इतिहास वाचण्यापेक्षां किंवा लिहिण्यापेक्षां आपल्या पराक्रमानें नवा इतिहास बनविला तर अधिक चांगलें.' हे उद्गार विनाशाच्या गर्तेत पावलें रुतलेल्या 'संशयात्म्या'चे आहेत काय ?

वामनरावांच्या संदेहवादाचा विचार करीत असतांना त्यांच्या वृत्तीचे दुसरे एक विद्वान् सहज नजरेसमोर येतात, ते म्हणजे तात्यासाहेब केळकर. परंतु केळकर आणि जोशी यांच्या भूमिकांत मला फरक दिसतो. वामनरावांप्रमाणेंच नरसोपंतांना स्वतःच्या बाजूचा विचार करतांना प्रतिपक्षाचीहि बाजू दिसूं लागते हें खरें; परंतु त्यांत, सर्वत्र सत्तत्त्व पाहणाऱ्या वामनरावांच्या सात्त्विकतेपेक्षां, प्रतिपक्षावर मात करण्याच्या दृष्टीनें स्वतःच्या बाजूंत कांहीं कच्चे दुवे आहेत किंवा काय याची फिकीर करणारी वादपटूची सावधबुद्धीच अधिक आहे असें मला वाटतें. वामनरावां-

प्रमाणें केळकर वादविवादाकडे सत्यसंशोधनाच्या तत्त्वज्ञानी दृष्टीनें पाहत नाहींत तर विजयलालसेच्या हिरिरीनें पाहतात. मात्र याहि वेळीं त्यांची कलात्मकता नष्ट होत नाहीं. केळकरांच्या या कलात्मकतेचें वर्णन खुद्द वामनरावांनींच फार सुंदर रीतीनें केलें आहे. त्यांत ते म्हणतात, 'केळकरांना प्रतिपक्षास चीत करण्यांत अर्थात् आनंद होईलच, पण वाङ्मयदृष्ट्या कशा सुंदर रीतीनें प्रतिपक्ष्याचा युक्तिवाद उलटविला, कशा चातुर्यानें त्याच्या पेंचांतून सुटलों...या व अशा विचारांपासून उत्पन्न होणाऱ्या वाङ्मयविषयक स्वसामर्थ्यप्रतीतीमुळें त्यांना अधिक आनंद होईल, व आपल्या युक्तिवादांतील, स्वभाषेंतील, कोट्यांतील वगैरे सौंदर्य पाहून तद्विषयक रसास्वाद घेण्यांत तर ते विशेष रममाण झालेले आपल्या कल्पनेला दिसतील.' अर्थात् केळकरांच्या या कला-विलासामुळें आपल्याला आनंद होईलच, परंतु वामनरावांच्या सरलबुद्धि वादविवादांतून निर्माण होणाऱ्या आनंदाइतका तो विशुद्ध आणि सात्त्विक असणें शक्य नाहीं.

केळकर हे व्यवहारकुशल आहेत. जीवनाशीं लौकिक दृष्ट्या यशस्वी संधान बांधण्याची युक्ति त्यांना पूर्वायुष्यांतच जशी सांपडली तशी ती वामनरावांना अद्यापहि सांपडलेली नाहीं. [ किंवा त्यांनीं कधीं ती शोधलीच नाहीं. ] केळकरांच्या व्यवहारी दृष्टीला समेट आणि तडजोड यांची व्यावहारिक उपयुक्तता स्पष्ट दिसत असल्यामुळेंच त्यांची बुद्धि सुवर्णमध्याकडे धांव घेत असते, अशी माझी समजूत आहे. उलट विशुद्ध तात्त्विक दृष्टीला सुवर्णमध्य हा पुष्कळदां सुवर्णमृगाप्रमाणेंच दिसत असतो, व बहुधा यामुळेंच वामनरावांच्या वाङ्मयांत सुवर्णमध्याची मंद प्रभा फारशी कोठें आढळत नाहीं. तें कसेंहि असलें तरी केळकरांची भूमिका वामनरावांच्याप्रमाणें नाहीं, हें त्यांच्या वर्तणुकींत अगर वाङ्मयांत

जोशींच्या सात्त्विकतेचा प्रत्यय येत नाहीं या एकाच गोष्टीवरून सिद्ध व्हावयास हरकत नसावी.

तात्यासाहेब केळकरांप्रमाणेंच, प्रो. वामनराव हे नुसते ज्ञानोपासक नाहींत; ते कलोपासकहि आहेत. 'ज्ञान हें विष कीं अमृत' हा त्यांचा प्रबंध वाचतांना, दुसऱ्या प्रकरणांत, ते ज्ञानानंदाबद्दल बोलत आहेत कीं काव्यानंदाबद्दल बोलत आहेत असा संभ्रम ज्याप्रमाणें सारखा वाटत असतो त्याप्रमाणें त्यांच्या वाङ्मयांत विहार करीत असतांना मिळणारा आनंद ज्ञानानंद आहे कीं काव्यानंद आहे असा संभ्रम वाटत असतो. बुद्धि आणि भावना, तर्कवाद आणि काव्यात्मकता यांचा इतका सुंदर संगम मराठी वाङ्मयांत तरी इतरत्र क्वचितच आढळतो. विशेषत: त्यांच्या सहवासांत ज्ञानानंद आणि काव्यानंद यांच्या मोहक मिलाफाची प्रतीति विशेष येते आणि त्यांच्या सहवासांत लाभणाऱ्या आनंदाचें स्वरूप असें दुहेरी असतें म्हणूनच, मला वाटतें, निर्भेळ कलानंदापेक्षां तो मला अनेकदां अधिक आकर्षक वाटला आहे. गतवर्षींचाच एक प्रसंग मला येथें आठवतो. सेंट झेविअर कॉलेजच्या मराठी वाङ्मयमंडळाच्या वार्षिकोत्सवाचे वामनराव अध्यक्ष होते. त्यांचें अध्यक्षीय भाषण आटोपल्यावर सौ. हिराबाई बडोदेकरांचें गायन सुरू झालें. तेव्हां ते मजकडे आले आणि म्हणाले, 'पाध्ये, मला कांहीं संगीत आवडत नाहीं, तेव्हां तुमची हरकत नसेल तर आपण घरीं जाऊं या.' मला हिराबाईचें संगीत प्रिय होतें, परंतु वामनरावांच्या सहवासाची गोडी किती तरी अधिक असते हें अनुभवानें माहीत होतें. माझ्या बरोबरीच्या एका गानलोलुप मैत्रिणीला मात्र हिराबाईच्या गाण्याचा त्याग करवेना; पण माझ्या

मुर्वतीसाठीं तीहि आमच्याबरोबर आली. सुमारें तासभर काव्य-शास्त्रविनोद करून आम्हीं परतलों, तेव्हां माझी ती मैत्रिण अगदीं खूष होऊन म्हणाली, ' बरं झालं बाई, आपण आलों तें. हिराबाईचं गाणं मी हज्जारदां ऐकलंय्. पण तात्यांच्या गप्पांची मजा कांहीं निराळीच ! '

आणि म्हणूनच तात्यांच्या सहवासांतला आनंद लुटण्याची संधि मी सहसा वांया दवडीत नाहीं.

मार्च १९४१



# प्रो. नारायण सीताराम फडके

**प्रो.** फडके, खांडेकर, माडखोलकर आणि अत्रे यांचीं नांवें एका दमांत आणि स्वरांत सांगणाऱ्या मराठी वाचकाला या साहित्यिकांतील फरक माहीत नसतो असें नाहीं. फडके कलावादी आहेत तर खांडेकर जीवनवादी आहेत, हा कठिण वाद त्याच्या कानांवरून गेलेला असतो; माडखोलकरांच्या कादंबऱ्या राजकारण-प्रधान असतात, तर फडक्यांच्या प्रणयप्रधान असतात, ही द्दांकाटी त्यानें ऐकलेली असते; अत्र्यांच्या विडंबक विनोदाची आतषबाजी फडक्यांच्या प्रशांत वाङ्मयांत नसते एवढें त्याला माहित असतें.

या विख्यात साहित्यिकांचे स्वभावविशेष कर्णोपकर्णीं त्याजपर्यंत येऊन पोचलेले असतात व त्यांतील कांहीं निवडक भेदांची नोंद त्यानें केलेली असते. श्रीयुत खांडेकर हे एखाद्या ध्येयवाद्याचें त्यागी जीवन जगतात तर प्रो. फडके यांच्या स्वच्छंदी जीवनांत

रसिकतेचा बेछूट विलास आढळतो असे त्याचे कान कोणातरी आगंतुक माहितगारानें फुंकलेले असतात.

प्रोफेसर फडके हे एक अव्वल दर्जाचे रसिक आहेत, ही गोष्ट ते स्वतःच अभिमानानें नमूद करतील. जीवन ही देखील एक कलाच आहे, आणि इतर साऱ्या कलांप्रमाणें आनंदनिर्मिति हेंच जीवनाच्या कलेचेंहि कार्य आहे असें ते समजतात, आणि म्हणूनच जीवनाचा मनमुराद आस्वाद घेण्यांत त्यांना कसलाहि कमीपणा वाटत नाहीं. प्रो. फडक्यांची रसिकता त्यांच्या वाङ्मय-निर्मिती-इतकीच उत्साही आणि उत्सवप्रिय आहे. जीवनांतील आनंदाचा अनुभव घेण्यासाठीं ते प्रसंगीं वेश्यांच्या मोहल्यांत जाऊन मध्यरात्रीं एखाद्या ' जान'चें गाणें ऐकतील, प्राध्यापकीय शिष्टपणा झुगारून देऊन विद्यार्थिनींबरोबर रंगभूमीवर ' नाचतील ', क्रीडांगणावर क्रिकेटपटूंच्या बॅटीच्या बेसुमार फिरतीचें कौतुक करण्यासाठीं हात-रुमाल हवेंत उडवून ' पोट्ट्यां'च्या समुदायांत उड्या मारतील, सभ्यतेची शिस्त बाजूला ठेवून नटनटींच्या घोळक्यांत वेळप्रसंगीं सामील होतील किंवा निसर्गाच्या नादीं लागून ते मलयगिरीवरील वसंतकालांत स्वत:ला विसरतील.

होय, जीवनाचा आनंद लुटण्यांत प्रोफेसर फडके दंग असतात. पण यांत चमत्कारिक तें काय आहे ? प्रत्येक कलावन्त हा अभिजात रसिकच असतो. रसिकता अन्तर्मुख झाली कीं कलेचा जन्म होतो. प्रो. फडक्यांप्रमाणेंच खांडेकर, माडखोलकर हे देखलि चांगले रसिक आहेत. कदाचित् त्यांच्या रसिकवृत्तीचा आविष्कार फडक्यांच्या इतका दिलखुलास नसेल. कदाचित् फडक्यांच्या रसिकतेची नजरच वेगळी असेल –

या साऱ्या साहित्यिकांपेक्षां प्रो. फडक्यांची मनोवृत्तिच वेगळी. या त्यांच्या विशिष्ट मनोवृत्तीमुळेंच ते विख्यात साहित्यिकांच्या वृंदांत वेगळे पडतात आणि ठेंगू असूनहि उठून दिसतात. हें त्यांचें

वैशिष्ट्य कोणालाहि नकलून घेतां येण्यासारखें नाहीं. ती त्यांची प्रवृत्ति अभिजात आहे, व मराठी वाङ्मयांत तरी ते या प्रवृत्तीचे एकमात्र प्रतिनिधि आहेत.

प्रो. फडके यांच्या वाङ्मयीन प्रकृतीचा बरोबर बोध होण्यासाठीं इंग्लंडमधील उच्चभ्रू आधुनिकतावाद्यांकडे [ Highbrow Modernists ] तौलनिक दृष्टीनें पाहिलें पाहिजे. मराठी वाङ्मयानें इंग्रजी वाङ्मयाकडून अनेक प्रकारें स्फूर्ति घेतली आहे. शेक्सपीअरनें मराठी रंगभूमीवर कालिदासाशीं सहकार्याचें हस्तांदोलन केल्यावरच मराठी रंगभूमीचा कारभार नांवारूपास आला. डिकन्सनें मनुष्यस्वभावाचे नाजुक कुंचले हरिभाऊ आपट्यांच्या पात्रांवर फिरविल्यावरच मराठीची सामाजिक कादंबरी वैभवास चढली. वॉल्टर स्कॉटनें मराठी वाङ्मयांत घोडदौड केल्यावरच महाराष्ट्राच्या ऐतिहासिक कादंबऱ्या तेजस्वी आणि स्फूर्तिप्रद होऊं लागल्या. शॉच्या नांवावर हक्क सांगणारे वाग्वीरहि महाराष्ट्रांत निर्माण झाले. समाजवादाचा लाल बावटा देखील ‘ उठो जागो ’ करीत महाराष्ट्र सारस्वताच्या प्राङ्गणांत फडकूं लागला आहे. मग इंग्लंडची उच्चभ्रू आधुनिकता तेवढीच हिंदी साम्राज्याच्या दऱ्याखोऱ्यांत मुलुखगिरी केल्याशिवाय कशी राहील ? प्रो. फडक्यांखेरीज आणखी दुसरा एखादा शिलेदारतिला सांपडला नसला तर तो केवळ परिस्थितीचा दोष आहे. या परिस्थितीच्या माऱ्यामुळेंच फडक्यांना आपल्या आधुनिकतेची फेरतपासणी आज करावीशी वाटत असावी असें दिसतें.

जीवनाकडे स्वागतपूर्ण दृष्टीनें, खेळकर व प्रसन्न आपुलकीनें पाहणें हा आधुनिकतावाद्यांचा बाणा आहे. निसर्गानें मोठ्या औदार्यानें दिलेल्या जीवनास सुतक्याप्रमाणें नकार देण्याचा निसटता विचारहि त्यांच्या डोक्यांत डोकावणार नाहीं. या आधुनिकतेमुळें प्रो. फडक्यांची रसिकवृत्ति आनंदातिशयानें खुलली असेल. जीवनांतील अनुभवग्रहणाबद्दलची त्यांची तत्परता या आधुनिकतेचीच

द्योतक आहे, या अनुभवग्रहणाच्या हव्यासामुळेंच ता. ७ नोव्हेम्बर १९३८च्या संपाचीं दृश्यें स्वतः पाहण्यासाठीं ते मुद्दाम कोल्हापूरहून मुंबईस आले. फडक्यांच्या या अनुभवाचा मनोहर आविष्कार त्यांच्या ललितकृतींत होतो. आणि म्हणूनच त्यांच्या ललितकृतींत संघर्षाचा प्रकोप नसूनहि त्या जीवंत वाटतात.

जीवनाकडे स्वागतपूर्ण स्वीकारवृत्तीनें पाहावयाची फडक्यांची दृष्टि कोणत्याहि अभिजात क्रीडाप्रिय माणसास साजेशी आहे. क्रिकेट, हॉकी, टेनिस वगैरे खेळ ते आवडीनें खेळतात असें मी कोठेंसें वाचलें. बॅड्मिंटनचा खेळ त्यांना आवडतो किंवा काय मला माहित नाहीं; परंतु फूटबॉल हा अत्र्यांच्या अगर खो खो हा माडखोलकरांच्या वृत्तीचें जितकें अचूक निदर्शन करील तितकेंच बॅड्मिंटन फडक्यांच्या वृत्तीचें करील असें मला वाटतें. नाजूक नखरेलपणा आणि जोमदार आवेश यांच्या मजेदार मिश्रणाचें सुसंस्कृत प्रदर्शन त्या खेळांत जसें होतें तसेंच तें प्रोफेसर फडके यांच्याहि वृत्तींत होतें. प्लेसिंग, नेट-प्लेसिंग आणि शॉटस् यांचा आकर्षक विलास बॅड्मिंटनप्रमाणें प्रो. फडक्यांच्या वाङ्मयांतहि आढळतो.

या क्रीडाप्रिय, आनंदी, रसिक आणि जीवनलोलुप वृत्तीमुळेंच फडके हे विद्वान् प्रोफेसर असूनहि त्यांनीं विद्वत्तेचें कधीं स्तोम माजविलें नाहीं, अगर तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असूनहि Philosophy is smoke हे प्रो. वाडेकरांना जरा अस्वस्थ करणारे उद्गार काढावयास ते कचरले नाहींत. विद्वत्तेच्या बेसुमार सोसानें मनुष्य बोजड बनतो, त्याची मनोज्ञता नष्ट होते, जीवनाच्या आनंदाचा आस्वाद घेण्याची त्याची शक्ति खलास होते, असें त्यांचें मत आहे; व म्हणूनच एका गुजगोष्टींत त्यांनीं अज्ञाची महति गाइली आहे. ज्ञानाचा पाठलाग करणाऱ्या पांडितांबद्दल ते म्हणतात, ‘ग्रहांचे व ताऱ्यांचें वेध घेण्यांत

त्याचें उभें आयुष्य खर्च होईल, पण शिकारीसाठीं रानांत जाऊन तळ दिल्यावर रात्रीं तंबूबाहेर उघड्यांत पथारीवर उताणें पडून आकाशांतील असंख्य तारकांचें वैभव पाहत, आणि भोंवतालच्या झाडींतून उठणाऱ्या रातकिड्यांच्या किरकिरीचें संगीत ऐकत हळु-हळू झोंपी जाण्यांत जें अवर्णनीय सौख्य आहे, त्याचा लाभ त्याला कधीं होणार नाहीं. '

प्रो. फडक्यांसारखा आधुनिक Philosophy is smoke असे जेव्हां उद्गार काढतो तेव्हां त्यांच्यामागें एक विशिष्ट मनोवृत्ति तर असतेच, पण एक विशिष्ट विचारसरणीहि असते. तत्त्वज्ञानाच्या मृगजळामागें लागल्यानें मनुष्यप्राण्याची जी फसगत झाली तिची त्या वेळीं त्याला जाणीव असते. तत्त्वज्ञानाचा उगम कां झाला ? विश्वाच्या अजस्र स्वरूपानें स्तिमित झालेल्या मनाला काव्य सुचलें व त्या स्वरूपानें भेदरलेल्या मनाला ईश्वराची कल्पना सुचली. याहून अधिक विचारसामर्थ्याच्या माणसांनीं विश्वाच्या स्वरूपाचा पूर्ण तलास लावण्यासाठीं तत्त्वज्ञानाचा खटाटोप आरंभिला. तत्त्वज्ञान हें जात्याच वावदूक असतें. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या वचनानें या वावदूकतेची तरफदारी करण्यांत आली. परंतु मस्तकें गरम होण्यापलीकडे व बुद्धि धुरकट होण्यापलीकडे या वावदूकतेचा अधिक कांहीं उपयोग झाला नाहीं. तत्त्वज्ञानाच्या खटाटोपामुळें विश्वाचें स्वरूप स्पष्ट होण्याऐवजीं तें अधिकच अस्पष्ट, अंधुक आणि धुकट झालें. या धुक्यांतून ध्येयें निर्माण झालीं आणि ध्येयांतून अंधश्रद्धेचा उगम झाला.

कोणताहि शास्त्रीय दृष्टीचा आधुनिक याविरुद्ध बंड करून उठेल, व तसे फडकेहि उठले आहेत. कॉलेजांत असतांना स्नेहलता-प्रकरणीं त्यांनीं हुंड्याविरुद्ध मोठीं ध्येयवादी भाषणें केलीं अगर गांधींच्या ध्येयवादी चळवळींत ते कांहीं काल चमकले, यामुळें फडक्यांच्या अभिजात आधुनिकतावादास बाध येत नाहीं.

कॉलेजांतला ध्येयवाद बहुतेक संसर्गजन्य असतो. गांधींच्या असहकारितेंत फडक्यांनीं उडी घेतली तो त्यांचा प्रतिगामी महाराष्ट्राविरुद्ध बारीकसा निषेध असावा. प्रचलित परिस्थितीबद्दल तीव्र असंतोष हा सर्व आधुनिकतावाद्यांचा एक ठराविक विशेष असतो, व या न्यायानेंच फडके राजकारणांत जातीनें पडले असावे. परंतु गांधींचें तत्त्वज्ञान हें प्रतिगामी समजल्या जाणाऱ्या 'महाराष्ट्रीय' विचारसरणीहूनहि अधिक प्रतिगामी, अधिक अंधश्रद्धानिष्ठ, अधिक अशास्त्रीय आणि अधिक भोळसट किंवा ढोंगी आहे अशी खात्री पटल्याबरोबर त्यांनीं त्याची रजा घेतली. ध्येयें हीं दिवास्वप्नेंच आहेत, निकोप प्रकृतीचीं कांहीं तीं लक्षणें नव्हत याची अंधुक ओळख तेव्हां त्यांना पटली असावी. निदान हा ध्येयवाद आपल्या जीवनोत्सुक वृत्तीला मानवणारा नाहीं याची त्यांना खात्री पटली असावी.

ध्येयवादी तत्त्वज्ञान आणि शास्त्रीय विज्ञान यांच्या द्वंद्वांत आधुनिकतावादी विज्ञानाची बाजू बेशक पकडतो, तशी प्रो. फडक्यांनींहि पकडली. आधुनिकतावाद्यांच्या सहजप्रवृत्तीप्रमाणें नवमानसशास्त्राकडे फडक्यांचें लक्ष सर्वांअगोदर गेलें. संततिनियमन आणि सुप्रजाजननशास्त्र यांच्या प्रतिपादनांत ते र. धों. कर्व्यांच्याहि अगोदर पडले असावेत. हॅवलॉक एलिस आणि फ्रॉइड यांच्या नवमानसशास्त्रानें त्यांना नवनीतिवादाचे धडे दिले. सनातनी समाजाच्या बुरसट समजुतींचीं कोळिष्टकें नवमानसशास्त्राच्या प्रकाशांत त्यांना सर्व कृमिकीटकांसह दिसलीं. प्रणयप्रधान कादंबऱ्या लिहिण्यापूर्वी त्यांनीं मानसशास्त्राचें अध्ययन केलें होतें हें नीट ध्यानांत घेतलें पाहिजे. तरुणांच्या प्रणयवृत्तीचीं चित्रें रंगविण्यांत आपण अवास्तव असें कांहींच करीत नाहीं अशी त्यांची अगोदरच खात्री झाली होती. किंबहुना तसें करणें हा बुरसट समाजाच्या बाजवी निषेधाचा तो त्यांना एक मार्ग वाटला.

राष्ट्रांतील नवनीतिवादाचे ते साहजिकच एक पुरस्कर्ते झाले, आणि 'कलेसाठीं कला' या वृत्तीनें लिहिलेल्या कादंबऱ्यांतून नवनीतीचा पुरेसा प्रचार होत नाहीं म्हणून कीं काय त्यांनीं त्यावर चढाईचे लेख लिहिण्यास आणि व्याख्यानें देण्यास सुरुवात केली.

लेखकाच्या मानसशास्त्राचाहि अभ्यास त्यांनीं केला असल्यानें नवनीतीप्रमाणेंच 'कलेसाठीं कला' या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनीं केला. वामनराव जोशींसारख्या तत्त्वज्ञान्यानेंच नव्हे तर खांडेकरांसारख्या कलावन्तानें या वादाविरुद्ध उठावें याचें कारण या वादामागें असलेली फडक्यांची निर्हेतुक कलासक्त आधुनिकता खांडेकरांपाशीं नाहीं हेंच होय. कलासक्त आधुनिकता हा फडक्यांचा अभिजात स्वभावगुण आहे. खांडेकरांप्रमाणें ही नाइलाजानें स्वीकारलेली दुबळी आधुनिकता नाहीं, अगर माडखोलकरांप्रमाणें ती ओढूनताणून आणलेलीहि नाहीं. वरेरकरांच्या आधुनिकतेप्रमाणें ती निवळ नावीन्याच्या लालसेनें आलेली नाहीं. ती त्यांची स्वतःची, साहजिक व सुसंस्कृत असल्यामुळें डी. एच्. लॉरेन्सच्या आधुनिकतेप्रमाणें तिला विकृत स्वरूप आलें नाहीं, तर 'ब्लूम्सबरी' लेखकांच्या आधुनिकतेप्रमाणें ती बुद्धिवादी, सौंदर्यासक्त आणि व्यक्तिवादीच राहिली. बुद्धिवादाच्या प्रभावामुळें त्यांनीं आपला 'कलेसाठीं कला' हा सिद्धान्त लवकरच व्यापक केला, पण सौंदर्यासक्त व्यक्तिवादित्वामुळें त्यांनीं त्याचा त्यागहि केला नाहीं. आज ते तेजस्वी, क्रांतिकारक वाङ्मयाची भाषा बोलतात; पण हें क्रांतिकारक वाङ्मय निर्माण करतांना कलेची दृष्टि सोडून चालणार नाहीं, असा इशारा देऊन ठेवण्यास ते चुकत नाहींत.

ते क्रांतिकारक किंबहुना समाजवादी वाङ्मयाची भाषा बोलूं लागले आहेत; त्यांच्या नव्या 'उन्माद' कादंबरींत कामगार-जीवनाचीं दृश्यें आढळतात; हें संक्रमण मनोरंजक आहे. फडक्यांच्या स्वभावसिद्ध व्यक्तिवादी आधुनिकतेस ही कलाटणी कां मिळत

असावी ? त्यांची व्यक्तिवादी आधुनिकता आणि समाजवाद यांच्यामध्यें साम्यापेक्षां विरोधच अधिक नाहीं काय ?

आपलें तत्त्वज्ञान बुद्धिवादी असल्याची नवलकथा कम्युनिस्ट नेहमीं सांगत असतात, पण त्यांचें सारें प्रतिपादन आणि वर्तणूक मार्क्स-लेनिन-स्टॅलिनच्या चरणीं सुपूर्त केलेल्या अंधश्रद्धेवर आधारलेली असते ही गोष्ट आतां चांगली चवाठ्यावर आलेली आहे. मनुष्याच्या व्यक्तित्वाचा स्वच्छंदी विकास व्हावा असें फडक्यांची आधुनिकता सांगते, पण समाजवादी तत्त्वज्ञानांत समूहासाठीं व्यक्तीनें आत्मसंतर्पण केलें पाहिजे असा अट्टाहासाचा पुरस्कार चालतो. कम्युनिस्टांच्या समाजवादांत यांत्रिक ओतीवपणा आहे, तर फडक्यांच्या आधुनिकतेचें स्वरूप कमालीचें संवेदक आणि लवचिक आहे. फडक्यांच्या आधुनिकतेंत सौंदर्यदेवतेची सांज-सकाळ पूजा चालते तर कम्युनिस्टांना सौंदर्यापेक्षां सामर्थ्याची महति अधिक वाटते.

मग हें संक्रमण कां घडत आहे ?

आपली अवघड केंविलवाणी समाजस्थितीच या संक्रमणाला जबाबदार आहे. फडक्यांच्या नाजूक, मनोज्ञ, ऐषआरामी, सौंदर्यशाली ललितलेखनाचें कोडकौतुक पुरविण्याचें सामर्थ्य आपल्या समाजांत नाहीं. तितकें स्वास्थ्य आणि सुबत्ता आपल्या समाजांत नाहीं. फडक्यांच्या कलेला अशी कांहीं कलाटणी न मिळाली तर ती कायमची बरबाद होईल.

आपल्या समाजांत हा अनुभव नवा नाहीं. अव्वल इंग्रजींत आपल्या पहिल्या सुशिक्षितांनीं मिल्ल-स्पेन्सरच्या उदात्त उदारमतवादांचा स्वीकार केला व या तत्त्वप्रणालीच्या चौथऱ्यावर प्रगतीचीं मंदिरें उभारण्याच्या प्रयत्नास ते लागले. त्यांच्या त्या अभिनंदनीय प्रयत्नांस कसलीं फळें आलीं ? त्यांचीं उदात्त तत्त्वें पचविण्याइतका आमच्या समाजाचा विकास झाला नसल्यामुळें हे प्रगतिप्रिय उदार-

मतवादी चक्क मवाळ बनले – व म्हणूनच मिल्ल-स्पेन्सरच्याच तत्त्वज्ञानांत न्हाऊन निघालेले टिळक उदारमतवाद्यांच्या विरोधकांत अग्रस्थानीं उभे राहिले. अशाच प्रकारचें संक्रमण आज फडक्यांच्या कलेंत होत आहे.

या संक्रमणाचें कम्युनिस्ट, मतलबासाठीं, कौतुक करतील हें मला माहीत आहे. पण हें संक्रमण खुद्द प्रो. फडके यांनीं अगर त्यांच्या चाहत्यांनीं गाफिल राहण्याइतकें निर्धास्त नाहीं, हें स्पष्टपणें सांगून टाकलें पाहिजे. राजकीय पुरस्कारामुळें फडक्यांच्या कलेची बेसुमार गळचेपी होत असल्याचें तापदायक दृश्य ' समरभूमीं 'त दिसलेंच. 'उन्माद'मध्यें या कलेला थोडेबहुत संजीवन मिळाल्याचें आढळलें तरीहि हें संक्रमण मोठेंसें स्वागतीय ठरेल असें मला वाटत नाहीं. फडक्यांची आधुनिकता पूर्णपणें लोकसत्तावादी कधींच नव्हती. कलासक्त माणसाची बौद्धिक दरकदारी (Intellectual Aristocracy) त्यांत भरपूर होती आणि आहे. समाजवादी संक्रमणांत या बौद्धिक दरकदारीस विकृत स्वरूप प्राप्त होऊं नये अशी माझी फारफार इच्छा आहे.

मे १९४०



# कॉम्रेड एम्. एन्. रॉय

"कम्युनिस्ट इन्टरनॅशनलचें ज्यांनीं खतपाणी घालून संवर्धन केलें" असें भाविकतेचें भडक वर्णन मानवेन्द्र रॉय यांच्या बाबतींत मला करतां येत नाहीं. कारण कम्युनिस्ट इन्टर-नॅशनल या संस्थेला कामगारांच्या क्रान्तिकारक चळवळींत जी प्रतिष्ठा प्राप्त झाली, तिला मुख्यतः लेनिन, ट्रॉट्स्की व झिनोव्हिफ् यांचे [ आणि जी बदनामी झाली, तिला स्टॅलिनचे ] प्रयत्नच कारण झाले, ही बाब मला माहीत आहे. पण रॉय यांचें अभिजात श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास कल्पनेच्या कुतुबमिनारावर चढण्याचें कांहींच कारण नाहीं. ते लेनिनचे एक विश्वासू सहकारी होते, एवढी एकच बाब त्यांचें निखालस श्रेष्ठत्व पटवून देण्यास मला पुरेशी वाटते. लेनिनची वैभवशाली वारसदारी उन्मादानें मिरवणारा आजच्या

रशियांतील आढ्यतेखोर सत्ताधारी स्टॅलिनरक्ष रॉय यांच्या कीर्तीला डाग लावण्याचा कितीहि प्रयत्न करो, हिंदी लोकांना रॉय ही एक असामान्य व्यक्ति वाटते; इतकेंच काय, पण फैजपूर काँग्रेसच्या स्वागतमंडळालाहि त्यांची दखल गांधी-नेहरूंच्या बरोबरीनें घेणें भाग पाडण्याइतकें त्यांचें व्यक्तित्व प्रभावशाली ठरलें. रॉय तुरुंगांतून सुटल्यापासून त्यांच्याबद्दल सर्वांनाच जी उत्सुकता वाटत आहे, किंवा अधिक बिनचूकपणें बोलावयाचें म्हणजे सरकारच्या व त्याच्या सांथीदारांच्या उरांत त्यांच्या येथील खुल्या अस्तित्वामुळें जी धडकी भरल्यासारखी दिसते, त्यावरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येईल. ता. २० नोव्हेंबर १९३६ रोजीं रॉय तुरुंगांतून सुटले तेव्हां " आतां वीस वर्षांनंतर मी कायदेशीर रीतीनें श्वासोच्छ्वास करण्यास मोकळा आहें " असे भेदक उद्गार त्यांनीं काढले होते. पण रॉय यांना इतर बंधमुक्त पुढाऱ्यांइतकेंहि सोडाच, पण गुन्हेगाराइतकेंहि लेखायला कांहीं पुणेंकर देशभक्त तयार नाहींत, हें त्यांनीं रॉय यांच्यावर अराजकतेचा शिक्कामोर्तब करून त्यांच्या भाषणासाठीं शिवाजीमंदिर द्यावयाचें नाकारलें, यावरून स्पष्ट झालेंच आहे.

१९२२ सालापासून ज्या माणसानें रशियासारख्या दूर देशांतून हिंदुस्थानांतील कम्युनिस्ट चळवळींचीं सूत्रें हलविलीं — किंबहुना ज्याच्या प्रयत्नांमुळेंच कम्युनिझमचें बीजारोपण हिंदुस्थानांत झालें व त्याला कानपूर व मीरत कटांच्या खटल्यांचे भोपळेहि लागले— नव्हे, ज्यानें रशियांतून खुद्द महात्मा गांधीजींशीं लेखणीचे चार चमकदार डाव केले, त्याच्याबद्दल औत्सुक्य व कुतूहल हिंदी जनतेनें बाळगणें अगदीं स्वाभाविक आहे. खुद्द जवाहरलाल नेहरू यांना रॉय यांच्याबद्दल किती कमालीचा आदर वाटतो व किती आस्था-पूर्वक प्रेम वाटतें हें त्यांनीं आत्मवृत्तांत खुल्या दिलानें सांगून टाक-लेंच आहे. नेहरूंच्या स्निग्धतेचा हा धागा थेट रॉय यांच्या हृदयाला जोडलेला दिसतो. राष्ट्रपतींबद्दल रॉयना केवळ तात्त्विक सहानुभूति

नाहीं, तिच्यांत अंत:करणाचा ओलावा आहे. ' Oh Jawahar, you are my weakness ! ' हे त्यांचे उद्गार या आर्द्रतेनेंच ओथंबलेले नाहींत काय ?

एक साधासुधा, वड मॅट्रिकहि न झालेला हिंदी इसम दूर देशीं जातो व क्रांतिकारक म्हणून त्रिखंड कीर्ति मिळवून बसतो ही एवढी एकच बाब रॉय यांच्याबद्दल कोणाहि सहृदय हिंदवासीयास चटका लावण्यास पुरेशी ठरेल. रॉय यांची सबंध जीवनकथाच्च विलक्षण रोमांचकारी आहे व तिच्यावर जी गूढतेची दाट छाया पसरलेली दिसते तिच्यामुळें तर तिला एक आकर्षक सुरम्यताच प्राप्त झाली आहे. सुमारें ४५ वर्षांपूर्वी रॉय यांचा बंगालमधील कोण-त्याशा खेड्यांत [ खुद्द रॉयना त्याच्या नांवाचें स्मरण आहे काय न कळे ! ] जन्म झाला. त्यांचें मूळचें नांव नरेंद्र भट्टाचार्य, तें त्यांनीं बदलून सध्यांचें नांव घेतलें. हें अर्थात् बोल्शेव्हिक परंपरेस धरूनच झालें. कारण लेनिन, ट्रॉट्स्की प्रभृति बोल्शेव्हिक पुढाऱ्यांनीं आपापलीं नांवें वेशभूषेप्रमाणेंच वेळोवेळीं सोईसाठीं बदललीं होतीं. अगदीं कोवळ्या वयांतच ते दहशतवादी क्रांतिकारकांच्या गटांत शिरले व साहजिकपणेंच ब्रिटिश पोलिसांचा ससेमिरा त्यांच्या मागें लागला. तो चुकविण्यासाठीं त्यांनीं शेवटीं देशत्याग केला. सी. आय्. डी.च्या नजरेंतून सुटून अमेरिकेस त्यांनीं प्रयाण कसें केलें याची हकीकत अद्याप गुलदस्तांतच आहे. या बाबतींत रॉय स्वतः तोंड उघडीपर्यंत ती, फ्री स्टेट सरकारच्या कैदेंतून सुटून डी. व्हॅलेरा अमेरिकेस कसे फरारी झाले, या हकीकतीइतकीच अज्ञात व अद्भुतरम्य राहण्याचा संभव दिसतो. या बाबतींत एक दंतकथा मीं ऐकली, ती खोटी असण्याचा संभव आहे. पण, खरीखोटी कशीहि असली तरी, ती रॉय यांच्या कल्पक, बुद्धिमान् डोक्याचें व धाडशी स्वभावाचें अचूक निदर्शन करीत असल्यामुळें येथें सांगून टाकण्यास हरकत नाहीं. पोलिसांच्या जाचानें देशोधडीस लागलेला हा

अठरा-एकोणीस वर्षांचा कोंवळा तरुण जावासुमात्राच्या प्रदेशांत भटकत असतां एका बंदरांत त्याला एक अमेरिकन बोट कोळसा भरीत असलेली दिसली. रॉयनीं सरळ त्या बोटींत प्रवेश मिळविला व तडक कॅप्टनला गांठून आपली सर्व हकीकत निवेदन केली व आपणांस आश्रय देण्यास विनविलें. कॅप्टनलाहि काळीज होतें. त्यानें रॉयना कोळशाच्या कोठारांत लपविलें व बोटीची झडती घेण्यास आलेल्या ब्रिटिश पोलिसांच्या डोळ्यांत चारकोलची पावडर घातली !

अशा रीतीनें रॉय अमेरिकेला गेले व तेथें त्यांनीं परागंदा हिंदी व युरोपिअन क्रांतिकारकांत मिसळून निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या विचारप्रणालींचा अभ्यास केला व दहशतवादाचा त्याग करून मार्क्सप्रणीत 'शास्त्रीय' साम्यवादाचा स्वीकार केला. हें विचार-संक्रमण चालू असतांनाच मेक्सिकोंत राष्ट्रीय क्रांतीचें वारें पसरलें. रॉयनीं या क्रांतीच्या झंझावातांत प्रवेश केला व थोडयाच अवधींत ते तिच्या आघाडीवर चमकले. यामुळें त्यांना एकदम आंतरराष्ट्रीय स्वरूपाची कीर्ति प्राप्त झाली व त्यांचें नांव लेनिनच्या कानांवर गेलें. लेनिन या सुमारास आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीच्या संघटनेसाठीं थर्ड इन्टरनॅशनल या संस्थेची प्रस्थापना करून तिला भक्कम व प्रभावी स्वरूप देण्याच्या प्रयत्नांत होता. भांडवली राष्ट्रां-तील साम्यवाद व वसाहतींतील साम्राज्यविरोध यांच्या समन्वया-साठीं आतुर झालेल्या लेनिननें या हिंदी स्वातंत्र्यवीरास सदरहू संस्थेंत ओढण्याचें ठरविलें व त्यासाठीं बॉरोडिनला रॉयकडे पाठविलें. रॉयना लेनिनचें निमंत्रण हा बहुमोल मान वाटला असल्यास नवल काय ?

ज्या बॉरोडिनच्या मध्यस्थीनें रॉय कम्युनिस्ट इन्टरनॅशनलमध्यें आले त्या बॉरोडिनशीं मतभेद झाल्यामुळेंच रॉय यांचें या संस्थें-तील आसन डळमळूं लागलें, हा दैवदुर्विपाक नाहीं तर काय ?

१९२७ सालीं चीनमध्यें क्रांति झाली, तेव्हां तेथील कम्युनिस्ट पार्टीचें कामकाज बॉरोडिनच्या देखरेखीखालीं अव्यवस्थितपणें चाललें होतें. त्याला व्यवस्था आणण्यासाठीं रॉयना चीनला पाठवण्यांत आलें. पण तेथें त्यांचें तेथील कम्युनिस्टांशीं मतैक्य होईना व म्हणून अपयशाचें मडकें घेऊनच त्यांना परतावें लागलें. तेव्हां-पासून त्यांचा इन्टरनॅशनलच्या अधिकारी व्यक्तींबरोबर वारंवार खटका उडूं लागला. याचें पर्यवसान स्टॅलिनच्या करड्या कारभारा-खालीं अर्थात् हृद्पारींत झालें.

स्टॅलिनच्या आडमुठ्या [ कीं अधिकारलोलुप ? ] स्वभावामुळें रॉयच काय, पण ट्रॉट्स्कीप्रभृति लेनिनच्या बहुतेक सर्व सहकाऱ्यांना सुद्धां रशियाबाहेर पडावें लागलें. अलीकडे तर तो त्यांचें चक्क 'शिरकाण'च करीत आहे. तरी पण स्टॅलिनबद्दल द्वेषाची भावना रॉय यांच्या अंतःकरणांत बिलकुल नाहीं. रॉय तुरुंगां-तून सुटल्यावर लखनौला गेले. तेथें त्यांना कांहीं साम्य-वादी विद्यार्थी भेटले. ते ट्रॉट्स्किस्ट होते व आतां रॉयच्या तोंडून स्टॅलिनला कांहीं खरपूस शिव्या ऐकायला मिळतील अशी वाजवी व गोड अपेक्षा त्यांची होती. पण रॉयनीं स्टॅलिनवर स्तुतिसुमनेंच वाहायला सुरुवात केली ! सच्चा क्रांतिकारक प्रति-पक्षाला ज्याप्रमाणें कठोरपणानें वागवावयास तयार असतो त्याच-प्रमाणें त्याच्याकडून तितक्याच कठोरपणानें वागवून घेण्यासहि तयार असतो, याचें हें एक उदाहरण आहे. त्या मानानें ट्रॉटस्की-विषयींची त्यांची वागणूक माझ्या अनुभवास आली ती थोडी अन्यायाची होती. अमेरिकन तत्त्ववेत्ता सिडने हूक, त्यांचे कॅल्व्हर्टन वगैरे सहकारी यांच्याविषयीं आमचें बोलणें चालू होतें. हूकचें नांव मी घेतांच रॉय उद्गारले, 'Oh, Hook is no good; he is degenerating. He is becoming a Trotskyite.' ट्रॉट्स्कीचें अनुयायित्व पत्करणें हा गुन्हा आहे, बुद्धि मंदावल्याचें

तें लक्षण आहे, असें रॉय यांचें मत असावेंसें दिसलें ! पण ते कॅल्व्हर्टन यांची बेसुमार स्तुति करीत होते. ही अर्थात् विसंगति होती, व ती मीं त्यांच्या नजरेसहि आणली. ' जर हूकना तुम्ही ट्रॉट्स्काइट म्हणून झिडकारतां तर हूक यांचीं मतें आपल्या मासिकांत उत्साहानें छापणारे व कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांवर हूक-सारखींच मतें व्यक्त करणारे कॅल्व्हर्टन यांची तुम्ही इतकी स्तुति कां करतां ? ' कॅल्व्हर्टन ट्रॉट्स्कीचे अनुयायी होतील, याची त्यांना कल्पनाहि करवेना, इतकी त्यांची कॅल्व्हर्टन यांच्यावर भक्ति दिसली ! शेवटीं कॅल्व्हर्टन यांच्या ट्रॉट्स्कीप्रेमाचा एक बिनतोड पुरावा त्यांच्यापुढें मीं मांडला; तेव्हां ते म्हणाले, ' These writers, these literary persons, are very good as writers and artists. There they do excellent work. But unfortunately they don't stop there; they begin to. meddle with politics and end by being Trotskyites!' ट्रॉट्स्कीविषयीं म्हणजे त्याच्या तत्त्वनिष्ठेबद्दल व बुद्धिमत्तेविषयीं रॉयना अतिशय आदर आहे, असें त्यांचे अनुयायी सांगतात; पण मला तरी त्यांच्या या बोलण्यांत ट्रॉट्स्कीबद्दल सहानुभूतिशून्यता व एक घट्ट अढी असल्याचेंच दिसून आलें. लेनिन ?—लेनिनबद्दल त्यांना अर्थात् कमालीची पूज्यबुद्धि वाटते व ते ती "Trotsky plus Stalin would just make a Lenin" या उद्गारांनीं वेळोवेळीं व्यक्तहि करतात.

मात्र त्यांच्या ट्रॉट्स्कीविषयींच्या शुष्क वृत्तीचें मला बिलकुल आश्चर्य वाटलें नाहीं. ट्रॉट्स्कीविषयींचा त्यांचा अनादर त्यांनीं अधिक तीव्रपणें व्यक्त केला नाहीं, हेंच ट्रॉट्स्कीचें नशीब ! प्रसंगीं ते किती कडवट व टाकून बोलतात याची साक्ष मला याच बैठकींत मिळाली. एका, थोडीबहुत आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविलेल्या, कम्युनिस्ट क्रांतिकारकाचें नांव निघालें, तेव्हां ते तत्काळ उद्गारले, ' Oh that wriggling vermin ! He – he is the

most immoral, unscrupulous scoundrel!' युरोप-अमेरिकेंत भटकणाऱ्या हिंदी लोकांबद्दलहि त्यांचा आदर बेताचाच दिसला. 'You don't know, what asses these people make of themselves.' या लोकांच्या गाढवपणाचीं जीं कांहीं उदाहरणें त्यांनीं दिलीं तीं तर कमालीचीं मनोरंजक होतीं.

पण रशियन सरकारनें आपल्याला अन्यायानें वागविलें, ही गोष्ट त्यांच्या मनाला लागून राहिली आहे, यांत शंकाच नाहीं. आणि कां नाहीं राहणार? स्टॅलिनचा मामलाच असा आहे कीं, शत्रूच्या नुसत्या हद्दपारीनें त्याचा अंतरात्मा कधींच शांत होत नाहीं. म्हणून रशियाबाहेरहि त्याचा आपल्या हस्तकांकडून मनसोक्त छळ करून घ्यावयाचे त्याचे प्रयत्न सदैव चालू असतात. रॉय जर्मनींत असतांना अशाच एका हस्तकाकडून त्यांना विष घालण्याचा प्रयत्न झाला, असें म्हणतात. त्यांच्याविषयीं हव्या त्या कंड्या पिकवून, त्यांना lap-dog of the bourgeoisie अशीं शेलकीं विशेषणें लावून, त्यांची आंतरराष्ट्रीय चळवळींत बदनामी करण्याचे पद्धतशीर प्रयत्न तर अद्यापहि चालू आहेत!

असो. अशा प्रकारें दुखावलेल्या अंतःकरणानें जर्मनींत संशयित वातावरणांत काल कंठीत असतां हिंदुस्थानांत कायदेभंगाची मोहीम सुरू झाली व तिचीं अशीं कांहीं भडक वर्णनें वृत्तपत्रांच्या द्वारें जर्मनींत गेलीं कीं, हिंदुस्थानांत क्रांति म्हणतात तीच मूर्तिमंत वावरते आहे असें रॉय यांना वाटलें व अशा सुमारास मातृभूमीपासून दूर राहणें हें क्रांतिद्रोही वाटल्यामुळें ते गुप्तपणें हिंदुस्थानांत परत आले.

रॉय परत आले ते डॉ. महमूद म्हणून. आज त्यांच्या अगदीं छायेंत वावरणारे त्यांचे कांहीं अनुयायी त्या वेळीं त्यांच्याकडे एक जर्मन Ph. D. घेऊन परतलेला बंगाली मुसलमान याच दृष्टीनें पाहत. रॉयहि आपली बतावणी बेमालूम पार पाडीत! रॉयसारख्या

तल्लख व कर्तबगार क्रांतिकारकाची बुद्धिमत्ता, ते तन्मयतेनें वादविवाद करूं लागले तर, फार काळ दडून राहणें अशक्य होतें. रॉय हें जाणून होते व म्हणून करावयाचा तो वादविवाद जपून व माथें शाबूत राखून, असा त्यांचा परिपाठ असे. माझा एक डॉक्टर [ Ph. D. ] मित्र एका गृहस्थाच्या आग्रहावरून रॉयना भेटायला गेला. पण रॉय त्याच्याबरोबर खुल्या दिलानें बोलत ना; इतकेंच नव्हे, तर कांहीं राजकीय प्रश्नांचीं उडवाउडवीचीं व गैरमाहितीचीं उत्तरें त्यांनीं मुद्दामच दिलीं. माझा हा मित्र अर्थातच भडकला व 'What an idiot you have brought me to' असा संतापहि त्यानें सरळ व्यक्त केला. रॉयना वाटलें, याला थोडी चुणूक दाखवावी. त्यांनीं त्याला तत्त्वज्ञानाच्या आखाड्यांत ओढलें व कांहीं असे बौद्धिक पेंच टाकले कीं, त्याची बुद्धि गुंगच झाली ! हें प्रकरण कांहीं निराळेंच दिसतें— माझ्या मित्राची खात्री झाली व तेव्हांपासून तो रॉयचा इतका परम भक्त बनला आहे कीं, आज आयुष्यांत त्याला रमविणारें किंवा जगण्यांत कांहीं राम आहे असें वाटायला लावणारें जवळजवळ कांहींच उरलें नसतां तो रॉयच्या करुणार्द्र नजरेला आपली विषण्ण नजर भिडवून खुशाल सांगतो, 'Roy, you are my last illusion !'

डॉ. महमूद या नात्यानें त्यांनीं दाखविलेलें धाडस आणि सावधपणा यांचें मिश्रण अपूर्वच होतें. अझाद मैदानावर तेव्हां प्रचंड सभा भरत. त्या वेळीं रॉय त्या झुंडींत सामील होत, इतकेंच नव्हे, तर अगदीं व्यासपीठानजीक जाऊन देशभक्त पुढाऱ्यांचीं भाषणें लक्षपूर्वक ऐकत – पण एकाहि सी. आय्. डी. पोलिसाला त्यांना ओळखतां आलें नाहीं ! अत्यंत क्षोभक परिस्थितींतहि ते मनाची शांति कशी कायम राखीत याचें एक उदाहरण मीं स्वतः पाहिलें आहे. कांहीं कॉंग्रेस व कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची खासगी सभा

रॉय यांच्या कार्यक्रमावर चर्चा करण्यासाठीं भरली होती, त्याला हे डॉ. महमूद त्रयस्थ म्हणून हजर होते. तेथील पावकच्च्या-अर्वकच्च्या बालकम्युनिस्टांनीं [ यांत मीहि होतों ] रॉयच्या तर्क-पद्धतीची जी बदनामी चालविली ती ऐकून कोणीहि सुबुद्ध व्यक्तीचें रक्त गरम झालें असतें. पण रॉय थंड होते. शेवटीं अध्यक्ष डॉ. चिटणीस यांनीं महमूदना, म्हणजे खुद्द रॉयनाच, या त्यांच्याच कार्यक्रमाबद्दल मत विचारलें आणि तें त्यांनीं अगदीं त्रयस्थाच्या बेफिकीरपणानें, शांतपणें सांगितलें !

या वेळीं मला त्यांच्या वादविवादपद्धतीचा फारसा अनुभव आला नव्हता, तो कांहीं दिवसांपूर्वी दादर येथें एका मित्राचे घरीं आला. तेथें कांहीं कॉंग्रेसकर्ते वादविवादास जमले होते; पण त्यांना मागें सारून, लोकशाही स्वराज्यपक्षाच्या राजकीय पेढीवर बुद्धि गहाण टाकलेला एक मुनिम पुढें सरसावला व त्यानें रॉयशीं दीड तास हुज्जत घातली. हिंदुस्थानच्या मानानें अमेरिकेचें क्षेत्रफळ किती लहान-मोठें आहे याची आंकडेवारी देऊन रॉयवर वजन मारण्याची या गृहस्थाची वादपद्धति संतापजनक नसती तर मोठी विनोदी ठरती ! पण या गृहस्थाशीं त्याचा प्रत्येक मुद्दान् मुद्दा [ किंवा त्याचा अभाव] लढवून रॉयनीं त्याला अक्षरशः गप्प बसविलें. तो प्रसंग पाहण्यासारखा होता. शांत राहून, अपमान पोटांत घालून, अहं-भाव बाजूस ठेवून, विरोधकांच्या पोटांत शिरण्याची कुशल क्रांति-कारकाची कला रॉय यांजपाशीं आहे.

इतकेंच काय, पण त्यांचें खासगी वागणें इतकें मृदु व साधें असतें कीं, आपण एका थोर जगप्रसिद्ध क्रांतिकारकाशीं बोलत आहोंत याचा सारखा विसर पडतो व म्हणून या गोष्टीची जाणीव कायम राखण्यासाठीं मेंदूला सारखें टोंचावें लागतें. त्यांची बैठकीं-तील संभाषणांत भाग घेण्याची पद्धति मोठी नमुनेदार असते. भोंवतालीं काव्यशास्त्रविनोदाचे फवारे उडत असले तरी हे बरेचसे

अन्तर्मुख दिसतात. पण मध्येंच आपला एखादा चुटका सोडून आपला रसिकपणाहि व्यक्त करतात ! रॉय एकंदरींत गंभीर मनोवृत्तीचेच आहेत व ही त्यांची वृत्ति ते बोलूं लागले कीं चांगलीच जाणवते.

रॉय हे कांहीं मोठेसे वक्ते नाहींत. ट्रॉटस्की, जॉफ्, लेनिन यांच्या बरोबरीनें काम केलेला हा गृहस्थ चांगला वक्ता असेल या अपेक्षेनें त्यांचें भाषण ऐकण्यास जाणारे लोक निराश होऊनच परततात. पुरी सहा फूट उंच लांबट अंगयष्टि, बांकदार नाक, भेदक नजर, किंचित् अरुंद कपाळ व त्यावर नम्रतेनें गर्दी करून राहिलेले केस, काळीसांवळी सडक इनवटीमुळें नजरेंत भरणारा चेहरा — ही मूर्ति कोणत्याहि व्यासपीठावर व्यक्तिवैशिष्ट्यानें उठून दिसेल, पण रॉय यांचें वक्तृत्व अस्खलित नाहीं. ते अडतात, अडखळतात, योग्य शब्द सांपडावा म्हणून च-च-च करतात ! मात्र, रॉय यांची कीर्ति आहे ती ते उत्तम वक्ते म्हणून नव्हे, तर चतुर कार्यकर्ते म्हणून. त्यांचें संघटनाचातुर्य आश्चर्यकारक आहे व स्टॅलिनच्या याच गुणामुळें तो त्यांना आवडत असावा ! पण विद्वत्तेच्या नांवानें स्टॅलिन, मार्क्स-लेनिन-एंगल्सच्या पुस्तकांपलीकडे गेलेला नाहीं. यांच्या ग्रंथांतील उतारे व त्यांचें भाषांतर यांनींच स्टॅलिनचीं तीं जगप्रसिद्ध " क्लासिक्स " भरलेलीं आहेत. रॉयचें तसें नाहीं. त्यांच्या बुद्धिमत्तेचें तेज अगदीं लहान वयांतहि दिसून येई. आज त्यांचे ग्रंथ तर जगप्रसिद्धच आहेत. त्यांपैकीं 'India in Transition' आणि 'The Revolution and Counter-revolution in China' हीं पुस्तकें विशेष उल्लेखितां येतील. तुरुंगांत असतांना त्यांनीं ३००० छापील पृष्ठें भरतील एवढा मजकूर लिहून काढला आहे. त्यांत 'दि स्पिरिच्युअॅलिस्ट वेस्ट', 'दि ऑटोबायॉग्राफी ऑफ ए कॅट', 'दि फिलॉसॉफि ऑफ फासिझम्', 'दि नॅशनल रेनसन्स ऑफ इंडिया' इत्यादि पुस्तकें आहेत.

नुकताच त्यांनीं ऑइन्स्टाइनच्या सापेक्षतावादावर एक निबंध लिहून सर सुलेमान यांच्या ऑइन्स्टाइनवरील टीकेला त्यांत खरमरीत उत्तर दिलें आहे. या निबंधांत जडवादाची [ यालाच रॉय Physical Realism असें म्हणतात ] तरफदारी केली असून भाववाद्यांवर चांगले कोरडे ओढले असल्यामुळें कांहीं निःस्पृह म्हणून गाजलेल्या संपादकांनीं तो प्रथम स्वीकारूनहि नंतर कांहीं मामुली सबबीवर परत केला, असें समजतें !

रॉय यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टि मार्क्सवादी आहे. पण त्यांचा मार्क्सवाद दगडी सांच्याचा नाहीं. तें एक सदैव विकास पावणारें तत्त्वज्ञान आहे, असें त्यांनीं एका लेखांत स्पष्टच सांगून टाकलें आहे. तात्त्विक दृष्टीचा हा लवचिकपणा त्यांच्या आजच्या राजकीय धोरणांतहि व्यक्त होतो. आपल्या सावध आणि लवचिक धोरणामुळेंच त्यांनीं, The Man of Mystery असें आपलें वर्णन अँग्लो-इंडियन पत्रांना करायला लावलें.

* * *

१९३७ च्या जानेवारींत वरील लेख लिहिल्यानंतर परवां, सुमारें चार वर्षांनंतर, त्यांना पाहण्याचा योग, त्यांच्या एका व्याख्यानाच्या निमित्तानें आला. या चार वर्षांत शरिरानें ते जितके भरले आहेत तितकेच राजकीय लोकप्रियतेच्या दृष्टीनें ते ओसरले आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. याची कारणमीमांसा रॉयच्या त्या व्याख्यानांतच मला मिळाली. व्याख्यानाचा विषय ‘ वैचारिक क्रांति ’ हा होता. ‘ हिंदुस्थानांत प्रथम वैचारिक क्रांति झाल्याखेरीज सामाजिक व राजकीय क्रांति होणें शक्य नाहीं’ असें आपलें स्पष्ट मत त्यांनीं निःसंदेह रीतीनें बोलून दाखविलें. हें त्यांचें तात्त्विक मत मार्क्सवादाशीं जितकें सुसंगत अगर विसंगत आहे तितकेंच त्यांचें आजचें राजकरण, आंतरराष्ट्रीय मार्क्सवादी राजकारणाशीं सुसंगत अगर विसंगत आहे.

तें कांहींहि असलें, तरी हिंदुस्थानांत, ते म्हणतात तशी वैचारिक क्रांति घडवून आणण्यास तेच विद्यमान विचारवंतांत विशेष लायक आहेत एवढें निश्चित. हिंदुस्थानचे ते व्होल्टेर होतील कीं दिदेरो होतील हा वाद अनैतिहासिक असल्यानें मी त्याची चर्चा येथें करीत नाहीं. परंतु अशा वैचारिक क्रांतीचें नेतृत्व स्वीकारण्याइतकी भव्य आणि बेडर बुद्धिमत्ता त्यांजपाशीं खास आहे. मला वाटतें, या त्यांच्या बुद्धिवैभवामुळेंच व्यापक लोकप्रियतेचें वैभव त्यांना फारसें कधीं लाभलें नाहीं व लाभण्याचा फारसा संभव नाहीं. बहुजनसमाजाला विशाल आणि नेत्रदीपक बुद्धिमत्तेच्या माणसाबद्दल थोडीशी भीतिच वाटते, असें जें बर्नार्ड शॉनीं कोठेंसें म्हटलें आहे तें अगदीं बरोबर आहे. 'The common mass hates intelligence.' अफाट बुद्धिमत्तेच्या माणसाचे विचार साहजिकच बहुजनसमाजाच्या आकलनापलीकडे असतात. या विचारांनीं बहुजनसमाजाचे डोळे दिपतील, बुद्धि स्तिमित होईल व म्हणून त्याला अशा माणसाबद्दल एक वेळ आदर देखील वाटेल, परंतु प्रेम अगर विश्वास मात्र कधींहि वाटणार नाहीं. रशियांत ट्रॉट्स्कीवर स्टॅलिननें जो निर्विवाद विजय मिळविला त्याचें स्टॅलिनची माफक बुद्धिमत्ता हें एक महत्त्वाचें कारण असावें असें मला वाटतें. जर्मनींत मोठमोठ्या बुद्धिवान् व्यक्तींनीं हिटलरपुढें हात टेकले याचेंहि एक कारण हेंच दिसतें. हिंदुस्थानांत गांधींच्या अचाट लोकप्रियतेचें एक कारण, ते आपल्या बुद्धिमत्तेचें प्रदर्शन करीत नाहींत हेंच आहे. गांधींशीं या बाबतींत स्पर्धा करणें रॉय यांच्या शक्तीबाहेरचें आहे!

रॉय यांच्या गूढ जीवनामुळें त्यांच्या नांवाला एक आकर्षक सुरम्यता प्राप्त झाली असली तरी त्याचमुळें त्यांच्याबद्दल बहुजनसमाजाला एक गूढ असा अविश्वास वाटतो. रॉय यांच्या क्रांतिकारक कर्तृत्वाबद्दल जशा अनेक रोमांचकारी कथा प्रचलित आहेत तशीच त्यांच्याबद्दल बरीच किंवदन्तीहि प्रसृत आहे. याच्या उलट

गांधींचें पाहा. त्यांचें सारें आयुष्य हा एक बराचसा उघडा ग्रंथ आहे. कोणालाहि त्याचीं पानें चाळून स्वतःची खात्री करून घेतां येईल. उलट पक्षीं रॉय यांचा जीवनेतिहास हें एक बंद कपाट झालें आहे, व या कपाटाच्या किल्ल्या आपल्यापाशींच आहेत अशी शेखी मिरविण्यांतच रॉय यांचे कांहीं शिष्य दंग असतात. स्वतः रॉय जेव्हां हें कपाट उघडून आंतील सर्व बऱ्यावाईट वस्तूंचें दर्शन लोकांना घडवतील तेव्हांच त्यांना रॉयबद्दल अधिक विश्वास वाटूं लागेल, असें मला वाटतें. हिंदी लोकांच्या वैचारिक क्रांतीसाठीं रॉय, From Savagery to Civilization, Heresies of the Twentieth Century, Materialism, Memoirs of a Cat यांसारखीं विद्वत्तापूर्ण पुस्तकें जशीं भराभर प्रसिद्ध करीत आहेत तसेंच लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठीं त्यांनीं आपलें एक खुलें आणि खुलासेवार आत्मचरित्र लिहावें असें मला राहून राहून वाटत असतें. रॉयचें आत्मचरित्र म्हणजे त्यांच्या लोकप्रिय-तेचीं कवाडें उघडण्याचा ‘ तीलामंत्र ’ आहे असें मात्र मला मुळींच म्हणावयाचें नाहीं !

मार्च १९४१



# विभावरी शिरूरकर

"आमच्याकडे या ना एकदां गप्पा मारायला."

त्या विदुषीचे हे शब्द ऐकून मी एकदम चमकलोंच. तिच्याकडून या निमंत्रणाची मीं कधीं अपेक्षाच केली नव्हती—करणेंच शक्य नव्हतें. एक पुरुषद्वेष्टी बाई म्हणून ती प्रसिद्ध होती. 'स्त्री ही पुरुषाच्या मार्गातली धोंड आहे का ?' या प्रश्नावर एकदां मोठा वाद करून स्त्री ही पुरुषाच्या मार्गातली धोंड नाहींच, पण पुरुष मात्र स्त्रीच्या मार्गातला एक मोठा थोरला दगड आहे असा निर्णय तिनें दिला होता ! तेव्हां माझ्याकडे ती, हा सबंधच्या सबंध दगड नव्हे पण दगडाचा एक तुकडा या दृष्टीनें पाहत असावी असेंच धरून मी चाललों होतों. एका दगडाच्या तुकड्याशीं गप्पा मारण्याची इच्छा या विदुषीनें व्यक्त करावी याचें मला मोठें नवल वाटलें !

तरी पण त्याच क्षणीं मीं तें निमंत्रण स्वीकारलें. पुरुषद्वेष्ट्या स्त्रियांना भेटण्याची मला फार हौस आहे. अशा भेटींत स्त्रीस्वभावाचे कांहीं अज्ञात नमुने पाहावयास सांपडतात. शिवाय, पुष्कळशा स्त्रियांचा पुरुषद्वेष, पुरुषांचा सहवास फारसा न लाभल्यानें निर्माण होतो हें माहीत असल्यामुळें, पुरुषद्वेष्ट्या म्हणून गाजलेल्या स्त्रियांना भेटून त्यांचा पुरुषद्वेष कमी करण्याची व अशा प्रकारें 'स्वजातीयां'-विषयींचें आपलें कर्तव्य थोडेंबहुत पार पाडण्याची संधि मी सहसा वांया दवडीत नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी तिच्याकडे गेलों. माझें ज्या पद्धतीनें तिनें स्वागत केलें तिला मात्र माझी तयारी नव्हती. त्या स्वागतांत अगत्य ओतप्रोत भरलेलें होतें. माझ्या समोरच्या खुर्चीवर डाव्या मांडीवर उजवा पाय ठेवून पुरुषाप्रमाणें ती बसली खरी, पण तिच्या एकंदर हावभावांत स्त्रीसहज शालीनता होती आणि आवाजांत अभिजात मोकळेपणा होता. तिचे उच्चार अस्पष्ट असले तरी तिच्या आवाजांतील आर्ततेमुळें एकंदर संभाषण मला मोठें आकर्षक वाटलें. बोलतां बोलतां ती हंसली म्हणजे तिच्या कुंदकळ्यांसारख्या दांतांची शुभ्र शोभा तिच्या चेहऱ्यावर पसरे व कपाळावर लहरींचें विणकाम होई. पुरुषद्वेष्ट्या स्त्रिया अशा वागत नाहींत, अशी तीव्र जाणीव मला होऊं लागली.

आणि बोलतां बोलतां स्त्रियांबद्दल जे उद्गार तिनें काढले त्यांनीं तर मला सौम्यसा धक्काच बसला. ' नवऱ्यानें आपल्यापेक्षां वरचढ असावें, आपल्यावर वर्चस्व गाजवावें अशीच प्रत्येक स्त्रीची इच्छा असते— तेंच तिला आवडतें' —पुरुषद्वेष्टी स्त्री कधीं तरी असे उद्गार काढील का, हा विचार माझ्या मनांत तरळूं लागला. आणखी एका विचारानें माझें मन द्विधा होऊं लागलें. हें किंवा असेंच एखादें वाक्य आपण कोठेंसें वाचलें आहे, अशी अंधुक स्मृति मला होऊं लागली. माझें संभाषणाकडे दुर्लक्ष होऊं लागलें.

कसा न कळे, पण आमच्या संभाषणाचा ओघ राजकारणाकडे वळला. माझा एका पुरोगामी पत्राशीं संबंध होता, त्या पत्राबद्दल स्तुतिपर उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडूं लागले. हळूहळू कॉंग्रेसच्या प्रतिगामी धोरणाबद्दल फार त्वेषानें व समाजवादी आंदोलनाबद्दल फार आत्मीयतेनें ती बोलूं लागली. ही बाई इतकी समाजवादी असेल अशी कल्पना मला नव्हती. माझें चित्त पुन्हां द्विधा होऊं लागलें. तिच्या तोंडून बाहेर पडणारीं वाक्यें वाक्यें कोठेंतरी वाचल्यासारखें वाटूं लागलें. शेवटीं एका वाक्यानें खात्रीच झाली.

'काय करूं हो' ती म्हणाली, 'केव्हां केव्हां वाटतं कीं सारं सोडावं अन् कामगार-चळवळींत शिरावं. पण तें जीवन स्वीकारण्याचं धैर्य होत नाहीं मला. कम्युनिस्ट लोक आपल्यावर भित्रेपणाचा आरोप करतात तो कांहीं खोटा नाहीं.'

'भित्रेपणाचा प्रश्न नाहीं हा—मनोवृत्तींतला फरक आहे तो.' असें कांहीं तरी समाधान तिचें त्यावर मीं केलें. पण खरें म्हणजे माझें तिकडे नीटसें लक्ष नव्हतें. हें वाक्य कोणत्या पुस्तकांत आपण वाचलें तें आठवण्याचा प्रयत्न करीत होतों मी.

* * *

तिच्याकडून परत येतांना स्मृतिविस्मृतींचा तापदायक खेळ माझ्या मनांत चालू होता. मेंदूला बराचसा त्रास झाल्यावर एका पुस्तकाचें नांव माझ्या नजरेसमोर उभें राहिलें. घरीं गेल्याबरोबर मीं तें पुस्तक उघडून बघितलें व माझा अंदाज खरा ठरला. त्याच्या १०४ व्या पृष्ठावर पुढील वाक्य होतें,

'कितीहि नाहीं म्हटलं तरी स्त्रीचं जीवित हें अवलंबी असल्याशिवाय तिला बरं वाटत नाहीं. सारा जन्मभर तिची धडपड तो आधार मिळविण्यासाठीं किंवा असलेल्या आधाराला बिलगून राहण्यासाठीं चाललेली असते.'

' विरलेल्या स्वप्नां 'तील रोहिणीचे हे शब्द. मी तें पुस्तक मागें-पुढें चाळूं लागलों. ही रोहिणी आपल्या समाजवादी प्रियकराचा व्यथित अंतःकरणानें निरोप घेते तेव्हां तिनें काढलेल्या पुढील उद्गारांवर माझी नजर स्थिरावूं लागली.

' तूं मोठा हो, तुझ्या श्रद्धेनें जा. पण तुझी ती श्रद्धा मला डावलून टाकील अशी मला भीति वाटते...वैशाख! तुला माझा तिरस्कार येईल. वीट येईल. दारूच्या कोठारांत पेटती काडी टाकण्याचं धैर्य मीं केलं आणि आतां कानठळ्या बसल्या आहेत माझ्या त्या स्फोटानं – त्या स्फोटानं सारी धरणी हादरली आहे. माझे पाय स्थिरावत नाहींत जमिनीवर. या भित्रेपणानें तुला तिटकारा येईल माझा. पण...तुझ्याजवळ तुझी म्हणून येण्याचं धैर्य नाहीं मला होत. आत्मसंरक्षणाची भावना माझ्यासारखीच साऱ्या स्त्रियांत तीव्रतम असेल का कोण जाणे, पण माझं मी सांगतें, ...माझी कुवत तुझ्या एवढी नाहीं – मी तितकी खंबीर नाहीं.'

अगदीं हेच, असेच नाहीं का उद्गार मघाशीं तिनें काढले?

म्हणजे?—' विरलेल्या स्वप्नां'ची लेखिका विभावरी शिरूरकर आणि ही विदुषी या एकच कीं काय!

* * *

हा विचार एकसारखा माझ्या मनांत उसळ्या मारूं लागला. विभावरी शिरूरकर, बी. ए., आणि ही विदुषी यांची तुलनात्मक चवकशी माझ्या मनांत सारखी सुरू झाली. या विदुषीचें एका नाटककाराशीं लग्न ठरल्याची बातमी माझ्या कानांवर आली होती व तिचा अगदीं पुसटसा परिणाम माझ्या मनावर झाला होता. ती बातमी मला एकदम आठवली. त्या नाटककाराचा व माझा थोडाबहुत परिचय होता व त्याचें प्रखर व्यक्तित्व माझ्या ध्यानांतहि होतें. या विदुषीमुळें विभावरी शिरूरकर व हा नाटककार यांचा एकदम विचार मनांत होऊं लागल्यामुळें कीं काय न कळे,

विभावरी-वाङ्मयांत या गृहस्थाचें स्वभावचित्र कोठें तरी रेखाटलें असल्याचें अंधुक अंधुक स्मरण मला होऊं लागलें पुन्हां विभावरीचीं पुस्तकें चाळूं लागलों. हवा तो संदर्भ चटकन् सांपडेना म्हणून थोडासा त्रासलों, पण या निमित्तानें विभावरी-वाङ्मयाचें पुन्हां वाचन होत आहे असें मनाचें समाधानहि करून घेतलें ! अखेरीस 'हिंदोळ्यावर' या कादंबरीच्या १०, ११ व १२ या परिच्छेदांत त्या नाटककाराच्या स्वभावांतले तरंग मला प्रतीत होऊं लागले. 'विराग'च्या वर्णनांत त्याचें वर्णन मला दिसूं लागलें. 'विराग बुद्धिवान्, तुटक, करारी वृत्तीचा आहे; विरागची कोणतीहि कोमल भावना त्याच्या शब्दांतून व्यक्त होणें, हें कठिण होतें. ... मोठेपणावर त्याचा विश्वास नव्हता, तरी त्यानें व्यवहारांत यशस्विता मिळविण्याचा प्रयत्न केला ...... स्वतःला सोसावे लागणारे घाव स्वतःच्या मनांत ठेवण्याइतकें त्याचें अंतःकरण घट्ट होतें....' इत्यादि वर्णन त्या नाटककाराला बहुतांशीं लागू पडेल हें मला पटूं लागलें.

'हिंदोळ्यावर'च्या दहाव्या परिच्छेदांत अचलाविरागच्या संभाषणानें त्याच्या बाह्यतः बेपर्वाईच्या, तुटक, वकिली बोलण्याचा जसा प्रत्यय येतो तसा त्या नाटककाराशीं गप्पा मारतांना अनेकदां आला आहे हेंहि आठवलें.

माझ्या मनांत एकदम निराळाच विचार आला. या नाटककारानें या विदुषीशीं लग्न करावयाचें कां ठरविलें असेल ? 'बुद्धि-भावनांनीं सारखेंच वर्चस्व गाजवलेली स्त्री त्याच्या पाहण्यांत आली नव्हती. अचलेमध्यें कांहींतरी निराळें होतें' असें जसें विरागला वाटलें तसेंच या विदुषीबद्दल आमच्या या नाटककाराला वाटलें असेल का ?

या स्त्रीच्या भावना आणि बुद्धि या दोनहि गोष्टींची साक्ष मला नुकतीच मिळाली होती.

* * *

थोडा वेळ मला मोठा शोध लावल्याचा आनंद झाला व इतर विचार तात्पुरते बंद झाले. पण विभावरी-वाङ्मयाची स्मृति पुन्हां जागृत होऊं लागली. विरागच्या वरील वर्णनासारखेंच आणखीहि एखादें वर्णन विभावरीबाईच्या वाङ्मयांत कोठेंतरी वाचलें होतें, असें अंधुक अंधुक आठवूं लागलें. पुन्हां मन अस्वस्थ झालें. विभावरीचीं सारीं पुस्तकें आणखी एकवार चाळलीं. परंतु तें वर्णन कोठेंहि सांपडेना. ' कृष्णाबाई ' प्रभृति इतर लेखिकांच्या वाङ्मयाचा विचार केला, पण मन पुनः पुन्हां विभावरी-वाङ्मया-कडे धांव घेई. मी थोडासा हताश झालों. इतक्यांत एकदम आठ-वलें. विभावरीची एक कथा प्रतिभेंत प्रसिद्ध झाली होती. तिच्यांत तर हें वर्णन नसेल ? प्रतिभेचें फाइल चाळलें—आणि [ मनाला केवढा आराम वाटला ! ] ता. १६ फेब्रुवारी १९३४ च्या प्रति-भेच्या अंकांतील विभावरीबाईच्या ' विश्राम ' या कथेंत थेट विरागच्या वर्णनाशीं जुळणारें वर्णन आढळलें.

" विश्रामची बुद्धि तल्लख होती. त्याच्या स्वाभिमानाला तल्लख धार होती. लोक त्याला तुसडा म्हणत, विक्षिप्त म्हणत. तसें वाटण्या-सारखें तो बोले आणि त्याला त्याचें वाईट वाटत नसे. जगांतील सुंदरपणा, कोमलपणा, सुख, शांति, जन्मापासून त्याला पारखीं झालेलीं होतीं. त्याला तें सर्व हवें होतें, पण घरच्या गरिबीमुळें त्याला तें मिळालें नव्हतें. त्यामुळें सौंदर्याचीं, कोमलतेचीं, सर्व आल्हाददायक गोष्टींचीं त्यानें मनाशीं शकलें शकलें करून मनाला त्यांचा फोलपणा दाखविला होता. ' अमुक एखादी गोष्ट सुंदर आहे ' म्हटलें कीं तो हंसत म्हणे, ' नागीण सुद्धां सुंदर असते नाहीं ?' "

प्रतिभेंतली ही लघुकथा आणि हिंदोळ्यावर ही कादंबरी-दोनहि एकाच सुमारास प्रसिद्ध झालीं यांत कांहीं विशेष अर्थ नसेल का ? हीं वर्णनें एकाच व्यक्तीवरून सुचलेलीं आहेत हें उघड होय. ही व्यक्ति म्हणजे तो नाटककारच का ? आणि त्या नाटककारा-

चींच हीं वर्णनें, हें बरोबर असलें तर विभावरी म्हणजे ती विदुषी असें ओघानेंच सिद्ध होत नाहीं का ?

*   *   *

विभावरी शिरूरकर आणि ती एका काळीं स्त्रीद्वेष्टी म्हणून गाजलेली विदुषी ! त्या दोघांच्या तुलनात्मक प्रतिक्रियेचे आघात माझ्या मनावर तीव्रतेनें होऊं लागले. सारें विभावरी-वाङ्मय माझ्या नजरेसमोर उभें राहिलें आणि त्यांतले, मला अद्यापपावेतों कधींहि न दिसलेले धागे एकाएकीं स्पष्ट होऊं लागले.

‘ हिंदोळ्यावर’ कादंबरीचें कथानक त्या विदुषीच्याच जवळपास राहणाऱ्या एका श्रीमंत मनुष्याच्या आयुष्यक्रमावरून सुचलें असेल का ?

‘ कळ्यांचे निःश्वास ’ या भावकथासंग्रहाचा मी विचार करूं लागलों, तेव्हां तर माझें अशा प्रकारचें अनुमान अगदीं साधार असावें असें मला वाटूं लागलें. या कथासंग्रहांत लेखिकेनें प्रौढ कुमारिकांचे विचार-विकार इतक्या प्रांजल वृत्तीनें, सहृदयतेनें आणि त्यांच्या अंतरंगाचा इतका ठाव घेऊन पिंजून दाखविले आहेत कीं, या लेखिकेला अशा कुमारिकांचीं हृदयशल्यें स्वानुभवानें तर ठाऊक झालेलीं असावींच, पण त्याचबरोबर अशा प्रौढ कुमारिकांचा बराच निकटचा परिचय तिला घडलेला असावा, असें वाटूं लागतें. ‘ त्याग ’ आणि ‘बाबांचा संसार माझा कसा होणार !’ या कथाच, उदाहरणार्थ, पाहा. या कथांत लेखिकेनें, गरिबी आणि कुटुंबविस्तार यांमुळें सुशिक्षित मुलींच्या पगारावर अवलंबून राहणारा बाप तिच्या लग्नाच्या आड कसा येतो – व त्यामुळें त्या मुलीला स्वतःच्या भावना मारून एकाकी जीवन कसें कंठावें लागतें हें दाखविलें आहे. ‘घरांत चार भावंडें माझ्यापेक्षां लहान...वडिलांना मिळणारे शेंपन्नास रुपये...मी ग्रॅज्युएट....वडील पेन्शनीस आलेले. ...मुलें तर नुकतींच भुईतून वर येत असलेलीं. ’ मला तर हे त्या

विदुषीचे स्वानुभवाचे बोल वाटतात. कुटुंबाच्या उदरंभरणाची जबाबदारी शिरावर घेतलेल्या प्रौढ कुमारिकेचें कुचंबलेलें मन त्या विदुषीनें स्वानुभवानें जाणलें असावें. व स्वानुभवाचें कलात्मक प्रत्यंतर या दोन कथांत सांपडतें. तसेंच, 'प्रेम हें विष कीं अमृत ?' या कथेंतील भावनांची तीव्रता इतक्या सत्यतेनें व्यक्त झाली याचें कारण प्रेमाचा विखार प्रसंगीं किती तापदायक होऊं शकतो हें त्या विदुषीनें स्वानुभवानें जाणलें होतें हेंच नसेल का ?

तें कांहींहि असो. 'कळ्यांचे निःश्वासां'तील 'रिकाम्या भांड्याचे निनाद' व 'अविनाश' या कथा या विदुषीनें केवळ सहसंवेदनेनें लिहिल्या असाव्यात असा, जसजसा मी अधिक विचार करूं लागलों तसतसा, माझा अधिकाधिक ग्रह होऊं लागला. ही सहसंवेदना मैत्रीच्या सहानुभूतीनें निर्माण झाली असावी. 'रिकाम्या भांड्याचे निनाद' या गोष्टीचें कथानक, पुण्यांतील एक प्रसिद्ध वकील व एका प्रसिद्ध कन्याशाळेंतील एक शिक्षिका यांच्या दुर्दैवी संबंधावरून घेतलेलें स्पष्ट दिसतें. आणि या शिक्षिकेशीं आमच्या या विदुषीची मैत्री नसली तरी दाट परिचय होता हें मी जाणतों. तसेंच, 'अविनाश' ही कथा, महाराष्ट्रांतील एका सुप्रसिद्ध समाजवादी कार्यकर्तीच्या एका नातेवाईक मुलीची आहे व ही समाजवादी स्त्री आणि ही विदुषी यांचे सलोख्याचे संबंध सुप्रसिद्धच आहेत.

विभावरी आणि ही विदुषी यांच्या संभवनीय संबंधांचा विचार करतांना वरील सर्व धागेदोरे माझ्या नजरेसमोर त्यांच्या सर्व गुंतागुंतीसकट दिसले आणि ही विदुषी म्हणजेच विभावरी हा माझा ग्रह अगदीं ठाम झाला.

* * *

या साऱ्या अनुमानांत एकाच गोष्टीनें अडथळा येतो. ही विदुषी म्हणजेच जर विभावरी तर या विदुषीचें इतर नियतकालि-

कांत अधूनमधून जें लेखन होतें त्यांत विभावरी-वाङ्मयाचें सामर्थ्य कां दिसून येत नाहीं ?

विभावरी-वाङ्मयाचें एकंदर स्वरूप सखोल दृष्टीनें न्याहाळलें तर, मला वाटतें, या प्रश्नांचा अडथळा सहज दूर होईल. विभावरी-वाङ्मय हें प्रणयवाङ्मय खरें, पण त्याची उत्पत्ति प्रणयपूर्तीच्या आनंदांतून झालेली नाहीं. मनुष्याच्या निराश, असंतुष्ट आणि विकल अवस्थेंत लेखिकेनें हें वाङ्मय निर्माण केलेलें आहे हें उघड होय. स्त्रीच्या मनाचें अत्यंत सूक्ष्म आणि सत्य चित्रण या वाङ्मयांत आढळतें, पण त्याचा एकंदर सूर निराशेचा व दुःखाचा आहे. हें मन अत्यंत गतिमान् आहे; एका अवस्थेंत अपूर्णता आढळल्यावर तें दुसऱ्या अवस्थेकडे झेंप घेतें. परंतु कोणत्याच परिस्थितींत पुरेसें समाधान त्याला लाभत नाहीं. 'हिंदोळ्यावर'मधील अचलेकडेच पाहा ना. विनायकरावांशीं उभा केलेला विवाहाचा संसार विस्कटल्यावर ती नोकरी, समाजसेवा, उद्योग इत्यादि अनेक प्रकारांनीं आपलें मन रिझविण्याचा प्रयत्न करते. पण कशांतच तिला समाधान वाटत नाहीं. विरागशीं तिचें मीलन झाल्यानें तिला पूर्तता लाभेल असें वाटू लागतें न लागतें तोंच, तिच्या हृदयाची एक नवीनच कालवाकालव प्रत्ययास येऊं लागते. ' समाजाविरुद्ध कृति करीत असतांना विचार-विकारांना पिसून-पिंजून तिनें घेतलें होतें. पण सत्याचें स्पंदन तिला ऐकूं येऊं लागलें, पिढ्या न् पिढ्यांचे संस्कार तिला गुदमरून टाकूं लागले.' आशा-निराशेच्या हिंदोळ्यावर केंविलवाण्या चित्तानें ती झोंके खाऊं लागली. 'कळ्यांच्या निःश्वासां'त तर स्त्रियांच्या प्रेमनिराश मनोव्यथेच्याच निरनिराळ्या तऱ्हा वर्णिलेल्या आहेत. 'या कळ्या सुकलेल्या आहेत, होरपळलेल्या आहेत. प्रेमदुःखानें वेंधून त्यांना मुकें बनविलें आहे,' असें विभावरीबाई प्रस्तावनेंत स्वतःच म्हणतात. या कळ्या आपलें हृद्गत आपल्याला कां सांगतात,

'मला पाहून त्यांना काय सांगूं नि काय नाहीं असं होतं' तें कां, हें सांगतांना विभावरीबाईनीं पर्यायानें स्वतःच्याच मनःस्थितीचें वर्णन केलें आहे. 'कुणी कांहीं म्हणो. पण मी खरंच सांगतें कीं, त्या कळ्यांचं हृद्गत, त्यांचा मुकी भाषा मला जितकी कळते, तितकी फार थोड्यांना समजत असेल. त्यांचे वायूवर फिरणारे मूक निःश्वास मला जितक्या स्पष्टपणें ऐकूं येतात, तितके फार थोड्यांना ऐकूं येत असतील. त्यांचे दुःखाचे व निराशेचे मुके बोल मला सहज समजतात. समान धर्मामुळें या गोष्टी होतात, असेंहि वाटल्यास म्हणा.' या भावकथांत जीं प्रेमदुःखें अत्यंत समरसतेनें आणि व्याकुलतेनें वर्णिलेलीं आहेत त्यांचा चटका खुद्द लेखिकेला लागला होता याचा हा कबुलीजबाबच नव्हे काय?

या दुःखाच्या दिव्यांतून आपल्या त्या विदुषीला केव्हां तरी जावें लागलें होतें, एवढी माहिती मला आहे. विभावरी-वाङ्मय म्हणजे या विदुषीच्या स्वतःच्या आयुष्यांतील दुःखमय, निराश, असंतुष्ट अवस्थांचा अविष्कार आहे असें मला वाटतें, व तसा अविष्कार तिच्या इतर लेखनांत होत नसल्यानेंच विभावरी-वाङ्मयाची तेजस्विता त्यांत प्रतीत होत नाहीं अशी माझी समजूत आहे.

दुःखाचा व निराशेचा असा एखादा तडाखा तिला पुनरपि सोसावा लागला तर विभावरी-वाङ्मयाचा लाभ महाराष्ट्राला आणखी एकदां होईल असें मला नेहमीं वाटत असतें. मराठी वाङ्मयाचें हित एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक मनोव्यथेंत सामावलेलें असावें ही फारशी आल्हादकारक गोष्ट नाहीं. पण विभावरी-वाङ्मयाचे सुवर्णकण लेखिकेच्या धगधगत्या दुःखांत विशुद्ध होऊन निघाले असले तर त्याला तुमचा-आमचा काय इलाज? दान्तेच्या 'डिव्हाइन कॉमेडी'चा उगम त्याच्या बिॲट्रिसविषयींच्या अयशस्वी प्रणयभावनेंतच नव्हता का? संस्कृतीचीं बीजें मानवाच्या ऐतिहासिक दुःखांत असतात तशींच तीं कलावंताच्या वैयक्तिक

दुःखांत असतात, या नियमाचें आणखी एक उदाहरण सांपडल्याचें समाधान मानून घ्यावें, झालें !

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या विदुषीकडे मी पुन्हां गेलों व 'तुम्हीच विभावरी शिरूरकर' असा त्यांच्यावर आरोप करून मी त्यांना विचारलें, " 'कळ्यांचे निःश्वासा'च्या प्रस्तावनेंत, 'या कळ्यांचे दुःखाचे कढ व निराशेचे मुके बोल मला सहज समजतात. समान धर्मामुळें या गोष्टी होतात, असेंहि वाटल्यास म्हणा' असें तुम्हीं म्हटलें आहे त्याचा खरा अर्थ मला सांगाल का ? "

त्यावर, आपली मुद्रा शक्य तितकी निर्विकार ठेवून त्या चाणाक्ष स्त्रीनें म्हटलें, " म्हणजे, 'कळ्यांचे निःश्वास' हें पुस्तक मींच लिहिलें आहे हें मी कबूल करूं असेंच ना तुमचें म्हणणें ! "

मार्च १९४१



# ज. र. आजगांवकर

महाराष्ट्रभाषाभूषण आजगांवकर यांच्या वयाला येत्या १६ तारखेस साठ वर्षें पुरीं होतात. तरीपण त्यांच्या भाषणाची 'रेकॉर्ड' एखाद्यानें ऐकली किंवा त्यांचा नवमतवादावरील लेख एखाद्यानें वाचला तर त्यांत त्याला तरुणपणाचा सारा जोम आढळेल इतकी त्यांची वाणी आणि लेखणी तडफदार आहे. बहुतेकांना आजचे त्यांचे विचार त्यांच्या वयाला साजेसे म्हणजे वृद्ध वाटतील; पण ते विचार व्यक्त करण्याच्या त्यांच्या पद्धतींतील तडफ व उत्साह मुळींच कमी झालेला नाहीं. पिंपळाचें झाड कितीहि जुनें झालें म्हणून कांहीं त्याच्या पानांची सळसळ कमी होत नाहीं. आजगांवकरांचें तसेंच आहे.

आपल्या या स्वभावसिद्ध तडफेमुळेंच सुमारें चाळीस वर्षांपूर्वी ते एका वादांत धडाडीनें पडले आणि झटकन् प्रसिद्ध झाले. ज्या वाङ्मयाचे एक अधिकारी तज्ज्ञ म्हणून पुढें आजगांवकरांची कीर्ति

झाली त्या संतवाङ्मयांतील ' ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव व अभंगकर्ते ज्ञानदेव एक कीं दोन ' या कूटप्रश्नावर तो वाद झाला. श्री. शिवराम एकनाथ भारदे नांवाच्या एका गृहस्थांनीं 'सुधारक' पत्रांत 'भारद्वाज' या टोपण नांवानें दहाबारा लेख लिहून असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला कीं, ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव आणि अभंगकर्ते ज्ञानदेव हे एक नसून दोन आहेत. 'भारद्वाजां'चे हे लेख इतके कौशल्यानें आणि तर्कवादाचा पसारा मांडून लिहिलेले होते कीं, न्यायमूर्ति रानडे यांच्यासारख्या समतोल आणि चिकित्सक विद्वानांचीहि खात्री पटली आणि त्यांनीं भारद्वाजांना मुद्दाम पत्र लिहून त्यांचें अभिनंदन केलें. तरीपण मुंबईत सॉलिसिटरच्या ऑफिसमध्यें कारकुनी करीत असलेल्या आजगांवकरांचें भारद्वाजांच्या युक्तिवादानें समाधान झालें नाहीं. त्यांनीं ज्ञानेश्वरी आणि ज्ञानदेवाचे अभंग यांचा उपमा, दृष्टान्त, अलंकार आणि विचारप्रणाली इत्यादि दृष्ट्या तौलनिक अभ्यास करून एक अडीच स्तंभ मजकुराचें उत्तर 'केसरी'कडे पाठविलें आणि लो. टिळकांनीं तें तत्परतेनें छापलें. केसरींतील त्या उत्तराचा विलक्षण परिणाम झाला. इतर विद्वानांचें लक्ष त्या वादाकडे वेगानें वळलें. हा वाद आजगांवकर खेळले तेव्हां त्यांचें वय अवघें एकोणीस-वीस वर्षांचें होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यांचें विशेष शिक्षण झालें होतें अशांतलाहि प्रकार नव्हता. आजगांवच्या शाळेंत ते व्हर्न्याक्युलर फायनल झाले होते व त्यानंतर त्यांच्या इंग्रजी शिक्षणास चवथी इयत्ता पास झाल्यावर कायमचा विराम मिळाला होता. तरीपण खाजगी रीतीनें त्यांचें वाचन भरपूर झालें होतें. वडिलांमुळें त्यांना जुन्या कवितेचा बराच नाद लागला होता आणि चिपळूणकर, केरळकोकिळकार इत्यादि ग्रंथकारांच्या अविरत वाचनामुळें त्यांच्या भाषेस एक प्रकारचें आधुनिक वळणहि लागलें होतें.

मुंबईच्या 'गुराखी' पत्रांत आजगांवकरांनीं लेखनास सुरुवात

केली. त्यानंतर 'मराठा-दीनबंधु', 'ज्ञानप्रकाश', 'सुधारक', 'इंदु-प्रकाश', 'संदेश' इत्यादि पत्रांशीं त्यांचा संपादक-उपसंपादक इत्यादि अनेक नात्यांनीं संबंध आला. 'ज्ञानांजन' मासिक आणि 'हास्यविनोद' साप्ताहिक हीं दोन नियतकालिकें कांहीं काल त्यांनीं आपल्या स्वतःच्या हिंमतीवर चालविलीं होतीं. तरीपण त्यांचा वाङ्मयीन विकास त्यांनीं मधूनमधून खेळलेल्या वादांतून आणि वादांनींच अधिक झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोल्हापुरला 'मराठा-दीनबंधु' पत्रांत असतांना त्यांनीं, त्याच पत्रांत प्रसिद्ध झालेल्या, कै. राजारामशास्त्री भागवत यांच्या 'मराठ्यांनीं ख्रिश्चन व्हावें' असा उपदेश करणाऱ्या एका लेखाची अशी खमंग हजेरी घेतली कीं, भागवतांनीं त्या पत्राशीं असलेला सर्व संबंध कायमचा सोडला. पुढें पुण्यांत आल्यावर हातवळणे, गोडबोले हे प्रसृत करीत असलेल्या 'बोलल्यासारखें लिहावें' या नवीन लेखनपद्धतीवर त्यांनीं हत्यार धरलें आणि विनायक कोंडदेव ओकांसारख्यांचे धन्यवाद मिळविले. पण विशेष महत्त्वाचा वाद त्यांनीं कै. बाळकृष्ण अनंत भिडे यांच्याशीं केला. भिडे यांनीं 'सरस्वति-मंदिर' मासिकांत एक लेख लिहून निरनिराळे पांच वामन होऊन गेले असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. आजगांवकरांनीं त्याला ज्ञानप्रकाशांतून उत्तर दिलें आणि मुख्य वामन कवि दोन ठरतात असें सिद्ध केलें. या वादांत इतिहासाचार्य राजवाड्यांसारखे विद्वान् पडले होते; तरी चिकित्सक वाचकांचें आजगांवकरांकडे दुर्लक्ष झालें नव्हतें. याहि वादांत आजगांवकरांचा पक्ष यशस्वी ठरला; कारण भिड्यांनीं आपला आग्रह सोडला. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'मतिविकार' नाटका-वर आजगांवकरांनीं 'पौंड्र' या टोपणनांवानें 'मुमुक्षू'त केलेल्या टीकेमुळें त्यांचा श्री. केळकरांशीं वाद झाला.

आजगांवकरांनीं हे सर्व वाद केले, पण त्यामुळें या सर्व 'वाद-शत्रू'शीं असलेल्या त्यांच्या स्नेहास कधींहि बाध आला नाहीं. कै.

बाळकृष्ण अनंत भिडे आणि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्याशीं अखेरपर्यंत त्यांचे संबंध नितांत स्नेहाचेच होते; आणि याचें श्रेय बहुतांशीं आजगांवकरांच्या मनमोकळ्या स्वभावासच दिलें पाहिजे. वाद उपस्थित झाला किंवा मतभेदाचा प्रसंग आला म्हणजे आजगांवकर रागावतील, संतापतील, किंचित् वांकडी मान करून टीकेचा भडिमार सुरू करतील; हा त्यांचा वाक्प्रहार सुरू असतां ते आपले डोळे, संतापाचे स्फुल्लिंग आसमन्तांत उडूं नये म्हणून कीं काय, किंचित् मिटून घेतील; क्षुब्ध होऊन कांहीं काल अगदीं गप्प राहतील. पण तो वाद संपला, वातावरण निवळलें कीं, त्यांची पूर्वीची बोलघेवडी प्रसन्नता पुनरपि अवतीर्ण होईल. आजच्या तरुण पिढींतील लेखकांशीं त्यांचे नवमतवाद वगैरे विषयावर अगदीं कडवट वाद अनेकदां झाले आहेत; पण त्यांपैकीं एकाहि लेखकाशीं त्यामुळें त्यांचे संबंध दुरावले असतील असें मला वाटत नाहीं.

वादविवादाच्या प्रसंगीं लेखणीपेक्षां त्यांची वाणीच अधिक प्रभावी ठरते. कारण ती इतकी वेगानें वाहते कीं, त्यांच्या प्रतिपादनांतील तर्कदुष्टतेच्या सर्व तपशिलाची नोंद करण्यास प्रतिपक्षाला अवसरच राहत नाहीं! महाराष्ट्राच्या प्रमुख वक्त्यांत आजगांवकरांची गणना करावी लागेल. आजगांवकरांचें वक्तृत्व ऐकण्यास जाहीर सभेची संधिच साधली पाहिजे असें नाहीं. त्यांचें खाजगी संभाषण देखील अगदीं वक्तृत्वपूर्ण असतें. वेंचक शब्दप्रयोग, सुस्पष्ट आणि जोरदार शब्दोच्चार, अप्रतिहत प्रवाह हे त्यांच्या वाणीचे विशेष म्हणून सांगतां येतील. त्यांच्या वक्तृत्वांत कांहीं ठिकाणीं उपरोध दिसला तरी निर्मळ विनोद क्वचित्‌च आढळतो. पण ते तळमळीनें बोलतात आणि साहजिकच रसवत्ता निर्माण होते. त्यांच्या दोन भाषणांचा संस्मरणीय म्हणून उल्लेख करण्यास हरकत नाहीं. १९१० सालच्या वसंतव्याख्यानमालेंत त्यांनीं 'मराठी कवि आणि त्यांजवरील आक्षेप' यांचा समाचार घेणारें जें व्याख्यान दिलें तें तेव्हां फारच गाजलें

होतें. विषय त्यांच्या जिव्हाळ्याचा. दोन तास त्यांची वाणी अस्खलितपणें चालली होती. सर्व सभा मंत्रमुग्ध होऊन ऐकत होती. या सभेस गडकरी हजर होते. वक्तृत्वाच्या ओघांत, ' मला कोणी महार म्हटलेलें चालेल, पण सुधारक म्हटलेलें खपणार नाहीं. ' असें एक वाक्य आजगांवकर बोलून गेले. तेवढेंच नेमकें त्यांनीं उचललें व त्याच रात्रीं लिहिलेल्या ' प्रेमसंन्यासा'च्या प्रवेशांतील गोकुळाच्या तोंडांत घातलें ! अशा रीतीनें गडकऱ्यांनीं तें व्याख्यान अमर केलें आहे.

आजगांवकरांचें दुसरें सर्वोत्तम व्याख्यान १९०९ च्या बडोदें येथील महाराष्ट्र-साहित्य-संमेलनांत झालें. भाषणाचा विषय ' मराठी वाङ्मयाचा महाराष्ट्र-समाजावर परिणाम' असा होता. कर्नल कीर्तिकर अध्यक्ष होते. त्यांनीं प्रत्येक वक्त्याला पांच मिनिटें वेळ दिला होता. आजगांवकर बोलायला आले आणि त्यांनीं आपल्या वक्तृत्वाची 'डेक्कन क्वीन' अशा कांहीं वेगानें सोडली, कीं मामुली वक्ता पंधरावीस मिनिटांत बोलेल तें ते पांच मिनिटांत बोलले. पण भाषण पुरें झालें नव्हतें. वेळ भरल्यावर अध्यक्षांनीं घंटा वाजविली. आजगांवकर भाषण अर्धवट सोडून जाग्यावर जाऊन बसले; पण श्रोते ऐकतना. 'वन्समोअर'च्या गर्जनेनें गंधर्वाला पडद्यांतून खेचून आणून 'सत्य वदे...' आठव्यांदा म्हणायला लावणाऱ्या चिकाटीनें त्यांनीं 'आजगांवकर, आजगांवकर' असा ओरडा चालू ठेवला आणि कर्नल कीर्तिकरांना आजगांवकरांना अधिक वेळ देणें भाग पडलें ! आजच्या उतारवयांत देखील आजगांवकरांच्या वक्तृत्वाचा वारू पूर्वीप्रमाणेंच दौडत असतो !

मराठी वाङ्मयांत आजगांवकरांना इतकें महत्त्व प्राप्त झालें आहे तें अर्थात् त्यांच्या महाराष्ट्रकविचरित्रमालेमुळें. आजगांवकरांचीं संतकविचरित्रें शास्त्रशुद्ध चरित्रलेखनाचा नमुना ठरतील अशांतला मुळींच प्रकार नाहीं. या चरित्रांत त्यांच्या भाविक वृत्तीचेंच

प्रदर्शन जागोजाग होतें. पण त्यामुळेंच तीं रसाळ झालीं आहेत. केवळ वाङ्‌मयीन व परिचायक दृष्टीनें हीं चरित्रें कितीहि महत्त्वाचीं ठरलीं तरी संतांच्या कर्तबगारीचें यथायोग्य आलेखन करण्याचें आजगांवकरांना कधींच जमलें नाहीं असें म्हणणें भाग आहे. संतकवि म्हणजे सद्‌गुणांची खाण आणि कर्तृत्वाचा कुतुबमिनार अशीच प्रायः त्यांची समजूत आहे. आपल्या एका प्रस्तावनेंत ते म्हणतात–' एकंदरींत तात्पर्य काय, कीं जुने मराठी कवि चांगले विद्वान्, व्यवहारचतुर, सदाचारी, प्रेमळ आणि हरिभक्त होते व इतक्या सर्व गुणांचा त्यांच्या काव्यांत ठिकठिकाणीं ठसा उमटलेला असल्यामुळें तें काव्य सहजच निसर्गमनोहर उतरलें आहे. ' महाराष्ट्रीय साधुसंतांत देशाभिमान, भाषाभिमान असून त्यांनीं प्रचलित देशस्थितीचा राष्ट्रीयत्वाच्या भावनेनें सूक्ष्म अभ्यास केला होता अशी आजगांवकरांची ठाम समजूत आहे. किंबहुना ' आमच्या अंगांत जे आज नाहींत, परंतु ज्यांची आज आम्हांस फार आवश्यकता आहे ते स्वार्थत्याग, करारीपणा, दीर्घोद्योग इत्यादि अमोलिक गुण जर आमच्या अंगीं येणें शक्य असेल तर तें आमच्या कवींच्या काव्यांचा व त्यांच्या चरित्रांचा मनःपूर्वक अभ्यास केल्यानेंच होय ' असें ते ठासून सांगतात. सद्वर्तनामुळें तर या कवींचीं चरित्रें व त्यांचें काव्यहि आदर्शवत् झालें आहे. ते म्हणतात, ' आमच्या बहुतेक जुन्या कवींचें आचरण अत्यंत शुद्ध होतें. अर्थात् त्या त्यांच्या सदाचरणाचा ठसा त्यांच्या कवितेवर उमटला आहे. बेकनसारखे लांचखाऊ, गोल्डस्मिथसारखे दारूबाज, बायरन्‌सारखे व्यभिचारी व शेरिडनसारखे दिवाळखोर आमचे कवि नव्हते. ' त्यांचें काव्य एकांगी, बहुतेक परमार्थपर होतें याचाहि विषाद आजगांवकरांना वाटत नाहीं. आंग्ल काव्यांतील विविधतेचे गोडवे गाणाऱ्या रसिकांना ते विचारतात, ' ज्ञानेश्वरी, तुकारामाचे अभंग आणि दासबोध

यांच्या तोडीचे ग्रंथ आंग्ल वाङ्मयांत तरीं कोठें व कितीसे आहेत ?' यावरून ' मराठी काव्य सबंध जाळून टाकलें तरी जगाचें कांहीं नुकसान होणार नाहीं' असे उद्गार काढणाऱ्या डॉ. केतकरांची संभावना ते कशी करीत असतील तें कल्पनेनेंच जाणावें !

थोडक्यांत म्हणजे हीं त्यांचीं चरित्रें भाविक वृत्तीनें पछाडलेलीं आहेत. या आत्यंतिक भाविकतेमुळेंच संतचरित्रांतील चमत्कारादि प्रकारांवर ते विश्वास ठेवतांना आढळतात. आजगांवकरांच्या भाविक वृत्तीचा आत्यंतिक साक्षात्कार, मला त्यांनीं प्रो. फाटकांबद्दल एक हकीकत सांगितली तेव्हां झाला. रामदासस्वामींच्या चरित्रांतील आध्यात्मिक आणि व्यावहारिक उदात्ततेवर आपल्या अहृदय चिकित्सकतेचा विदारक प्रकाश पाडण्याचा फाटकांचा प्रयत्न सुप्रसिद्धच आहे. हा वाद नुकताच संपला होता. इतक्यांत धुळ्याचे प्रसिद्ध रामदासभक्त श्री. शंकरराव देव हे जांब येथें बांधावयाच्या रामदासमंदिरासाठीं फंड गोळा करण्याच्या हेतूनें मुंबईस आले आणि साहाय्यासाठीं श्री. खाडिलकरांकडे गेले. खाडिलकरांनीं फाटकांना शंकररावांबरोबर हिंडायला व त्यांना कांहीं दानशूर इसमांकडे न्यावयास सांगितलें. आणि खाडिलकरांच्या शब्दासाठीं फाटक त्याप्रमाणें गेलेहि. आजगांवकरांना या घटनेंत विसाव्या शतकांतील एक ईश्वरी चमत्कार आढळला ! ते तात्काळ फाटकांकडे गेले आणि म्हणाले, ' पाहा, फाटक ! तुम्हांला रामदासस्वामींच्या निर्मळ चारित्र्यावर शिंतोडे उडवायला हवेत, नाहीं का ? आतां आली कीं नाहीं यांच्याच मंदिरासाठीं चौपदरी हातांत घेऊन हिंडण्याची पाळी ? चांगला सूड घेतला स्वामींनीं. अरे बाबा ! ईश्वर कांहीं झोंपलेला नाहीं ! ' अशा भाविक वृत्तीच्या चरित्रकारास संतचरित्रांचें चिंतन करतांना प्रत्यक्ष ईश्वराचें दर्शन [ म्हणजे त्याचा भास ! ] कसें झालें नाहीं याचेंच मला नवल वाटतें !

अशा भाविक वृत्तीचे आजगांवकर सनातनी वृत्तीचे गृहस्थ आहेत हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. संतवाङ्मयाखेरीज त्यांनीं लिहिलेलें इतर बहुतेक वाङ्मय या सनातनी वृत्तीनेंच स्फुरलेलें आहे असें सहज सिद्ध करतां येईल. टिळकांच्या जमान्यांत आजगांवकरांची जहालांत गणना होत असे. कै. हरिभाऊ आपटे तर त्यांना 'जहाल' या नांवानेंच संबोधीत असत. पण ते जहाल होते ते राजकारणाचा स्वतंत्र वृत्तीनें सखोल अभ्यास करून जहाल-मतवादित्वाची इष्टता पटल्यामुळें, असें वाटत नाहीं. टिळकांबद्दल-च्या अभिमानामुळें आणि तेव्हां सर्वसाधारण सनातनी वर्ग टिळ-कांच्या जहाल राजकारणाचा पुरस्कर्ता होता म्हणूनच आजगांव-कर जहाल होते अशी माझी समजूत आहे. त्यांचें जहाल राज-कारण आतां थंडावलें आहे आणि त्यांच्या स्वभावजन्य जहाल वृत्तीचा आविष्कार आजकाल फक्त नवमतविरोधी सनातनी लेखनांतच होतो. त्यांच्या जीर्णमतवादित्वाची बैठक भाविक वृत्तीवर उभारलेली असल्यामुळें त्यांच्या या लेखनांत तर्कशुद्धतेपेक्षां तर्कदुष्टतेचा विलासच अधिक प्रमाणांत दृष्टीस पडतो आणि तर्क-शुद्धतेची उणीव ते कित्येकदां थयथयाटानें भरून काढतांना आढळतात. 'वैषयिक विचारांनीं बरबटलेलें व्यभिचारप्रवर्तक वाङ्मय प्रसवणारे हल्लींचे कांहीं लेखक आणि लेखिका व तें वाङ्मय, श्वानानें वमनावर ताव मारावा त्याप्रमाणें मिटक्या मारीत वाचणारे तरुण आणि तरुणी यांजकडे पाहून भर्तृहरिवर्णित सारमेयाची आठवण होते!' अशा संस्कृतप्रचुर गालिप्रदानानें ते आपल्या नवमतवादावरील लेखनास प्रायः प्रारंभ करतात.

नवमतवादावर लिहिण्यासाठीं लेखणी उचलण्यापूर्वी त्या वादाचें स्वरूप समजावून घेण्याची आवश्यकताहि त्यांना वाटत असावीसें दिसत नाहीं. 'हें वाङ्मय कीं गोमय?' या लेखांत काढलेल्या 'वैषयिक सुखोपभोग आणि प्रजोत्पत्ति हेंच मनुष्यप्राण्याचें इति-

कर्तव्य, त्यापलीकडे उदात्त असें जगांत कांहींच नाहीं, ' असें जें एक नवीन तत्त्वज्ञान महाराष्ट्रांत हल्लीं बोकाळूं लागलें आहे त्याचा उगम मास्को शहरांत झालेला असला तरी हल्लींची गुलामगिरी महाराष्ट्रांतील तरुण पिढीच्या कशी पचनीं पडत चालली आहे याचेंहि तें निदर्शक आहे यांत संशय नाहीं,' या त्यांच्या उद्गारांवरून माझ्या उपरोक्त विधानाची प्रतीति येईल. या एका लहानशा वाक्यांत त्यांनीं महाराष्ट्रीय नवमतवाद आणि नवमतवादी त्यांच्याबद्दल शक्य तितकें अज्ञान प्रदर्शित केलें आहे. त्यांच्या तर्कदुष्टतेचीं चारदोन उदाहरणें नजरेखालून घालण्यास हरकत नाहीं. ' नवमतवाद्यांना शेलापागोटें ' या त्यांच्या थोड्याबहुत गाजलेल्या लेखांत नवमतवाद्यांच्या अधार्मिक वृत्तीवर हल्ला चढवितांना ते म्हणतात, 'समाजवादाचा प्रणेता कार्ल मार्क्स यानें धर्म ही अफूची गोळी आहे असें म्हटलें असलें तरी त्या विषयावर मत देण्याचा अधिकार त्याला नव्हता. तो अधिकार विज्ञानशास्त्रज्ञांचा आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे आणि हे विज्ञानशास्त्री तर ईश्वराचें अस्तित्व आणि धर्माची आवश्यकता मान्य करीत आहेत ! ' कार्ल मार्क्सला उपरोक्त उद्गार काढण्याचा अधिकार कां नव्हता हें ते सांगत नाहींत. अर्थात् तें त्यांच्या पथ्यावरच पडलें. कारण त्या भरीस ते पडले असते तर मार्क्स हा कोणत्याहि विश्वविद्यालयांत विज्ञानशास्त्राचा प्रोफेसर नसला तरी उत्कृष्ट विज्ञानशास्त्री होता याची जाणीव त्यांना झाली असती व त्यांचें पुढचें सर्व प्रतिपादन तेथेंच खुंटलें असतें !

ईश्वराचें अस्तित्व मान्य करणाऱ्या या विज्ञानशास्त्र्यांचीं मतें खोडून काढणारे इतरहि नास्तिक पण अधिकारी विज्ञानशास्त्री पाश्चात्य देशांत व हिंदुस्थानांतहि आहेत याचीहि कल्पना आजगांवकरांना दिसत नाहीं. दुसरें असें कीं, 'ईश्वराचें अस्तित्व' आणि 'धर्माची आवश्यकता' हे दोन वेगळे प्रश्न आहेत. पहिला मुख्यत्वें-

करून तत्त्वज्ञानाचा प्रश्न आहे, तर दुसरा प्रायः समाजशास्त्राचा आहे. आणि आजगांवकरांचे सर्व अधिकारी विज्ञानशास्त्री पहिल्या प्रश्नाबद्दल बोलत आहेत तर मार्क्सचें वचन मुख्यतः दुसऱ्या बाबीबद्दल आहे. आजगांवकरांच्या ध्यानांत ही गोष्ट अंधुक अंधुक रीतीनेंहि आलेली दिसत नाहीं. श्री. भास्करराव जाधवांबद्दल [रामायणकालीन संशोधन-प्रकरणीं] त्यांनीं केलेलें पुढील विधान तर्कशास्त्राचा असाच उपमर्द करणारें आहे. ते म्हणतात– ' महंमद पैगंबराविषयीं असलें संशोधन एखाद्या दीडशहाण्यानें केलें तर त्याची काय स्थिति होईल याची कल्पना कठीण नाहीं. ' खरें आहे. गॅलिलिओप्रभृति शास्त्रज्ञांचा जसा छळवाद झाला तसाच कदाचित् भास्कररावांचा झाला असता. पण धर्मांधांनीं छळवाद केला म्हणून गॅलिलिओचें संशोधन चुकीचें ठरलें नाहीं.

शास्त्रीय वाद करतांना उपरोधाचें शस्त्र वापरून प्रतिपक्षाची टर आजगांवकर चांगली करतात; त्यामुळें त्यांचें हें लिखाण करमणूक करतें. पण जीर्णमतवादाचें चंद्रमौळी खोपट सावरून धरण्यास त्याचा कांहींहि उपयोग होत नाहीं. नवमतवादाविरुद्ध लिहिलेल्या त्यांच्या अनेक लेखांत श्री. अनंत काणेकरांच्या ' मोठेपणाच्या मर्यादा ' या लेखाला त्यांनीं ' विहार ' पत्रांत दिलेलें उत्तरच काय तें थोडेंबहुत यशस्वी होतें असें मला आठवतें. पण त्याचें कारण काणेकरांचें तें प्रतिपादन बरेंचसें अशास्त्रीय आणि आत्यंतिक होतें हें होय. आजगांवकरांचें नवमतविरोधी लेखन बहुतेक सारें भरमसाट झालें आहे.

असें असलें तरी आजगांवकरांच्या गोड्या आणि आतिथ्यशील स्वभावामुळें कोणत्याहि 'तय्यार' नवमतवाद्याला त्यांच्याकडे जाऊन चार घटका गमतीदार गप्पा मारावयास कंटाळा येणार नाहीं. बोलण्याचें कार्य बहुतेक सर्व तेच करीत असल्यानें श्रोत्याला फारशी तकलीफ पडण्याचें कारण नसतें. अनेक थोर व्यक्तींशीं

घडलेल्या परिचयामुळें मिळालेला अनुभव, वृत्तपत्रीय व्यवसायांत मुरल्यामुळें प्राप्त झालेली बहुश्रुतता आणि दांडगी स्मरणशक्ति, यांचा कलात्मक संगम आजगांवकरांच्या संभाषणांत प्रतीत होतो. त्यांच्या त्या साध्या संसाराची सर्व हकीकत मोकळेपणानें सांगणाऱ्या बिऱ्हाडांत गोजिरवाणीं मांजरें जशीं खेळत बागडत असतात, त्याप्रमाणें त्यांच्या साध्या जीवनाचा इतिहास सांगणाऱ्या त्यांच्या संभाषणांत आठवणी आणि सुभाषितें यांची बागड सारखी चालू असते. मराठी वाङ्मयाच्या आजच्या चित्रविचित्र प्रदर्शनांत आजगांवकरांची मूर्ति इकडे तिकडे गडबडीनें फिरतांना आणि त्याहून अधिक जलदीनें वाग्विहार करतांना मला जेव्हां जेव्हां आढळते, तेव्हां तेव्हां त्यांच्याविषयीं हरिभाऊ आपटे नेहमीं काढीत असलेल्या एका उद्गाराची आठवण मला होते.

हरिभाऊ आपटे पुणें म्युनिसिपालिटीच्या स्कूलबोर्डाचे चेअरमन असतांना त्यांनीं 'रे इंडस्ट्रिअल म्यूझिअम'मधील कारकुनाच्या जागेवर आजगांवकरांची योजना केली. 'आजगांवकर म्यूझियममध्यें काय करतात?' असें हरिभाऊंना कोणीं विचारलें तर 'He is an exhibit in the Museum' असा जबाब ते देत असत! आजगांवकरांबद्दल हा जबाब हरिभाऊ जितक्या आपुलकीनें आणि प्रेमळपणानें देत तितक्याच आपुलकीच्या आणि प्रेमळपणाच्या भावनेनें मीहि म्हणूं शकेन कीं, 'Mr. Ajgaonkar is an exhibit in the Museum of Marathi Literature!'

ग्रंथसंग्रहालय ठाणे
दा. क. 2973

ऑगस्ट १९३९

REFBK-0006143